# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०४/१२/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक ०४/१२/२००३ रोजी सभा सुचना क्र. २४ दि. २९/११/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ८) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ९) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १४) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| १५) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, आपणा सर्वा चे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७४ चे वाचन केले.)

**मोहन पाटीलः-**

आम्ही दिलेल्या पत्राचे वाचन करण्यात यावे.

(प्र. सचिवांनी पत्राचे वाचन केले.)

**आसिफ शेखः-**

विषयपत्रिकेसोबत जो गोषवारा दयायला पाहिजे. तो गोषवारा का देण्यात आला नाही.

**प्र. सचिवः-**

संबंधित लेखा विभाग आणि संगणक विभागाचा गोषवारा होता आणि तो त्या विभागाकडूनच सचिव विभागात उशीरा आला आहे.

**आसिफ शेख:-**

आपल्याकडे दोन-दोन सचिव आहेत आणि जर असे दोन सचिव असताना अशी परिस्थिती होत असेल तर उपयोग काय?

**प्र. सचिव:-**

गोषवारा संबंधित विभागाने दयायचे असतो आणि त्यांच्याकडूनच गोषवारा उशीरा देण्यात आला आहे. माझ्याकडे ज्या दिवशी आले त्याच दिवशी मी वाटप केलेले आहे.

**आसिफ शेख:-**

गोषवारा उशिरा आला म्हणून तुम्ही त्यांच्यावर काय कार्यवाही केली?

**रिटा शाह:-**

सचिव साहेब, दुसरे सचिव कोण आहेत? ते आम्हाला कळु दया.

**प्र.सचिव:-**

दुसरे सचिव नाहीत. माळीसाहेब हे आपल्याकडे विशेष अधिकारी म्हणून आहेत.

**आसिफ शेख:-**

तुम्ही त्यांना जबाबदारी दिली आहे. ते विशेष कार्य अधिकारी म्हणून त्यांना काय जबाबदारी दिली आहे. माजी सभापती साहेबांनी पत्र दिले आहे. त्याचे काय झाले? आम्हाला गोषवारा वेळेवर का मिळत नाही आणि जर असे होत असेल तर कसे चालणार.

**प्र. सचिव:-**

संबंधित विभागाने माझ्याकडे विषय आधी दिले व गोषवारा उशीरा दिला.

**आसिफ शेख:-**

महानगरपालिका झाली तर कामकाजात काही फरक दिसला पाहिजे का नाही. ग्रामपंचायत आहे तरी तीच पध्दत नगरपालिका होती तरी तीच पध्दत व आता महानगरपालिका झाली तरी तीच पध्दत. कामकाजात सुधारणा करा.

**चंद्रकांत वैती:-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख साहेब, आजच्या सभेमध्ये जे विषय आहेत. त्यापैकी दोन गोषवारे आपल्याकडे आहेत आणि दोन विषय आपल्याकडे तहकूब सभेचे आहेत. तहकुब सभेमध्ये भाईंदर पूर्व, पश्चिम हया परिसरात जलवाहिन्या टाकण्याच्या निविदांना मंजूरी दयायची होती. ती ६/११/२००३ तहकूब सभा होती आणि त्याचा तो विषय आहे आणि १७७ क्रमांकाचा जो विषय आहे. त्याच्यामध्ये आपण ना फेरिवाला क्षेत्र निश्चित करणेबाबत. हाही विषय आपण मागच्या सभेत तहकूब केला होता आणि त्यावेळेला संबंधित गोषवारे आपल्याकडे होते. सचिवांना विनंती करतो की, संबंधित गोषवारे आपण परत वितरित करावे.

**मोहन पाटील:-**

सन्मा. सभापती महोदय, विषय असा आहे की, सचिव साहेबांनी असा खुलासा केला की, संबंधित खात्याची लोक आपल्याला गोषवारा देत नाहीत. म्हणून आम्ही तुम्हाला गोषवारा वेळेवर देउ शकत नाही. सचिव साहेब असेच बोलले ना. संबंधित खात्याचे लोक आम्हाला गोषवारा देत नाहीत म्हणून तुम्हाला आम्ही गोषवारा उशीरा दिला. तुम्ही रात्री आमच्या घरी दहा-अकरा वाजता आलात. तो दिवस आम्ही पकडत नाही. तुम्ही कुठली गोष्ट कायदयाने सांगत असाल की, आम्ही तुम्हाला गोषवारा दिला. आम्हाला खुलासा असा पाहिजे की, संबंधित खात्याच्या लोकांनी तुम्हाला गोषवारा वेळेवर दिला नाही. तर आपण त्यांच्यावर काय कार्यवाही केली. नाहीतर अशी पध्दत सुरु करा. गोषवारा सभेच्या आदल्या दिवशी दया. अन्यथा सभेत आल्यावर दया. सन्मा. सदस्य वैती साहेब तहकुब सभेत जरी जो विषय होता. त्यापैकी एक विषय पाणीपुरवठयाचा होता आणि तो येणार व त्याच्यावर जे काही भाष्य झालेले आहे. ते तहकुब सभेचे भाष्य त्यावर यायला पाहिजे. टिपण दयायला पाहिजे. तो विषय आपण तहकूब केला. पुढे नेला तर त्यावर टिपण दयायला पाहिजे. कारण त्यावर चर्चा झालेली आहे आणि सचिव साहेब हे उत्तर होउ शकत नाही. जर तुमचे खातेनिहाय अधिकारी जर आपल्या विषयाशी सहमत नाही. ते विषय त्यांना न सांगता घेतलेले आहेत का?

**प्र. सचिव:-**

त्यांनी विषय दिलेले आहेत.

**मोहन पाटील:-**

त्यांनी विषय दिलेले आहे. तर त्यांना गोषवारा देणे क्रमप्राप्त आहे की नाही. त्यांनी तुम्हाला विषय दिले आणि आपणाला सांगितले की, तुम्ही लढा. तुम लढो हम कपडा सांभाळते है । असे चालेल का? विषय असा आहे, जर त्यांनी आपल्याला विषय दिलेला आहे आणि त्यांनी गोषवारा न देता विषय दिलेला आहे. तुम्ही घेतले तर त्याचा अर्थ लावायचा काय? कायदयाच्या बाबतीमध्ये विषय वेगळा आहे की, कायदयाने काय करता येते आणि काय करता येत नाही. आपण १९४९ च्या प्रांतिक कायदयाप्रमाणे चालायला पहिजे. पण आपण चालत नाही आणि चालू ही नये. सर्वतोपरी तर का? जर आपण प्रांतिक कायदयाप्रमाणे चालायला गेलो तर आपण प्रशासनाला सांगू शकत नाही की, प्रशासन आम्हाला हया कामाची गरज आहे आणि आपण आम्हाला ॲजेसमेन्ट करुन दया असे आम्ही बोलु शकत नाही. कारण सर्वच गोष्टी कायदयाने होत असते हा विषय नाही. काही गोष्टी कायदयाने बसवणे हा विषय आहे आणि कायदयात बसवणे हा १९४९ चा प्रांतिक कायदा सांगत नाही की, कायदयात बसवून काम करा. जेव्हापासून समिती गठीत झाल्यापासून हे विषय नेहमी आलेले आहेत की, टिपणी बरोबर नाही. गोषवारा बरोबर आलेला नाही आहे. त्याच्यात झेरॉक्स प्रती नाही आहेत. संगणकावर केले नाही अशी बोंबाबोंब आपण करत आलेलो आहोत. सन्मा. सदस्यांच्यावतीने प्रशासनाने खबरदारी घ्यायला पाहिजे. आज वर्षभर झाला आणि हया ठिकाणी नवीन सभापती येउन आज दोन महिने झाले तरी तीच पध्दत आजही अवलंबित असेल तर बरोबर नाही. मग तुम्ही काय केले? मला असे विचारायचे आहे, सचिव साहेबांनी खुलासा केला की, त्यांनी आम्हाला गोषवारा वेळेवर दिला नाही, असे बोलून ते बाजूला झाले. पण त्यांनी गोषवारा दिला नाही तर आपण काय केले. आपण संबंधित अधिका-यांना बोलावून काय विचारणा केली त्याचा आम्हाला खुलासा करा.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

मा. सभापतीसाहेब, यामध्ये इतिवृत्तान्त कायम करण्याचा गोषवारा सोबत दिलेला आहे. जलवाहिन्या टाकण्याच्या पूर्वीचाच गोषवारा आहे आणि आपण सिटी इंजिनिअर हयांना तपासून घेण्यासाठी सांगितले होते आणि ना फेरीवाल्याचा गोषवारा त्याचवेळी देण्यात आलेला आहे. दोन गोषवारा उशीरा आलेले आहेत. ते उशिरा आल्याबद्दल सचिवांनी आस्थापना विभागाकडे रिपोर्ट पाठवावा आणि आस्थापना विभागाने त्याबाबत संबंधितांचा खुलासा घ्यावा. यापुढे असे होणार नाही याची दक्षता घ्यावी व यापुढे असे होणार नाही याची दक्षता घेउन त्यांना नोटीसा देउन त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल आणि संबंधित सचिवांना त्याप्रमाणे लेट किती दिवसाचे झाले आणि अजेन्डा केव्हा काढला आणि गोषवारा केव्हा दिला. याबाबत खुलासा देउन पुढच्या सभेत ठेवावे आणि सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी कालच प्रशासनाचे अभिनंदन केलेले आहे. कारण आयुक्तांचे अभिनंदन केले म्हणजे सर्व कर्मचा-यांचे अभिनंदन त्यामध्ये सामावलेले आहे.

**रिटा शाह:-**

साहेब, आम्ही अभिनंदन आपलेही केले होते. ठराव मी मांडलेला होता. आपण चांगली कामे केली तर आम्ही तुमचे कौतुकही केलेले आहे आणि आजही करते. आयुक्त साहेबांच्या अभिनंदनाचा मी देखील महिला नगरसेविका म्हणून ठराव मांडलेला आहे. पण जेव्हा कुठे प्रशासन चुकले म्हणजे अभिनंदन केले म्हणून चुका काढायच्या नाहीत असे मला वाटत नाही.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

चुक नाकारलेली नाही आहे.

**रिटा शाह:-**

आपण आमचे जे अभिनंदनाचे काढले ते बरोबर नाही. आम्ही अभिनंदन करु. चांगले काम केले तर आम्ही अभिनंदन करु, हवे असल्यास पेपरला देउ, न्यूजला देउ आणि आम्ही स्वतः त्यासाठी इन्टरव्हयु देउ. आपण चांगली कामे केली की, आम्ही वेळोवेळी आपले अभिनंदन करु. पण जेव्हा गोषवा-याचा प्रश्न आला. सभेमध्ये आपण बसतो व आपल्याला जर दोन गोषवारे मिळाले नाही तर आपण असे रुलिंग देउ शकलो असतो की, बाकीचे विषय घेण्यात यावे आणि जे दोन गोषवारे नाही भेटले तर आपण पुढच्या सभेत घेउ.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

गोषवारा देण्यात आलेले आहे. पण उशीरा दिले गेले आहे.

**रिटा शाहः-**

उशीरा दिलेला आहे. ठिक आहे. पण आम्हाला स्टडी करायला वेळ नाही मिळाला तर आपण असेदेखील रुलिंग देउ शकता की, ते दोन विषय पेन्डीग ठेवून पुढच्या सभेत घेउ व बाकीचे विषय आपण मान्य करुन घेउ.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

याबाबत आपण निर्णय घेउ शकतो आणि आम्ही आमच्या चुका झाकण्याचा प्रयत्न केलेला नाही. आम्ही आस्थापनाला खुलासा विचारायला सांगितले आहे.

**रिटा शाहः-**

साहेब, कुठल्या माणसाने खोटे काम केले आहे किंवा चुका केलेल्या आहेत असा विषय नाही बोलत. ठिक आहे. आपल्याकडून कोणत्या कारणामुळे ते उशीरा झाले असेल असे नाही की, त्या माणसाने चुका केल्या आहेत, गुन्हा केला आहे. त्याच्यावर तुम्ही कार्यवाही करा असे बोलत नाही. पण त्या दोन विषयाचा गोषवारा आम्हाला वेळेवर मिळाला नाही. त्यामुळे त्याच्यावर अभ्यास झालेला नाही. तर ते दोन विषय आपण फक्त पुढच्या सभेत घ्या असा मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेखः-**

सभापती साहेब, काय आहे, आपण सांगितले की, आयुक्तसाहेबांचे या ठिकाणी अभिनंदन केले आणि त्यामध्ये प्रशासनाचे अभिनंदन समाविष्ट आहे. ती गोष्ट आपली बरोबर आहे. आमच्या सांगण्याचा उद्देश काय आहे. प्रशासनाचा जो कारभार आहे. तो व्यवस्थित चालला पाहिजे. नीटनेटका चालला पाहिजे. सन्मा. सभापतींच्या कारकीर्दीत आम्हाला या ठिकाणी प्रशासन चांगले दिसले पाहिजे आणि त्यांना अभिनंदन करताना आम्ही अशी अपेक्षा व्यक्त केली. तेव्हा त्यांनी सांगितले तुम्ही सांगा आम्ही त्याच्यावर कार्यवाही करु. नाईक साहेब, आपण फक्त दक्षता घेउ नका तर त्यावर कार्यवाही करा. ठाणे महानगरपालिका बघा, कल्याण डोंबिवली महानगरपालिका बघा. आपण बघतोय आयुक्तांनी एक-दोन जणांना कामाला लावले आहे असे एखादे एकतर उदाहरण होउ दे.

**मा.सभापतीः-**

प्रशासनाकडून आपल्याला सांगण्यात आलेले आहे की, यापुढे असे होणार नाही. ते योग्य ती दक्षता घेतील.

**धनराज अग्रवालः-**

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो, कालच मा. महासभा झाली आणि चुक झालेली दोन्हा सत्ताधारी पक्ष एकत्र आहे आणि जो प्रश्न स्थायी समितीमध्ये नव्हता. त्याच्यावर टिपणी नव्हती. तो प्रस्ताव पास करुन घेतला ते कसे काय झाले?

**मा. सभापतीः-**

हा निर्णय मा. महासभेचा आहे. त्याच्यावर मी येथे काय सांगणार. तो निर्णय महासभेत झाला आहे.

**धनराज अग्रवालः-**

येथे वाद चालला आहे. प्रशासन चांगले चालायला पाहिजे. प्रशासनाने तुमची बाजू घेतली असा माझा स्पष्ट आरोप आहे. प्रशासनाने काल सत्तारुढ पार्टीची बाजू घेतली.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

नाव ठेवण्याबाबत बाजू घेण्याचा प्रश्नच येत नाही. नाव हे सभागृहानेच ठरवायचे असते.

**धनराज अग्रवालः-**

तुमच्याकडे स्थायी समितीची टिपणी नव्हती. तुम्ही जबरदस्तीने करुन घेतला होता.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त साो.):-**

सन्मा. सभापती साहेब आणि सर्व उपस्थित स्थायी समितीचे सदस्य यामध्ये दोन गोषवारे आपणाकडे उशिरा आले अशी तक्रार सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी केली. यामध्ये मी स्वतः दिलगिरी व्यक्त करतो. संबंधित प्रशासनाच्यावतीने यामध्ये प्रामुख्याने पुर्नविनियोजनाद्वारे अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत हा निकडीचा विषय आहे. आज जर आपण पुर्नविनियोजन करुन दिले नाही तर शिक्षकांचा पगार या महिन्यात होणार नाही. उशीरा झाल्यानंतर ते आपल्या दारोदारी येतील आणि ते सभागृहातील सदस्यांनाच विचारतील की, आमचा पगार अजून झालेला नाही आहे. हा अत्यंत

महत्वाचा विषय आहे आणि संगणकीकरण हा विषय एखादा महिना पुढे गेला तरी चालेल. परंतु, यामध्ये शिक्षकांचा वेतनाचा जो प्रश्न आहे त्याबाबत सभागृहाने विचार करावा.

**मोहन पाटीलः-**

साहेब, माझा वैयक्तिक स्वभाव वेगळा आहे. सभागृह कशाप्रकारे चालते हे मला माहिती नाही. मी वैयक्तिकरित्या कधी अधिका-यांच्या बाबतीत बोलताना मला असंख्य यातना होतात. कारण आपण मागच्या वेळेलासुध्दा सन्मा. उपआयुक्त केळकर साहेबांनी सांगितले की, आमची चुक झालेली आहे. आम्ही चुक केली आपण ती चुक सांभाळा. त्यांनी क्षमा मागितली होती. तर क्षमा मागणे हा भाग वेगळा आहे आणि प्रशासनाच्या बाबतीत काम करणे हा भाग वेगळा आहे. विषय असा आहे की, जर दोन महिने तो विषय चालू आहे. तर आपण कधीही दोन महिन्यात हा विषय आणू शकला असता आणि पुर्नविनियोजनाचा विषय आहे आणि त्या विषयामध्ये आपण नेहमी भूमिका घेतलेली आहे. आम्ही मध्ये असे विषय आणले होते. या सभागृहाने तो निर्णय घेतलेला आहे. या सभागृहात तेच प्रशासन आहे. प्रशासन चेंज झाले नाही आहे. त्यांनी त्यावेळी सांगितले होते की, पुर्नविनियोजनाचा विषय घेताना सर्व विषय एकत्र घ्या असे आपण बोललो होतो आणि तुम्ही स्पेशल एक विषय आणता आणि त्याच्यानंतर त्यावर पुन्हा चर्चा करायची. त्याला अर्थ नाही. त्याचा उपयोग नाही. मी या विषयावर नंतर बोलणार होतो. उपआयुक्त साहेबांनी हा विषय काढला की, आमची चुक झाली . मागेपण आपली चुक झाली आणि तुम्ही दिलगिरी व्यक्त केली आणि हयाच्यापुढे काही होणार नाही व त्याबाबत आम्ही दक्षता घेउ अशा पध्दतीने आपण बोललात आणि आम्ही ते तसे केले. त्याच्यानंतर आता पुन्हा चुकी झालेली आहे आणि गोषवारा तुमचे अधिकारी देत नाहीत. अधिकारी त्याबद्दल त्या कामाची निकड करत नाही. या ठिकाणी सन्मा. सदस्या रिटा शाहने ठराव मांडलेला आहे की, आपण हे दोन विषय पुढे घ्या. जरुरी नाही की, दोन दिवसात त्याला काही फरक पडतो. दोनच विषय आहेत. आपण दोन दिवस पुढे घ्या.

**शिवमूर्ती नाईक(मा. उपआयुक्त सो.):-**

विषयावर जो निर्णय घ्यायचा आहेत. तो सभागृहाने घ्यायचा आहे. आम्ही घ्या म्हणून असे सांगणार नाही. परंतु, मुळ बेसीक असे आहे की, ज्यावेळेला आपण शाळा ताब्यात घेतो. त्यावेळेला ॲग्रीमेन्ट करुन दिलेले असते. हयांचे पे ॲन्ड ॲलाउन्समध्ये काही अडचणी निर्माण झाल्या तर आम्ही तो सोसू. म्हणजे ग्रॅन्ड येईपर्यंत. आम्ही ते शासनाकडे ॲग्रीमेन्ट करुन दिल्यानंतर शाळा आणि शिक्षक ताब्यात आलेले आहेत. त्या ॲग्रीमेन्टचे कंडीशन ब्रीच होते. त्यामुळे आपल्या इतर नगरपालिकेच्या कर्मचा-यांना वेळेवर एक तारखेला पगार करायचे आणि शिक्षकांना ग्रॅन्ट आली नाही म्हणून लेट करायचे हे बरोबर दिसणार नाही. कारण आपण शाळा ताब्यात घेताना ॲग्रीमेन्ट करुन शाळा ताब्यात घेतलेली आहे आणि ज्यावेळेला विषय येईल. त्यावेळेला तुम्हाला योग्य वाटेल तो निर्णय आपण घ्यावा. जसजसे आपले विषय येईल त्यावेळेला निर्णय घ्यावा.

**मोहन पाटीलः-**

साहेब, आपण बोललात ते बरोबर आहे. पण मला काय बोलायचे आहे. मी आपल्याशी या ठिकाणी चर्चा करताना बोललो हा विषय मी नंतर बोलायला पाहिजे. परंतु, विषय येथून सुरू होतो जर त्या दोन विषयाबद्दलचा गोषवारा आम्हाला उशिरा मिळालेला आहे. आम्हाला अभ्यास करता आला नाही म्हणून तुम्हाला बोललो दोन दिवसांनी सभा लावावी. त्या दोन विषयाला आणि जो पुर्नविनियोजनाचा विषय आहे. जेव्हा प्रशासनाने त्यावेळेत काम केले नाही आहे. दोन महिने त्यावेळेला प्रशासनाकडे विषय होता. त्यावेळी त्यावेळेत प्रशासनाने काम केले नाही. मग ती चुक आपण सभागृहावर का मारता? आपण अनेक वेळा चुक सभागृहावर मारलेली आहे.

**चंद्रकांत वैतीः-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, आपण एक ऑब्जेक्शन घेतले होते की, आपल्याला गोषवारे उशिरा मिळाले. आपण याबाबतीत अतिशय तंज्ञ आहात. अभ्यासाची आपल्याला आवश्यकता नाही तरी आपल्याला ४८ तासापैकी जास्त आधी हे गोषवारे मिळालेले आहेत. आज जी प्रशासनाची एक अवस्था आहे की, आपल्याला शिक्षकांचा पगार वेळेवर करण्यासाठी आपल्याला हा ठराव करणे गरेजेचे आहे आणि या शहरामध्ये आतापर्यंत आपण कुठल्याही बाबतीत असा विषय आला की, काही चुकीचे आहे किंवा शासनाकडून, आपल्याकडून काहीतरी चुक होत आहे असा कुठेही स्पष्ट उल्लेख होत नाही आणि चार विषयामधले दोन विषय असेच सुरु आहेत आणि

आपण हया विषयात पत्र दिले होते आणि आपल्याशी या विषयात संपर्क साधला होता आणि चर्चा ही झाली होती आणि त्याच्यामध्ये आपण ठरविले होते की, हा विषय घेणे आपल्याला गरजेचे का आहे. आपण लगेच दोन दिवसांनी सभा घेउ असे आपण म्हणता. आपण सभापती होता आपल्याला माहिती आहे की, स्थायी समिती हया बाबतीत निर्णय घेण किती महत्वाचे आहे आणि आजच्या आज निर्णय घेउन आपण जर त्याची अंमलबजावणी करु शकलो. आपण वारंवार पाहतो अनुदानाचा विषय आला. शिक्षकांना किंवा सानुग्रह अनुदान दयायचे होते. तेव्हा प्रत्येक सदस्याकडे हे शिक्षक फिरतात. आपण पाहिलेले आहे. जेव्हा वेतनवाढ दयायची होती. तेव्हा ही शिक्षक फिरले. स्थायी समितीच्या गेल्या वेळच्या सर्व सदस्यांना अनुभव आहे, प्रत्येक सदस्यांना सांगितले होते आणि त्यावेळेला मी ही या सभागृहात बाजूला बसून बाजू मांडली की, आपण शिक्षकांना सानुग्रह अनुदान दयावे. आधीच्या महासभेच्या वेळेलादेखील शिक्षकांनी तेच केले. उदया शिक्षकांचा पगार लेट झाला तर पुन्हा वृत्तपत्रकाच्या माध्यमातून आपल्या महापालिकेची बदनामी होईल. म्हणून आता प्रशासकीय अधिका-यांनी आपल्याला जसे उत्तर दिले आहे की, पुढच्या वेळेला अशी चुक झाली तर त्याबाबत योग्य ती कडक कार्यवाही केली जाईल. आपल्याला अपेक्षित अशी कार्यवाही केली जाईल. आपणच येथे बसून निर्णय घ्यायचा आहे की, आपल्याला त्यांच्यावर काय कार्यवाही करायची आहे. किंबहुना, तसे वाटत नसेल तर आजच आपण निर्णय घ्यायचा आहे की, आपल्याला काय कार्यवाही करायची आहे. परंतु, ते विषय पुढे ढकला आणि पुन्हा त्या शिक्षकांना त्रास होईल असे वागा. असे करु नये. प्रशासनाकडून चुक झालेली आहे. ते आपण कबुल करतोय. मी आपल्याला, सभापती साहेबांना विनंती करतोय की, सभा आपण आता चालू करावी.

**आसिफ शेखः-**

सभापती साहेब, या ठिकाणी सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजीनी सांगितले आहे. पण ते म्हणतात की, जे निर्णय स्थायी समितीवर घेतले त्याची ताबडतोब अंमलबजावणी व्हायला पाहिजे. स्थायी समितीने मागच्यावेळी निर्णय घेतलेला कर आकारणी संदर्भात ज्या इमारतींना पहिला टॅक्स लागलेला आहे. त्या इमारतींना त्याच दिवसापासून इतरांनाही लागेल. त्याची अदयापही अंमलबजावणी झालेली नाही. आपण येथे वेगळे वक्तव्य करतो ते वेगळे आणि प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. कथणी वेगळी आणि करनी वेगळी. हयाला काही अर्थ नाही. प्रत्येक वेळी तेच तेच चालायचे का?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

ठरावाच्या खालच्या दोन ओळी वाचून बघावे आणि आपण त्या दोन ओळी वाचल्या तर आपल्या लक्षात येईल की, ही मा. महासभेची मंजुरी घेण्यासाठी शिफारस केलेली आहे. त्याच्यापूर्वी अंमलबजावणी करा असा ठराव करा. तर अंमलबजावणी सुरु आणि तुम्ही सांगितल्यावर आम्ही आयुक्तसाहेबांकडे अहवाल पाठवला की, या ठरावाची अंमलबजावणी करायला मान्यता मिळावी. मा. महासभेची मंजुरी घ्या, असा ठराव झालेला आहे. महासभेचा ठराव झाल्याशिवाय अंमलबजावणी कशी करणार?

**आसिफ शेखः-**

शिफारस केली आहे. तर तातडीने विषय ठेवून टाका.

**मोहन पाटीलः-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी, आपण या ठिकाणी चांगले सांगितले. विषय असा आहे की, जेव्हा प्रशासन प्रत्येक वेळेला चुका करते आणि आपल्यासमोर उपआयुक्त दर्जाचे अधिकारी माफी मागतात. हयाच्यापुढे असे होणार नाही. आपल्याला ते चुकीचे वाटते. वैती साहेब, मला ते बरोबर वाटत नाही आणि आपण एखादा विषय देतो आणि गोषवारा देउ शकत नाही एखादा अधिकारी आपल्याला मग तो विषय आपण वेळेवर कशाला घ्यायचा. दुसरा विषय असा आहे की, एखादया सन्मा. सदस्याचे पत्र आले तर ते पत्र न वाचता सचिव साहेब त्या विषयाला सुरुवात करतात की, मिटींग सुरु झाली. ही पध्दत कुठे आहे. पध्दतीच्या प्रणालीला आमचा विरोध आहे. सभागृहाच्या कामकाजाला विरोध नाही आहे. सभागृहाचे कामगाज पारदर्शक पध्दतीने चालले पाहिजे हा विषय आहे आणि जर तुम्ही बोलता ४८ तास अगोदर आम्ही तुम्हाला गोषवारा दिलेला आहे. मग ४८ तासाच्या अगोदर तुम्हाला पत्र आले. तेव्हा प्रशासनाने त्या सन्मा. सदस्यांना विचारणा केली पाहिजे की, आम्हाला आपल्याकडून पत्र प्राप्त झाले आहे आणि या पत्रावर आपले काय विचार आहेत. हा विचार

आहे तर आपण हयाच्यावर काय बोलता, काय बोलू शकतो ही जाण प्रशासनाला नाही आहे का? आमचे म्हणणे हे आहे, येथे येउन तुम्ही तो विषय काढला ही नाही डायरेक्ट आपण सभा सुरु करतात. ४८ तास अगोदर आम्ही आपल्याला पत्र दिले आहे. त्या पत्राच्या अवधीमध्ये आपण सन्मा. सदस्यांना बोलू शकता की, असे पत्र आलेले आहे त्यावर निर्णय घ्यायचे आहेत. त्याची विचारणा करा. एखादे पत्र दिल्यानंतर ते पत्र सन्मा. सभागृहाचे किंवा पालिका सभागृहाचे सन्मा. सदस्य आहेत. याचा विचार केला पाहिजे. जनरल नागरिक आपल्याला पत्र देतात. आणखीन कुठली पत्र आपल्याला येतात तर ते पत्र आपण ठेवतो त्याला हरकत नाही. मला नियमावर बोट ठेवायचा नाही आहे. फक्त एवढेच की, ते पत्र आल्यानंतर तुम्ही सन्मा. सदस्यांना बोलले पाहिजे सभापती महोदय, प्रशासनाला आपण सांगितले पाहिजे. मी पत्र देताना सभापती महोदय, कॉपी टू प्रशासन सचिव, ॲडरेस टू सचिव आणि सी.सी.टू सभापती असे चार पत्र ॲल्टमेट दिली आहेत. मग त्या पत्राची विचारणा करायची नाही अशी पध्दत आहे का? सभेच्या एक तास अगोदर आम्ही तुम्हाला पत्र दिले नाही. सभेच्या ४८ तासापूर्वी आम्ही तुम्हाला पत्र दिले आहे. सन्मा. सदस्य वैतीजी हयांनी सांगितले की, ४८ तास तर आम्ही मानतो. पण आपण पध्दत अवलंबली गेली आहे की, ४८ तास अगोदर गोषवारा गेला पाहिजे. आपण बोलले पाहिजे. हयाच्यावर काहीतरी विचारणा केली पाहिजे. विषय असा आहे की, तो विषय घ्या किंवा घेउ नये असा विषय नाही. या विषयाला एखादा सन्मा. सदस्य पत्र देतो. त्या पत्राची विचारणा तुम्ही केली पाहिजे. विचारणा आपण केली नाही. म्हणून मला बोलायला लागले की, पण आम्ही दिले आहे. ते आपण कचऱ्याच्या टोपलीत टाकायचे. त्याचे कोणत्या पध्दतीने पोस्टमॉर्टम करायचे. हा सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे. हा विषय वेगळा आहे. परंतु, आपण त्या विषयावर बोला. थोडीशी वाच्यता तरी करा. पत्र आलेले आहे. आपण टिपणी, गोषवारा देउ शकलो नाही असा तो विषय होता.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, मी सभागृहाची दिलगिरी व्यक्त केली. याचा अर्थ हा नाही की, संबंधित अधिकारी येथे उपस्थित आहेत. त्यांनी हयाची खबरदारी घ्यावी आणि याचा खुलासा त्यांनी वैयक्तिकरित्या दयावयाचा आहे आणि अशा पध्दतीने मी तुम्हाला लेखीसुध्दा दिलेले आहे. कोणताही विषय सभागृहापुढे येण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर नगरसचिवाकडे त्याची टिपणी दयायला पाहिजे, अशा तऱ्हेची टिपणी संबंधित शिक्षण विभाग आणि संबंधित संगणकीकरण विभागाकडून पोहोचलेली नाही. त्यांनी त्याची दखल घ्यावी आणि या सभापतींच्यावतीने मी त्यांना समज देत आहोत की, यापुढे कोणत्याही तऱ्हेचा गोषवारा सादर करण्यापूर्वी त्यांचा विषय असल्यानंतर स्वयं स्पष्ट अशी टिपणी पंधरा दिवस अगोदर जर नगरसचिव यांच्याकडे आली नाही तर तो विषय घेतला जाणार नाही आणि जर कर्मचाऱ्यांचा पगार मिळाला नाही तर वैयक्तिक त्या अधिकाऱ्यांच्या घरावर त्या शिक्षकांना पाठवा. ते वैयक्तिकरित्या ते जबाबदार राहतील.

**मा. सभापती:-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांच्या भावना व्यक्त करतो आणि आपण त्या विषयावर बोललात तर यापुढे सर्व गोषवारे पूर्णतः मिळाल्याशिवाय विषय घेणार नाही असे सर्वांना सांगितले आहे.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती साहेब, आपण जे आता बोललात गोषवारे मिळाल्याशिवाय विषय घ्यायचे नाही. ही पध्दती चुकीची आहे. एखादया सभेला या शहरामध्ये अधिकारी आपल्यापेक्षा फार हुशार आहेत, तंज्ञ आहेत. इतर बाबतीत प्रशासकीय कामाच्या बाबतीत मी बोलत नाही. तो तुम्हाला गोषवारा देणारच नाही. म्हणजे तो विषय येणारच नाही. अदरवाईज जर सेटींग लागून एखादा विषय आणायचा नसेल तर त्याचा फार चांगला उपयोग होईल. ही जी पध्दती आहे ॲन्ड टॅक्टीस आहे ही काही ठिकाणी ॲडॉप केली जाते. मुद्दामहून असे करायचे तर ते तसे होते. त्याकरिता स्थायी समितीच्या सभापतींनी जे आदेश दिलेले आहेत. ते कोणीही असो. मग आपण स्वतः हा जर विषय गेल्या वेळेला आला असता तर मोहन पाटील असते किंवा यापुढचे जे सभापती असतील ते. प्रशासनाने जे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांच्यापेक्षा खालचे आणि अगदी खालच्या थरापर्यंत जेवढे अधिकारी आहेत. त्यांनी जे पदाधिकारी आहेत. सन्मा. सदस्य, पदाधिकारी, महापौर आपण स्वतः या सगळयांचा आदर कुठेतरी ठेवला पाहिजे. गेल्या वर्षभर मोहन पाटील साहेबांनी फार चांगले मांडले. मी गप्प बसून सगळे ऐकतोय. पण हयाच चुका मोहन पाटलांच्या कारकीर्दीमध्ये वारंवार होत होत्या. तेव्हा ते आपल्या या खुर्चीवर बसून आम्हाला कंव्हेन्स करायचे आणि केळकर साहेबांसारखे अधिकारी बाकीच्यांना क्षमापन

करत राहायचे तर असे चालत असेल तर या सभेला क्षमापन करुन टाका आणि सभा घेण्याचे बंद करुन टाका. आम्ही आमचे वेळ काढून येथे यायचे आणि दाताच्या कण्या करायच्या.

**मा. सभापतीः-**

सभा घेण्याकरिता मी सक्षम आहे.

**मिलन म्हात्रेः-**

आपल्या गेल्याच्या गेल्या सहा तारखेच्या सभेचे कसे उल्लंघन झाले ते मी तुम्हाला सांगतो. काल मी ई टि.व्ही. वर आयुक्त साहेबांचा इन्टरव्हयु बघितला. हाउस टॅक्सच्याबाबतीत. आयुक्तांनी जाहिररित्या क्लिअर केलेले आहे की, आमची महानगरपालिका हाउस टॅक्स घेण्यामध्ये अकार्यक्षम असून ब-याच कोटीचा आम्हाला लॉस आहे आणि तो आम्हाला भरून काढायचा आहे. आयुक्तांनी प्रशासनाच्यावतीने जाहिररित्या हे कबूल केलेले आहे की, आम्ही आमचे हे टारगेट गाठण्याकरिता अकार्यक्षम ठरलो. म्हणजे हे अगदी क्लिअर आहे की, त्यावेळेला सभापती साहेबांनी एक महिन्यापूर्वी जो निर्णय घेतला तो अगदी योग्य होता. महापालिकेच्या आर्थिक वसुलीकरिता जी घटलेली आहे. त्याच्याकरिता आपण तो ठराव केला की, लगेच वसुला करायला आपण सुरुवात करावी. सहा तारखेला ठराव पास झाला. अन्य मोठया मोठया बांधकामाचे ठराव स्थायी समितीचे सदस्य या नात्याने अधिकारी लगेच येथेच सहया करतात. परंतु, त्या ठरावावर सही करायला प्रशासनाला वेळ मिळाला नाही. त्यानंतर सहा तारखेला मंजूर झालेला ठराव आम्हाला २४ तारखेला ॲटेस्टेड करुन मिळाला. जवळजवळ तीस ते बावीस दिवस या ठरावावर कोणाचेही लक्ष नाही आणि ज्या दिवशी ठरावावर सही झाली. त्या दिवशी शिवमूर्ती नाईक साहेबांनी सांगितले की, ठराव झालाच नाही. कारण तो त्यांच्याकडेही गेला नव्हता. आता हयाच्यामध्ये त्यांचेही काय होते, केळकर साहेबांचे काम होते की, आर्थिक फायदयाचा दृष्टिकोनातून हा ठराव पास झाला आहे. आताच्या आता लगेच सहया वगैरे करुन आपण ओ.के. करा आणि डिपार्टमेन्टला जाउ दया. पण हे झालेच नाही. त्याचे इम्प्लीमेन्टेशन झालेले नाही. त्याचे मला वाईट वाटते. आज हा एक ठराव मी आपल्यापुढे देत आहे. तो सचिव साहेबांनी सभागृहाला वाचून दाखववा. त्यात दोन्ही सदस्यांच्या सहया आहेत.

**चंद्रकांत वैतीः-**

मिलन म्हात्रे साहेब आपण सभेला सुरुवात केल्यानंतर हे पत्र वाचले तर अधिक योग्य राहिल.

**मिलन म्हात्रेः-**

ठिक आहे.

**मोहन पाटीलः-**

साहेब, सभेला सुरुवात करा. पण एका सदस्याने बोलल्यानंतर त्या सदस्याने त्या सदस्याच्याविषयी बोलण्यापेक्षा आपण काय करायला पाहिजे आणि आपण काय केले पाहिजे हयाचे विषय मांडावे.

**चंद्रकांत वैतीः-**

पाटील साहेब, आपल्या ज्या भावना आजच्या सभागृहाचे की, अधिका-याने ठरावावर अंमलबजावणी केली पाहिजे. आसिफ शेख हयांनी अतिशय जोरात सांगितले की, अंमलबजावणीही होत नाही. या बाबतीत आपण मिलन म्हात्रे साहेबांच्या माध्यमातून अतिशय कर्तव्यात कसूर केल्यानंतर काय होउ शकते आणि हया बाबत प्रशासनाने काय काय नोंदी घेतल्या पाहिजे अशा आशयाचा स्थायी समितीच्या ठरावाच्या निर्णयात बदल करण्याचा जो ठराव आणलेला आहे. तो सभेनंतर वाचल्यावर आपल्याला कल्पना येईल की, स्थायी समिती किती सक्षमतेने काम करु इच्छिते. एक चांगला ठराव आपल्यासमोर इतिवृत्ताचे वाचन केल्यानंतर सचिवांनी त्या ठरावाचे वाचन करावे आणि त्यानंतर आपण सांगा की, स्थायी समितीला ही वाटते जशी आपली भावना आहे तशी प्रत्येक नगरसेवकाची भावना आहे, प्रत्येक नागरिकाची भावना आहे आणि अधिका-यांनादेखील आपल्या कर्तव्यात कसूर करता कामा नये याची जाणीव राहिल. अशाप्रकारचा ठराव आणलेला आहे.

**मोहन पाटीलः-**

सन्मा. सभापती महोदय, वैतीजी आणि म्हात्रेजी आपले इतिवृत्तांतावर चर्चा सुरु झाल्यानंतर चर्चा होणार आहे. जर आपल्याला ठरावावर बोलायचे आहे आणि ठराव आम्ही वाचला नाही. ठराव अतिशय चांगला असेल आणि दिशा देणारा ठराव असेल. हयाच्यामध्ये दुमत नाही. परंतु, दिशा बदली करणारा जर तो ठराव असेल चांगली दिशा तर तशा विषयाचा आपण विषय आणावा. कधी

कधी म्हात्रेजी चांगल्या गोष्टी करतात. त्यांच्या दाताच्या कण्याचा विषय सोडला तर त्याचे विषय अतिशय चांगले असतात. त्याबद्दल दुमत नाही. वैतीजी तो जो विषय असेल तो विषय वाचा नंतर आणि सभेमध्ये ठराव करुन तो विषय घेउन या. दुसरी गोष्ट म्हणजे आयुक्त साहेब कळकळीने बोलले तर एक वाक्य आपण सन्याशीव साहेबांना बोलायला सांगा.

**मा. सभापतीः-**

मोहन पाटील साहेब ठराव आल्यानंतर आपल्याला माहिती पडेल की, कसला ठराव आहे. चांगला ठराव आहे. अधिका-यांवर काय कार्यवाही केली पाहिजे?

**मोहन पाटीलः-**

आपण हा विषय वाचा. त्याला मान्यता दया आणि विषय घेउन आपण रितसर ठराव मान्य करुन घेउ.

**रिटा शाहः-**

सचिव साहेब, आपण मोहन पाटील हयांचे पत्र वाचले. माझे दोन पत्र आहेत ती कुठे आहेत व ते मी स्थायी समितीच्या संबंधित पत्र दिले आहे. तुम्ही त्याच्यावर काय दुरुस्ती करणार.

**प्र. सचिवः-**

आपण दुरुस्ती सुचविलेले पत्र आमच्याकडे आहे. दुरुस्ती करण्यात येईल.

**रिटा शाहः-**

स्थायी समितीच्या संबंधित दिले आहे. त्याच्यात तुम्ही काय दुरुस्ती करणार. मी तीन दिवसापूर्वी ते पत्र दिले आहे. ते आपण येथे सभेमध्ये आणायला पाहिजे आणि पत्राचे वाचन झाल्यानंतरच आपण सभेला सुरुवात करायला पाहिजे.

**चंद्रकांत वैतीः-**

इतिवृत्तान्ताला सुरुवात करावी.

**रिटा शाहः-**

वैती साहेबांनी रुलिंग दिले आणि सचिवसाहेब तुम्ही सभा चालू करणार असे नाही चालत. ते पण सदस्य आहेत आणि आम्ही पण सदस्य आहोत. तुम्ही माझ्या दोन पत्राचे वाचन करा. तुम्ही निदान सभेत बोलायला तरी पाहिजे की, सदस्यांचे पत्र आले आहे.

**प्र. सचिवः-**

मोहन पाटीलसाहेब हयांचे जे पत्र होते ते सभा पुढे घेण्याविषयी पत्र होते आणि आपले पत्र इतिवृत्तान्त दुरुस्तीबाबत होते.

**रिटा शाहः-**

माझे दोन पत्र आहेत. एक पत्र इतिवृत्तान्त दुरुस्तीचे आणि दुसरे विषय मागच्या सभेच्यापूर्वीच्या सभेत आपण जो ओव्हर ब्रीज आणि काशिमीरा रोडसाठी जी कमिटी बनवली त्या कमिटीवर तुम्ही आम्हाला घेतले नाही आणि सोळा सदस्यांवर सभापती साहेबांनी असे बोलले की, बाकीचे सदस्य येत नाहीत. म्हणून मला हे करावे लागते. बाकीचे सदस्य काम करत नाही असे निदर्शनात आलेले आहे.

**मा. सभापतीः-**

बाकीचे सदस्य काम करत नाहीत असे मी कधीही बोललेलो नाही. सर्व पक्षाचे येथे आहे. त्यातून एक-एक पक्षाचे सदस्य घ्यावेत असे मी बोललो.

**रिटा शाहः-**

अशी कमिटी बनवायचे कायदेशीर अधिकार आहेत का? असे पत्र मी टाकलेले आहे आणि ती कमिटी बरखास्त करा अशी मी मागणी केलेली आहे आणि तुम्ही ते पत्र येथे का आणले नाही? स्थायी समितीवर सर्व पक्षाचे सदस्य आहेत.

**मा. सभापतीः-**

सर्वांना पाठवायला ते तिथे यायला तयार आहेत का?

**रिटा शाहः-**

आम्ही यायला तयार आहोत. आपण आम्हाला तिथे घ्या असे काही ठरले नाही की एका पक्षाचे एकच सदस्य घ्यायचे.

**मा. सभापतीः-**

प्रशासनाला तेवढा वेळ नाही.

**रिटा शाहः-**

आम्हाला वेळ आहे. तुमच्या सभेत यायला.

**आसिफ शेखः-**

सभापती साहेब, या ठिकाणी रिटा शाह मॅडम, जो मुद्दा उपस्थित केला तर खरे म्हणजे नोंद घेण्यासारखा एक प्रकार आहे की, आपले सभापती स्थानी कॉंग्रेस पक्षाचे सभापती आहेत आणि कॉंग्रेस पक्षाच्याच सन्मा. सदस्या या ठिकाणी हरकतीचा मुद्दा उपस्थित करत आहेत.

**रिटा शाहः-**

आपण जी कमिटी नेमली आहे. ती कायदेशीर आहे का?

**मा. सभापतीः-**

जो निर्णय झाला आहे. त्याच्यावर आता काही होणार नाही.

**रिटा शाहः-**

निर्णयाचा प्रश्न नाही. ते कायदेशीर आहे का?

**मा. सभापतीः-**

मी आत आरोग्याचीदेखील कमिटी बनवणार आहे आणि अशाप्रकारे एक-एक कमिटी नेमणार आहे. त्याच्यामध्ये कोणाला यायचे असेल तर ते येउ शकतात.

**रिटा शाहः-**

आरोग्याची बनविता ते वेगळे आहे. आपण नुसत्या एका कामासाठी कमिटी बनविता ते बरोबर आहे का?

**आसिफ शेखः-**

आपण जी समिती स्थापन केली. त्याला वैज्ञानिक काही आधार आहेत की नाही. त्याचा खुलासा उपआयुक्त साहेबांनी करावा. कोणत्या अधिनियमाद्वारे ती समिती स्थापन केली.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

समिती स्थापन करण्याचे अधिकार आहे.

**आसिफ शेखः-**

कोणाला आहे. स्थायी समितीचा आहे का मा. महासभेचा आहे. अधिनियम आहे ते वाचून दाखवा.

**मोहन पाटीलः-**

विषय तो नाही. समिती स्थापन करताना विषय घेतला पाहिजे की नाही. का असे आमसभेमध्ये विषय चालला आणि समिती स्थापन केली असा त्याच्यामध्ये कायदा आहे का? केळकर साहेब सभा चालू आहे आणि मला असे वाटले की, समिती स्थापन करायची आहे तर समिती कोणत्या कायदयाने आपण स्थापन करु शकतो. विषय समितीचा आणायला पाहिजे की, विषय समितीचा आला पाहिजे. असा विषय आहे का? कायदयाने विषय तो आहे. समिती स्थापन करण्याचे अधिकार सभापतींना या सभागृहात आहेत. समिती नेमताना ती विषयाने आणली पाहिजे का? नाही आणली पाहिजे का, आम्हाला वाटले चर्चा सुरु झाली बोट वर करा ही समिती स्थापन केली असे कायदयात आहे का? आपण खुलासा करा. समिती स्थापन करण्याचे अधिकार सभापती महोदयांना आहे हा विषय तिचे आहे. पण असा अधिकार आहे का, आपल्याला वाटले आता आपल्याला समिती स्थापन करायची आहे. त्यांनी ते विषय आणले पाहिजे का, न आणता ते विषय नसताना आपण समिती स्थापन करायची का?

**आसिफ शेखः-**

सभापती साहेब, आपण जी समिती स्थापन केली. त्यामध्ये दुमत नाही. परंतु, तो रितसर विषय विषयपत्रिकेवर आणला पाहिजे होता. कारण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये आपण सदरची समिती स्थापन करु करतो. साहेब, आपण एक नाही तर दहा समिती स्थापन करा. तुमची भावना चांगली आहे. प्रशासनाला सक्षम करण्यासाठी चांगली दिशा देण्यासाठी आपण काम करत असाल तर आमचे तुम्हाला समर्थन राहिल. परंतु, ते विषयपत्रिकेवर रितसर येउ दे. आता ते सांगतात की, ठराव आणला. विषय नसताना ठराव कसा येईल.

**मिलन म्हात्रे:-**

मागच्या वेळेला नालेसफाई संदर्भामध्ये सन्मा. सभापती मोहन पाटील येथे सभापती या पदावर होते. त्यावेळेला असाच एक महत्वाचा विषय आला होता आणि त्यामध्ये त्यांनीसुध्दा अशीच एक समिती पटकन बनवली होती. त्याचा शहराकरिता चांगला असा उपयोग झाला की त्याच्या दुस-या दिवसापासून आम्ही आरोग्य अधिकारी डॉ. बावस्कर यांच्याबरोबर संयुक्तपणे समिती गठीत केली. त्यांची नावे डिक्लेअर केली. आम्हाला एक वाहन दिले. समितीसाठी काय कार्यकक्ष असतील ते डिक्लेअर केले आणि त्याचा एक चांगला परिणाम या शहराला झाला की, जवळजवळ करोडो रुपयाची नालेसफाईचे ठेके कसे चाललेले आहेत. हे आम्ही सर्व पायी फिरुन बघितले व कोण आले? कोण आले नाहीत. त्याच्यावर आम्हाला टिका करायची नाही. पण त्या समितीमध्ये मी एक सदस्य होतो आणि माझे काम मी चोख केले. मी त्या कामापासून सॅटीसफाईड आहे. त्याच्यानंतर त्या समितीने काय काम केले. त्याचा उहापोह परत या सभागृहात झाला. त्याचा रिन्हयु घेतला गेला आणि त्या समितीने काय काय काम केले हे डॉक्टरसाहेबांनी सर्व क्लेरिफिकेशन दिले. संपूर्ण सभागृह त्या वेळेला सॅटीसफाईड झाले आणि एक चांगला रिझन त्याच्यापासून निघाला. त्यावेळेला सभापती मोहन यांनी त्यावेळेला घेतलेला निर्णय व्यवस्थित होता. हे हयाच्यावरुन सिध्द झाले. नगरपालिकेच्या पैशाचा अपव्यय कुठेही झाला नाही. जी कामे झाली नव्हती. ती आम्ही लगेच करुन घ्यायला लावली आणि चांगलेच काम त्याच्याने केले. त्यावेळेला आम्ही काही असे ऑब्जेक्शन काढले नाही की, तुम्ही ठराव का नाही घेतला किंवा विषय का नाही घेतले. हया अगोदर अशी समिती आपण गठीत केली होती. त्यांचे कार्यदेखील चांगले झाले. त्याची आठवण करुन दिली.

**रिटा शाह:-**

हा विषय मी उचलला आहे आणि आपल्याकडे मिलन म्हात्रे साहेबांनी जे काय चांगले वक्तव्य केले. मोहन पाटील साहेबांनी हे केले, ते केले तर मोहन पाटील साहेबांनी काय चुका केले तर त्यांच्यावेळी त्यांनी ऑब्जेक्शन घ्यायचे होते. त्यांनी ऑब्जेक्शन घेतले नाही आणि त्यांनी मान्य केले. पण आता आम्हाला समजले आहे.

**मा. सभापती:-**

विषयाला सुरुवात करण्यात यावी.

(सभागृहात गोंधळ दुपारी ठिक ११.४० ला)

**मोहन पाटील:-**

सभापती महोदय, विषय असा आहे की, जेव्हा सन्मा. सदस्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. त्याच्यावर बोला आणि जर तुमचा विषय वेगळा असेल, आमचा विषय असा आहे की, जेव्हा तुम्ही एखादी समिती गठीत केली. त्यांनी विषय असा मांडला की, एखादी नैसर्गिक आपत्ती आहे आणि विषय पावसाचा अतिवृष्टीचा विषय होता. त्यावेळी आपण समिती स्थापन करुन घेतली पाहिजे. हा विषय वेगळा आहे आणि जेव्हा आर.ओ.बी. विषय या ठिकाणी आल्यानंतर त्या आर.ओ.बी. विषयावर आपण भाष्य केले पाहिजे असे आपल्याला या विषयाची समिती स्थापन केली पाहिजे. आपण पुढच्या वेळेला विषय आणा आणि करुन घ्या. नैसर्गिक आपत्ती आहे. तेव्हा सभेची वेळ बघायची गरज नाही आहे. सन्मा. सदस्य म्हात्रेजीनी जे मांडले त्याच्यावर बोलत होतो. ते तुम्ही ऐकून घ्या.

**मा. सभापती:-**

त्या दिवशी आपण समिती हयाच्यासाठी नेमली की, अजून रोड होत नाहीत. म्हणून आपल्याला समिती नेमावी लागली. समिती नेमली त्याचवेळी विरोध करायचा होता.

**नितीन ठाकूर:-**

सन्मा. सदस्या रिटा शाह या कॉंग्रेस पक्षाचे आहेत आणि त्यांनी पत्र दिलेले आहे. पुन्हा विषय निघालेला आहे. सभापती साहेब, सन्मा. सदस्या रिटा शाह आपल्या पक्षाचे आहेत. त्यांनी पत्र दिलेले आहे आणि ते पत्र तुम्ही दाबता म्हणून विषय निघालेला आहे.

**मोहन पाटील:-**

विषय अजेन्डावर दयायला आम्ही मान्य करतो. पण नैसर्गिक आपत्ती असेल त्यावेळी पण ही नैसर्गिक आपत्ती नाही आहे. त्या रस्त्याचे काम पूर्ण होत आलेले आहे. तर ती नैसर्गिक आपत्ती होती का?

**चंद्रकांत वैती:-**

या समितीच्या विरोधात असतील तर मतदार घ्यावे.

**आसिफ शेख:-**

चंद्रकांत वैतीजी, आपल्याला अडचणीत आणतील आणि आमची इच्छा नाही. आपण कृपया ऑर्डर देउ नका.

**धनराज अग्रवाल:-**

विषय कुठला आहे आणि कुठली चर्चा चालवली आहे. आपणाला सभा चालू करायची आहे का नाही.

**आसिफ शेख:-**

सभा आपण जेव्हा बोलवतो तेव्हा खाली लिहिले आहे की, मा. स्थायी समितीच्या आदेशानुसार ही सभा बोलाविली आहे. स्थायी समिती म्हणजे संपूर्ण सदस्य आले. एका सदस्याने चालणार नाही. ही का महासभा नाही आहे. आपल्याला मनाप्रमाणे करायला येथे सोळाच्या सोळा सदस्यांना महत्व आहे.

**मा. सभापती:-**

जे विषय सभेसमोर आले आहेत. तेच विषय घ्यायचे आहेत.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, तेच विषय घ्यायचे आहेत.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. सभापती:-**

विषयपत्रिकेवरील विषय संपल्यानंतर आपल्याला जी चर्चा करायची आहे. ती चर्चा आपण विषय संपल्यानंतर करु या.

**आसिफ शेख:-**

विषयपत्रिकेवर जे विषय आहेत. त्या विषयाप्रमाणे घ्या.

**रिटा शाह:-**

माझ्या बोलण्याचा अर्थ असा आहे की, कुठलीही सभा चालवताना पत्र आल्यावर त्याचे वाचन करायचे की नाही करायचे अशी पध्दत आहे का नाही.

**प्र. सचिव :-**

दुरुस्तीचे पत्र आले आहे. तर ती दुरुस्ती करण्यात येईल.

**रिटा शाह:-**

माझे दोन पत्र आलेले आहेत.

**प्र.सचिव:-**

ते दुसरे पत्र माझ्याकडे आलेले नाही.

**रिटा शाह:-**

तुमच्याकडे आले नाही असे बोलून चालणार नाही. सचिव साहेब नाहीतर मी तुमच्यावर आरोप लावेल. तुम्हाला माझे एक पत्र मिळते आणि दुसरे पत्र मिळत नाही. आपण हे असे बोलायचे नाही. मग दुसरे पत्र कुणाकडे गेले. त्याचे आपण उत्तर दया. माझी सभा चालविण्याकरिता ऑब्जेक्शन नाही. धनराज अग्रवाल साहेबांनी सांगितले विषय नाही. आपणाला माझे पत्र आणायचे आहे का नाही ते सांगा. पत्राचे वाचन सभा सुरु होण्यापुर्वी करायचे असते.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. सभापती:-**

पत्र येईपर्यंत सभा चालू करावी.

**रिटा शाह:-**

वैती साहेब येथे रुलिंग देत आहेत की, पत्र फेटाळून टाकले. त्यांना काय अधिकार आहे असे रुलिंग देण्याचे. वैती साहेब काय सभापती आहे का?

**नितीन ठाकूर:-**

सभापती साहेब, या स्थायी समितीमध्ये नगरसेवक निवडून आलेले आहेत. सगळयांना मान-पान आहे. प्रत्येक नगरसेवकाच्या पत्राला व्हॅल्यु आहे.

**मा.सभापती:-**

पत्र त्यांना आणायला सांगितले आहे.

**नितीन ठाकूर:-**

सभागृहामध्ये नगरसेवकाची व्हॅल्यु असायला पाहिजे. मग अपक्ष असो किंवा कोणीही असो.

**मा. सभापती :-**

पत्र घेउन येतात म्हणून त्यांनी सांगितले आहे. मोहन पाटील आपण सभापती होता आणि आपल्याला हे चांगले दिसत नाही.

**मोहन पाटील:-**

मला चांगले दिसण्याचा प्रश्न नाही. तुम्ही त्याचा ठराव मांडा. चर्चा चालू आहे. तुम्ही तिसरा विषय आणला. वैतीजींनी रुलिंग दिली. रुलिंग आपण दया.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, या ठिकाणी आपण जी विषयपत्रिका काढली. त्यावर खाली लिहिले आहे, मा. सभापतींच्या आदेशानुसार आणि ठराव हे बहुमताने पास होतात.

**चंद्रकांत वैती:-**

आपली जी सुधारणा असेल ती आपण सांगा. मोहन पाटील साहेब, आपल्या भावना लक्षात आहेत. पण दुसऱ्या सदस्यांना बोलायचे आहे. आपण आपल्या कारकीर्दीत निर्णय घेतलेला आहे की, असे महत्वाचे विषय येतील. ते सभेच्यानंतर चर्चा करायची आहे. सभापतींनी आपल्याला वारंवार सांगितले की, सभेनंतर चर्चा करु. अधिकारी कर्तव्यात कसूर करतात. या बाबतीत ठराव आणायचा आहे. तुम्ही सभा सुरु करायला मान्यता दिल्यानंतर अशा प्रकारची भाषा वापरणे योग्य नाही. हे बघा, सभापती म्हणून तुमचा कार्यकाल हया मिरा भाईंदर शहरात सगळयात मोठा आहे. आपण नउ ते दहा वेळा सभापती होता. आपला अनुभव किती मोठा आहे. आपल्याकडून असे अनुचित वर्तन शोभत नाही. मोहन पाटील साहेब, सभागृहाला मार्गदर्शन करणारे व्हा. तुम्ही अशा प्रकारे लोकांची दिशाभुल करण्याचे सोडून दया. मोहन पाटील साहेब, आपल्याला विनंती करतोय. आपणच सांगितले की, सभा सुरु करा. सभेपुढे तो विषय आणा. जेव्हा आपण सांगता की, नैसर्गिक आपत्ती होती. त्यावेळेला आपण आणलेला आहे. ही समिती म्हणजे ह्याला किती अधिकार आहेत, फक्त पाहणी करण्याचे अधिकार आहेत आणि जेव्हा आपण समिती गठीत केली. फ्लाय ओव्हर ब्रीजसाठी आणि रस्त्यासाठी त्यावेळेला काय चर्चा झाली की, प्रत्येक पक्षाने आपाआपला एक-एक सदस्य दयावा. तेव्हा आपण स्वखुशीने तुमच्यातला एक सदस्य दिला होता. मग तेव्हा आपल्या भावना ठेवल्या असता की, हा विषय आपण रितसर सभागृहापुढे आणला पाहिजे तर तेव्हा तो पटलावर आला असता. तेव्हा कोणी विरोध केला होता का? आणि या विषयावर चर्चा करायची आहे तर आपण महत्वाचे विषय सभेनंतर चर्चा करतो. त्याप्रमाणे करायला कुठल्याही प्रकारची हरकत नाहीत. मग आपण इतर सदस्यांना बोलून देत नसाल तर ते योग्य नाही. आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे ते आपण सांगा. त्या विषयाचे उत्तर दिले जाईल. त्यानंतर आपण परत गप्प बसावे. एकाच्या मागे एकाने प्रश्न विचारुन सभा पुढे पुढे ढकलायची असे प्रोव्हिजन आहे का?

**रिटा शाह:-**

सभापती साहेब, तुमच्यावर माझा संपूर्ण विश्वास आहे. परंतु, मी माझ्या स्वतःच्या कानांनी ऐकले की, वैती साहेब बाजूला बसून नलावडे यांना बोलतात की, ते पत्र फेटाळून टाकले असे सांगा, अशी रुलिंग दया. माझा तुमच्यावर संपूर्ण विश्वास आहे. पण हे बाजूला बसून विश्वासाचा भंग करतात, अशा दादागिरी चालवायची नाही. त्यांना रुलिंग देण्याचा अधिकार नाही. ते ही येथे सदस्य आहेत आणि त्यांच्याप्रमाणे जर तुम्हाला चालायचे असेल तर आम्ही तुमच्यावर अविश्वास दाखवणार.

**मोहन पाटील:-**

सभापती महोदय, मला काय बोलायचे आहे. मी तो समितीचा विषय काढला नाही. समितीचा मी माझा खुलासा केलेला आहे. विषय असा झाला की, एक विषय आपण गदारोळमध्ये १ नंबर मंजूर केला, दुसरा विषय आला तो मंजुर, तिसरा विषय बोला आणि सन्मा. सदस्य बोलले की, आम्हाला मागच्या विषयावर बोलायचे आहे. मग आपण असेच विषय मंजूर करुन टाका आणि सभा गुंडाळायची असेल तर चालेल. त्या सभेच्या हया कामकाजावर माझा आक्षेप आहे. मी समितीचा खुलासा देउन गप्प बसलो.

**आसिफ शेखः-**

साहेब, अजून इतिवृत्तांत झालेले नाही. त्याला मंजुरी कोणी दिली आहे.

**रिटा शाहः-**

माझ्या पत्राचे काय झाले? सचिव साहेब, असे जे आपण करता तर माझा आपल्यावर आरोप आहे. तुम्ही माझे एक पत्र घेता आणि दुसरे पत्र का मिळत नाही.

**प्र. सचिवः-**

डिस्पॅचवरुन पत्र माझ्याकडे आलेच नाही तर मला कसे समजणार. डिस्पॅचकडून माझ्याकडे यायला पाहिजे. जे पत्र आले त्याची नोंद घेतलेली आहे.

**रिटा शाहः-**

कार्यालयातून पत्र कुठे जातात. त्याच दिवशी दोन्ही पत्र एकत्र दिलेली आहेत.

**मा. सभापतीः-**

पत्र येईपर्यंत सभेला सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रेः-**

पान नं. ५ मध्ये ९/१०/०३ रोजीचे स्थायी समितीचे इतिवृत्तान्त सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्याप्रमाणे दुरुस्तीसह इतिवृत्तान्त कायम करण्यात येत आहे. त्याच्यात आपण दुरुस्त्या ॲड केलेल्या आहेत का? यापुढे इतिवृत्तान्त देताना आपण जी दुरुस्ती करतो. त्याचीसुध्दा आपण आम्हाला कल्पना देत जा.

**प्र.सचिवः-**

ते पान देण्यात येईल.

**दिनेश नलावडेः-**

पान नं. १९ वर जो ठराव आहे. त्याच्यावर माझी अशी सुचना होती, काशिमिराचा जो आदिवासी भाग आहे. मांजण, पेणकर पाडा, चेने, वर्सोवा, गावठण या भागात झोपडपट्टी कुडाचे भिंती आहेत. त्यावर फरक करावा अशी माझी सुचना आहे.

**आसिफ शेखः-**

सभापती साहेब, आदिवासी जो भाग आहे. त्याच्यातसुध्दा घरे, झोपडया असतील तर ठिक आहे. त्या ठिकाणी इमारती असेल तर काय करणार?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

कुडाच्या भिंती, मातीच्या भिंती आणि चौक याचे दर त्या एरियामध्ये दिलेले नाहीत. तो सदर जो आहे तो त्या एरियामध्ये दिलेला नसल्यामुळे सहाय्यक संचालक नगररचना हयांचे जे दरपत्रक आहे त्या पत्रकामध्ये कुडाच्या भिंती, मातीच्या भिंती यांचे दर नाही आहे. मात्र, ते उत्तन, राई, मुर्धा या एरियेला दिलेले आहे. तेच दर तिथे कुडाचे असतील किंवा मातीचे असतील त्यांना ते दर वापरावे. आम्ही दर नविन लावत नाही. तेच दर येथेदेखील लावावा. मी सविस्तर सांगतो कुडाच्या भिंती आणि मातीच्या भिंती असलेल्यांना तो दर लावावा.

**आसिफ शेखः-**

मिरा भाईंदर शहरातील सगळेच आले. सभापती साहेब, मागच्यावेळी असाच ठराव झाला होता की, आदिवासी भागातील लोकांना नळ कनेक्शन दया, असा भेदभाव करुन आपल्याला चालत नसते. मिरा भाईंदर परिसरात ज्या ज्या ठिकाणी मातीच्या भिंती आहेत. त्यांनाही तो रेट लागेल असे ठरावात दुरुस्त करुन घ्या आणि आदिवासी भागामध्ये टोलेजंग इमारती असतील त्यांना त्याप्रमाणे रेट लावा.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

त्यांना १.६० पैसे आणि जे मातीचे व कुडाचे आहेत. त्यांना ५० पैसे.

**आसिफ शेखः-**

मातीचे व कुडाचे ते संपूर्ण मिरा भाईंदर परिसरातील मग ते आदिवासी भाग असो किंवा झोपडपट्टी असो. आमच्या विभागात किती झोपडया आहेत.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

सर्व विभागामध्ये दर दिलेले आहेत. सर्व विभागातले कुडाच्या, मातीच्या आणि झोपडीला दर मिळालेले आहेत. फक्त त्या एरियातील ते दर पडलेले नाहीत. बाकी सगळयांना आपण बोलता तोच दर लागू आहे. फक्त त्या एरियामध्ये तो दर दिलेला नाही. तो दर येथे गावात वापरतो तो दर

कुडाच्या आणि मातीच्या भिंतीना वापरावा असे दुरुस्ती आहे आणि कुठलाही ठराव एरियापुरता मर्यादित नसतो तो सामुहीक असतो. ते वक्तव्य केले ते चुकीचे आहे. परंतु त्या अर्थाने मी बोललेलो नाही.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती साहेब, आता जो तुम्ही ॲमेडमेन्ट करताहेत. परंतु, आदिवासी कोणी ठरवायचे.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

आदिवासी शब्द वापरला नाही. कुडाच्या आणि मातीच्या भिंती असे म्हटले आहे.

**मिलन म्हात्रे:-**

पुणे महानगरपालिकचे प्रॉक्चर तुम्हाला आणून दिलेले आहे. जेव्हा आदिवासीकरिता आपण पाण्याचे कनेक्शन दिले ते कनेक्शन देताना तुम्हाला त्याच्यात माफी दयायचे आहे. दलितांना, हरिजन आणि आदिवासी, आपण गर्व्हनमेन्टचे जी. आर. बघा. उगीच वाटेल ते घेतले आणि तोंडाला लावले जीभ टाळयाला लावली आणि काहीतरी बडबडत गेले असे नाही आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

हे वाक्य सभागृहात चालणार नाही.

**मिलन म्हात्रे:-**

तुम्ही काय चालवणार नाही. गर्व्हनमेन्टचा जी. आर.च तसा आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

मी सभापतींना सांगितले आहे हे वाक्य सभागृहात चालणार नाही.

**मिलन म्हात्रे:-**

कुठले वाक्य?

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

उचलली जीभ टाळयाला लावली आणि फेकले असे नाही आहे.

**मिलन म्हात्रे:-**

मी त्यावेळेलासुध्दा हेच बोललो होतो. गर्व्हनमेन्टची ऑर्डर जर आपण पाळत नसाल तर फायदा काय त्या वक्तव्याला. मी ते बॉवचर आणून दिले. त्याच्यामध्ये थ्रिरोयीपनी त्यांचे फॉर्मस आहेत. गर्व्हनमेन्टने महानगरपालिकेला ओबे करायचे आहे. पालन कसे करायचे ते वॉवचरमध्ये आहे. त्याच्या जाती त्यांनी दिलेल्या आहेत. आदिवासींना काय काय सुविधा दयायचे ते दिले आहे. त्या वॉवचरसाठी आम्ही एवढी मेहनत केली. पुण्यावरुन आणून दिले. तुमच्या सचिवांनी पण खिशात ठेवून दिले आणि मुख्यालयाच्या उपआयुक्तांनीदेखील ड्रॉमध्ये बंद करुन टाकले.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

माझ्याकडे नाही आहे.

**मिलन म्हात्रे:-**

तीन वॉवचर वाटले आहेत. त्या वेळेच्या सभापतीनादेखील दिले होते. पण त्याचा उपयोग कुठेच नाही आहे. तुम्हाला गर्व्हनमेन्टने ज्या ऑर्डर दिलेल्या आहेत. त्याचे तुम्ही पालन करा आणि त्या अनुषंगाने हा ठराव आपण परत व्यवस्थित आणा. फॉरमेटमध्ये आणा. तुम्ही आदेशाचे व त्या जी. आर.चा त्याच्यात उल्लेख करा.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

हा ठराव तुम्ही वाचून बघा आणि नंतर सांगा.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेबांचे जे मत आहे. तर मला असे वाटते ते जो जी.आर. सांगत आहेत. त्या जी. आर.च्या अटीशर्ती त्या ठरावाला लागू करा अशाप्रकारे त्यात दुरुस्ती करा. संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये हयाची अंमलबजावणी झालेली आहे. फक्त जो गावठण परिसर आहे. त्यामध्ये आदिवासी दलित क्षेत्र आहे. त्याच्यामध्येदेखील ज्यांचे पक्के घर आहे. त्यांना हा रेट ॲप्लीकेबल नाही. कुडाच्या आणि मातीच्या भिंती ज्यांच्या आहेत आणि जे आर्थिकदृष्टया अतिशय मागासलेले आहेत. त्यांच्यासाठी फक्त हा ठराव आहे. त्या ठरावामध्ये जी सुधारणा आहे. ती आपण पाहून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

हे सर्व फॅसिलिटी देत असताना तो आदिवासी आहे. त्याचे आपण जरुर सर्टीफिकेट घ्या.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

आदिवासी कुटुंबाला आम्ही टॅक्स लावत नाही. आदिवासी एरियामध्ये कुडाच्या आणि मातीचे जे घर असतील मग तो आदिवासी असो किंवा नसो त्या सहाय्यक संचालक नगररचना यांच्या पत्रामध्ये त्या एरियाला कुडाच्या भिंती आणि मातीच्या भिंती आणि पत्रे हयावर दर दिलेले नाही. नजरचुक झालेली आहे. त्यामुळे इकडचे दर तिथे त्या कॅटेगरीची घरे आढळली तर त्याला ते लावा.

**मिलन म्हात्रेः-**

मी काय म्हणतोय, मी जे म्हणतोय ते एकतर तुम्हाला समजलेले नाही आहे. शासनाने मिलन म्हात्रे आणि आदिवासी ह्याच्यामध्ये फरक केला आहे. आदिवासी, दलित व जे इतर आहेत. ह्यांच्यामध्ये शासनाने परिपत्रक काढलेले आहे. आदेश दिलेले आहेत. आपण एखाद्या आदिवासीला माझा रेट लावला तर तुम्ही त्या परिपत्रकाचे उल्लंघन केले असे होते. ही माझी सुचना आहे. बाकी तुम्हाला जे करायचे आहे ते करा. मी माझे मत रेकॉर्डवर आणलेले आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

संकलित करामध्ये केंद्र शासनाच्या स्वतःच्या वैयक्तिक प्रॉपर्टी असतील तरच करात सुट आहे. तुम्ही जो परिपत्रक म्हणता तो परिपत्रक वाचल्यानंतर ती सवलत दयायची आहे. ती कर आकारणीची प्रक्रिया आहे. जर सवलत द्यायची असेल तर त्यावेळेला ते परिपत्रकासह विषय तुम्ही अजेन्डावर आणल्यावर निर्णय घेता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

ज्यावेळेला ती लोक येतात. तेव्हा तुमचा स्टाफ सांगतो की, आम्हाला हे सांगितलेले नाही आहे. आपण ठरावात भाषा काय आहे. ते बघा.

**मा. सभापती :-**

मिलन म्हात्रे साहेब, आपले एक पत्र आम्हाला द्या. मग आपण तो ठराव सभागृहासमोर मांडू या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पान नं. २८ मध्ये प्रत्येक बाजाराच्या ठिकाणी अटीशर्ती दिल्या आहेत. त्याचे बोर्ड लावावे व तशी नोंद ठेवावी असे आहे आणि हयाच्यामध्ये मग विक्रेत्यांवर अन्याय होणार नाही.

**प्रकरण क्र. १७४ :-**

दिनांक ०६/११/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. :-**

दि. ०६/११/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.१७५ चे वाचन केले.)

**शरद पाटीलः-**

सभापती महोदय, हा विषय गेल्या सभेचा तहकूब विषय आहे. या विषयाचा गोषवारा आपण याच्यावर चर्चा झाली होती की, दहा लाखाच्या आतमध्ये आहे. म्हणून आयुक्त साहेबांनी त्याच्यावर अवलोकन करायला पाहिजे. अवलोकन करुन ते विषय मंजुर करुन घ्यायला पाहिजे होते. तसे अवलोकन करुन न घेता आताही अबव्ह आहे. त्याच्यात काय चेंजेस झाले काय झाले, त्याबाबत गोषवारा काही दिलेला नाही.

**मा. सभापती :-**

त्यावेळी आपण सिटी इंजिनिअरबरोबर कन्सल्ट घ्यायला सांगितले आहे व सिटी इंजिनिअरने कन्सल्ट दिलेले आहे.

**शरद पाटीलः-**

सिटी इंजिनिअरने कन्सल्ट केलेले आहे तर आपण आम्हाला याबाबत काहीतरी दयायला पाहिजे.

**मोहन पाटीलः-**

सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलू इच्छितो की, मी त्याच्यामध्ये दोन प्रस्ताव असे मांडले होते की, त्या सभेमध्ये दहा लाखाची जी कामे येतात. त्या दहा लाखाच्या कामाची संपूर्णपणे अवलोकन करण्याची क्षमता कमिशनर साहेबांकडे आहे आणि त्या सभेमध्ये त्यांनी अवलोकन करण्याऐवजी मंजूरीला पाठविलेली आहे आणि टी.एस. घेतला नव्हता आणि टी.एस. घ्या असे आपण त्यांना सांगितले होते. तर आपण त्याला टी.एस. घेतला. त्यांनी टी.एस. न घेता त्यांनी केली होती. आता त्यांनी टी.एस. घेतल्यानंतर जी दहा लाखाच्या आतमध्ये जी कामे आहेत. त्या कामाचे अवलोकन करण्याचे पूर्ण अधिकार कोणाला आहे? तर आयुक्त साहेबांना आहेत आणि आयुक्त साहेबांना अधिकार असताना मागच्या एका सभेमध्ये दहा लाखाची कामे आले होती. जी कामे बिलो होती. पॉईंटने बिलो होती. ती त्यांनी मंजूर केली होती आणि जेव्हा अबव्ह टेंडर येतात, जी दहा टक्क्यांच्या अबव्ह आहे पाच टक्क्याच्यावर अबाउ आहेत, सात टक्क्यांच्यावर अबाउ आहेत. जनरल माझ्या माहितीसाठी मागच्या वेळेला नगरपालिका असताना असे पत्रक नगरपालिकेला आले होते की, जनरल १० टक्केच्यावर टेंडर अबव्ह देउ नये, अशा प्रकारचे एक पत्रक आले होते आणि आले असेल तर आपण ते काढून बघा. त्याच्यापेक्षा दहा लाखाची आतली पॉवर त्यांची आहे. तर सेम कंडीशन आहे. तर त्याला मंजूरी घेण्याची गरज आपल्याला काय आहे. माझे सभागृहाला असे म्हणणे आहे जर टेंडर अबव्ह असेल तर आम्ही मंजूरी करायची आणि बिलो असतील ते कमिशनरने करुन घ्यायची. ह्याच्यापेक्षा जी टेंडर दहा लाखाच्या आतमध्ये आहेत. ते टेंडर आपण कमिशनर साहेबांकडे अवलोकन करण्यासाठी पाठवून दया. काम थांबणार नाहीत. अवलोकन केल्यानंतर ती कामे सुरु होणार आहेत. जर अबव्ह आहेत. दहा लाखाच्या तुम्ही आतमध्ये बघा सर्व टेंडर काढलेली, मागच्या सभेत टेंडर काढले होते. जी टेंडर बिलो आहेत, पॉईन्ट वनने, पॉईन्ट अर्धाने बिलो आहेत. ती टेंडर संपूर्णपणे त्यांनी अवलोकन केलेले आहे आणि अबाउ जे विषय आहेत. ते स्थायी समितीच्या डोक्यावर का असायला पाहिजे, अशा पध्दतीची विचारणा मी सभापती महोदय आपणाला केली होती आणि आपण सांगितले होते की, पुढच्या वेळेला टी.एस. आणि हया विषयाची माहिती घेउन पुढे येउ म्हणून मी मघाशी असे बोललो की, आपल्याला जी सभा आपण जो विषय थांबवला त्या थांबवलेल्या विषयावर आपण काय बोललो त्या तहकुबीचे टिपण पाठवायला पाहिजे होते. मग आपल्याला बोलता आले असते आणि असे असेल तर ध्वनिफितमध्ये सचिव साहेब आपण बघा आम्ही आपल्याला असे बोललेलो आहोत की, त्याचे अवलोकन करावे आणि मागच्या सभेमध्ये सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब बोलले होते आणि अन्य सदस्यांनी बोलेले होते जे बिलो टेंडर आहे. ते जर अवलोकन केलेले आहे. तर अबाव्ह टेंडर आम्ही मंजूर का करायचे. ते दहा लाखाच्या आतमध्ये आहे. सभापती महोदय, आपण हया विषयावर आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करुन अवलोकन करावे आणि अवलोकन केल्यानंतर हे विषय होणारच आहे आणि मंजूर केला तरी हा विषय होणारच आहे.

**मा. सभापती :-**

मोहन पाटील साहेब असे विषयदेखील तुमच्या वेळेला अबाव्हमध्ये झालेले आहेत. त्यासाठी त्यांनी आणले असतील.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, या विषयामध्ये जे एस्टीमेटेड कॉस्ट आणि आलेले टेंडर अबव्ह आहेत आणि अबव्हमध्ये जे कमीचे आहेत. त्याचे जर एस्टीमेट आणि आलेले टेंडर यांची जर बेरीज केली तर ते दहा लाखाच्या वर जातात. म्हणून कमिशनर साहेबांनी अवलोकन केलेले नाही. ते एस्टीमेट कॉस्ट आहे आणि एस्टीमेट कॉस्टच्या वर जे अबाव्ह टेंडर आले त्या अबाव्हची जर बेरीज केली तर ते दहा लाखाच्यावर जाते. म्हणून कमिशनर साहेबांनी दहा लाखाच्या वर असल्यामुळे स्थायी समितीसमोर पाठवा म्हणून म्हटलेले आहे आणि दुसरा मुद्दा यामध्ये जे आपण पाईप सुचविलेले आहेत ते पाईप

बाजार भाव हे मोठया प्रमाणात दर वाढल्यामुळे आणि शेडयुल रेट यामध्ये डिफरन्स पडलेले आहे. यापूर्वी जे दर पब्लिश झाले होते. जसजसे बाजारात भाव वाढतात तसतसे केलेले एस्टीमेट हे पूर्वीचे असते आणि बाजारातल्या दरामध्ये बदल झाला तर तो त्याप्रमाणे दर ओपन मार्केटमधून दर आलेले आहेत. त्यामुळे ती जे पाईप टाकलेले आहेत. ते सी.आय.चे असल्यामुळे दर वाढल्यामुळे अबाव्हचे आलेले आहेत. म्हणून कमिशनर साहेबांनी आपल्याकडे पाठविलेले आहे. पुन्हा हे टेंडर प्रसिध्दी केले तरीदेखील यापेक्षा जास्त येण्याची शक्यता नाकारता येणार नाही असे अभियंता आणि ऑडिटर यांचे म्हणणे आहे. जे पाईप जे डेसीग्नेशन आहे, नाव आहे. त्या नावामुळे दर वाढलेले आहेत. तेच पाईप लाईन टाकले तर उपयुक्त ठरेल असे अभियंताचे म्हणणे आहे आणि ऑडिटरचे ही म्हणणे आहे. ते बाजारभाव वाढल्यामुळे अबाव्ह आलेले आहेत आणि जे एस्टीमेट केलेले दर आहेत. ते पूर्वीचे आहेत आणि पब्लिश केल्यानंतर अबाव्ह आलेले पेक्षा निगोशिएशन करुन कमी करुन घेतलेले आहेत. कमी जे केलेले आहेत ते तुमच्यापुढे ठेवलेले आहेत. त्यामुळे दहा लाखाच्यावर जात असल्यामुळे सभागृहापुढे विषय आलेला आहे. आपण निर्णय घ्यावा.

**आसिफ शेखः-**

सन्मा. सभापती साहेब, शासनाचे असे परिपत्रक आहे की, जे टेंडर दहा टक्क्याच्या अबाव्ह आहेत. त्याला पास करायला नाही पाहिजे. आपली प्रथा राहिली आहे. बिलो टेंडर दहा टक्क्यापेक्षा आहे ते आपण पास करतो आणि आतापर्यंतचे सगळे टेंडर झालेत ते बिलो दहा टक्केचे होते. म्हणून पास झालेले आहेत आणि मुंबई महानगरपालिका प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलममध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. आयुक्तांना त्यांनी पॉवर दहा लाखाच्या आतमध्ये त्यांनी आपल्या अखत्यारीमध्ये निर्णय घ्यावा. नाईक साहेबांनी या ठिकाणी खुलासा केलेला आहे. अधिक वजाबाकीची या ठिकाणी अभिप्राय नको आहे. आमचे सुस्पष्ट असे म्हणणे आहे की, जर उदया या टेंडरबाबत काही वाद उपस्थित झाला तर त्याला स्थायी समिती जबाबदार आहे का? त्याबरोबर तुमचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, बांधकाम विभागाचे सिटी इंजिनिअर आणि जे कॅफो जे आले आहेत ते व उपआयुक्त (मुख्यालय) आणि आयुक्त ह्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे का? की, आमची हरकत नाही. तुम्ही मान्य करा. का योग्य तो निर्णय घ्यावा अशी भूमिका मोगम असेल.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

गोषवारा मंजूर करावा असे असल्यामुळे सगळयांचा अहवालावरुनच आहे.

**आसिफ शेखः-**

सभागृहात आपण स्पष्ट म्हणा. योग्य तो असा निर्णय म्हणूच नका. मोगम बोलूच नका.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

मंजूर करा. हा गोषवाराच आहे. सिटी इंजिनिअर आणि आयुक्त यांच्याकडून घेउन आलेले आहेत.

**आसिफ शेखः-**

आलेले टेंडर हे कायदेशीर योग्य आहेत. बाजारभाव हयाच्यामध्ये तुलनात्मक केला असता, प्रशासनाच्यावतीने तुम्ही मान्यता देता असे आपण म्हणा. योग्य तो निर्णय सभागृहाने घ्या. म्हणजे स्थायी समितीला अडचणीत आणण्याचा प्रयत्न आहे का? आणि उदया जर ठाणे महानगरपालिकाप्रमाणे चौकशी झाली आपण सभापती आणि सगळे नगरसेवक अडचणीत येणार.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

अधिकारी, केव्हाही मंजूर करा असे सांगू शकत नाही. मात्र गोषवारा मंजूर करण्यासाठी शिफारस केलेली आहे.

**आसिफ शेखः-**

आम्हांला तिघांचा अभिप्राय द्या. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठयाचा स्पष्ट अभिप्राय सांगा, आयुक्त साहेबांचा स्पष्ट अभिप्राय द्या आणि कॅफोचा स्पष्ट अभिप्राय सांगा व ते लेखी स्वरुपात द्यायला पाहिजे. आपण योग्य तो निर्णय घ्या. म्हणून सांगितले म्हणजे काय? मंजुरीसाठी शिफारस असे आपण स्पष्ट म्हणा.

**चंद्रकांत वैतीः-**

सभापती साहेब, गेल्या सभेत हा विषय आला होता आणि मागच्या सभेत हा विषय तहकूब केला होता. त्यावेळेला आपण असे म्हटले होते की, ह्या निविदा अबव्ह आलेल्या आहेत आणि यासाठी

आपण टेक्निकल सॅन्क्शन कोणाकडून घेतलेले आहे. तर ते टेक्निकल सॅन्कशनसाठी आपण सिटी इंजिनिअरने हया विषयाला कन्सल्ट दिलेला आहे. पुन्हा ऑडिटरचा रिपोर्ट आहे आणि हा विषय सभेपुढे पुन्हा आलेला आहे. तर याबाबतीत टेक्निकल सॅन्क्शन देणारे सिटी इंजिनिअर यांनी आपला अभिप्राय दयावा आणि पाण्याच्या प्रमुखाने तो आपला अभिप्राय दयावा.

**मोहन पाटीलः-**

सन्मा. उपआयुक्त साहेब, यांनी या ठिकाणी खुलासा केला की, कमिशनर साहेबांना या पध्दतीने दहा लाखाच्या वर जाते म्हणून ते अबाव्ह होते आणि अबाव्ह मंजूर करण्याचा त्यांना अधिकार नाही आहे. त्या प्रश्नावर पहिला प्रश्न आहे की, दहा लाखाच्या वर जाते हे सुस्पष्ट आपण टिपणीमध्ये आणायला पाहिजे. हा सुस्पष्ट खुलासा झाला नाही तर आम्ही काय समजू. एस्टीमेटली अमाउन्ट जास्त आहे का, कमी आहे बाजारभावापेक्षा जे सांगू शकत नाही. दुसरा विषय जेव्हा आपण एखादे टेंडर मंजुरीला आणतो. तेव्हा त्याचे टी.एस. घेतले पाहिजे. एखादे टेंडर आपण कॉल केले, निविदा मंजुरी आल्या आणि या सभागृहात विचारणा झाली की, टी.एस. घ्यायला पाहिजे. मग टेंडर कॉल करण्याच्या अगोदर टी.एस. घ्यावे लागते की, टेंडर कॉल केल्यानंतर टी.एस. घ्यावे लागते. कारण कमिशनर साहेबांनी त्यांना पॉवर दिल्यानंतर सन्मा. अधिकारी दशोरे साहेबांना आणि आपण टेंडर कॉल केला. निविदा मंजुरीला आल्या आणि त्याच्यानंतर आपण टी.एस. घेतो. मग टेंडर मंजूर करण्याच्या अगोदर आपण टी.एस. घेतो. जे आपण तांत्रिक सॅन्क्शन घेतो. त्याच्यानंतर फायनानशियली मंजुरी सॅन्क्शन घेउन, टेक्निकली सॅन्क्शन घेउन आपण ते टेंडर काढतो. मग ही पध्दत अशी कशी उलट झाली. या ठिकाणी टी.एस. नंतर घेतले गेले. टेंडर अगोदर काढली गेली आणि आता तुम्ही सभेला विषय आणला. या ठिकाणी माझे असे म्हणणे आहे. टी.एस. घेण्याच्या अगोदर फेरनिविदा त्याच्या व्हायला पाहिजे. तुम्ही कसे कॉन्फिडन्सने सांगू शकता की, फेरनिविदा एवढी येणार नाही. बाजारामध्ये फेरनिविदा काढल्यानंतर त्याचे तेवढे टेंडर येउ शकत नाही असा कॉन्फिडेन्स आपण देउच शकत नाही. या ठिकाणी असे मी देउ शकत नाही आणि तुम्हीही देउ शकत नाही. यदाकदाचित कमी येउ शकेल हा विषय झाला आणि एस्टीमेटली त्याचे अमाउन्ट आहे. डी.एस.आर. रेट त्याचा कोणता आहे. ते पाच वर्षापूर्वीचा आहे की, चार वर्षापूर्वीचा आहे. तीन वर्षापूर्वीचा आहे. जर डी.एस.आर. रेट मागच्या दोन वर्षाच्या पूर्वीचा असेल आणि त्याची एस्टीमेटली अमाउन्ट जास्त होत असेल तर त्या पध्दतीने कमिशनर साहेबांनी टेंडर कॉल करायला पाहिजे होते की, दहा लाखाच्या वर आहेत. तुम्ही हया पध्दतीने कॉल करा. तुम्ही रेकॉर्डला अमाउन्ट दहा लाखाच्या आतमध्ये आणि प्रशासन या ठिकाणी खुलासा करते, अशा अशा पध्दतीने झाल्यानंतर ते तशा तशा पध्दतीने एस्टीमेटली अमाउन्ट अबाव्ह होते. म्हणून कमिशनर साहेब करत नाही, हे असे चालत नाही. तुम्ही आम्हाला कागदोपत्री दया आणि त्यावेळेला मी खुलासा केला की, टी.एस. तुम्ही आणा. त्याच्याबरोबर मी हा ही खुलासा केला. त्या सेम सभेला दहा लाखाच्या आतली एस्टीमेट होती. जी पॉईन्टने बिलो होती आणि बिलो पॉईन्टने असल्यामुळे आपण कमिशनर साहेबांनी अवलोकन केले आणि हीच पध्दतीने टेंडर अबाव्ह आहेत. मग ते पण आपल्याला बोललो की, टी.एस. घेउन कमिशनर साहेबांनी त्याचे अवलोकन करावे. जर कमिशनर साहेबांना एस्टीमेटली अबाव्ह वाटते तर साहेब आपण रेकॉर्डला एस्टीमेटली अबव्ह आणा आणि ते एस्टीमेटली अबव्ह आणून ते करुन दाखवा. आम्ही सभेत बोललो की, टी.एस. तुम्ही घ्यायला पाहिजे. टी.एस. तुम्ही का घेतली नाही. आपण जर अशा पध्दतीने बोललात की, टी.एस. आम्ही नंतर घेउ. मग टेंडरची निविदा बाहेर पडल्यानंतर त्या निविदा मंजुरीला येतात. त्यांच्यानंतर टी.एस. घेतले जात नाही. टी.एस. हे अगोदर घेतले जाते आणि टी.एस. जर तुम्ही नंतर घेता तर तुम्ही ती निविदा पुन्हा काढायला पाहिजे. टेक्निकल सॅन्क्शन जर तुम्ही आता घेता तर आपण पुन्हा टेंडर कॉल केले पाहिजे. तुम्ही पुन्हा कॉल केले पाहिजे. आपण सुस्पष्ट करुन आणले पाहिजे. आपण सुस्पष्ट करुन आणत नाही. त्याच्यानंतर त्या फाईलवर ह्या पध्दतीचे टी.एस. आम्ही नंतर दिले. कॅफो किंवा लेखापालने रिमार्क केला पाहिजे की, टेंडर कॉल केल्यानंतर आम्ही त्याला टी.एस. दिलेले आहेत आणि हे योग्य आहे व असा रिमार्क जर सिटी इंजिनिअर किंवा कॅफो देत असतील की, हे टेंडर कॉल केले होते. काही तांत्रिक अडचणीमुळे ते सभागृहापुढे आले आणि सभागृहामध्ये अशी विचारणा झाली की, टी.एस. घेतले की नाही आणि टी.एस. आम्ही नंतर घेतले. ह्याच्यापुढे असेही टेंडर आम्ही अगोदर मंजुरीला पाठवू व त्यानंतर टी.एस. घेऊ अशा प्रकारचा अभिप्राय जर कॅफो देत असतील तर त्यांनी तो येथे खुलासा करावा आणि दुसरा विषय जो एस्टीमेटली भाग तर आपण क्लिअर करुन आणावे आणि

आपण नंतर त्याचा खुलासा करावा. दुसरा विषय असा आहे की, प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-याला कोणत्या पध्दतीने आर्थिक बाबतीत आपण स्वायत्ता देउ शकतो, कोणत्या कायदयाने हयाचा खुलासा नाईक साहेब आपण प्रशासनामध्ये मुख्याधिकारी असल्यापासून आयुक्तापासून उपआयुक्तापर्यंत आपण वाटचाल केलेली आहे आणि आपल्याला चांगला अभ्यास आहे, अशी आमची धारणा आहे. जर एखादा प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्याला आपण कोणत्या पध्दतीने आपण त्याला पॉवर देउ शकतो. त्याचा खुलासा करावा.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

महानगरपालिकेकडे जी पदे मंजूर आहेत. त्या पदाला जे अधिकार टी.एस. द्यायला असतात. ते अधिकार त्यांना प्राप्त होतात. नंतर आपण जे फेर टेंडर काढले तर त्यापेक्षा कमी येईल किंवा जास्त येईल हे सांगता येणार नाही असा जो शब्दप्रयोग झाला. तो शब्दप्रयोग ऑडीटर आणि अभियंता यांच्या रिपोर्टवरुन झाला. ते माझे वैयक्तिक मत आहे किंवा जास्त येईल किंवा कमी येईल. त्यांना येण्याची शक्यता नाही असे अभियंतानी म्हटलेले असल्यामुळे मी म्हटलेले आहे आणि आतापर्यत कुठल्याही नगरपालिकेत, महानगरपालिकेत ही रक्कम हयापेक्षा जास्त असल्यामुळे आम्ही स्थायी समितीसमोर पाठवतो असे कुठलाही गोषवारा म्हणत नाही. गोषवरा १० लाखाच्या वर गेला की तो गोषवारा स्थायी समितीच्यापुढे येतो. तसा शब्दप्रयोग करण्याचे प्रोव्हीजन नाही. दहा लाखाच्यावर जात असल्यामुळे हे स्थायी समितीपुढे पाठवा असे म्हणत नाही, असा शब्दप्रयोग नाही. दहा लाखाच्या वर आम्ही कॅल्क्युलेशन करुन बघतो आणि ते वर जात असेल तर स्थायी समितीसमोर पाठवा असे आयुक्त साहेब शेरा मारतात. आयुक्त साहेबांनी जो शेरा मारलेला आहे. ते दहा लाखाच्या वर जाते म्हणूनच शेरा मारलेला आहे. पण गोषवाऱ्यात आम्ही शेवटच्या दोन ओळी लिहित नाही की, हे दहा लाखाच्या वर जात असल्यामुळे आम्ही स्थायी समितीसमोर पाठवतोय असे कधीच आतापर्यंत लिहिलेले नाही. कुठल्याही महापालिकेत लिहित नाही. फक्त अमाउन्ट दहा लाखाच्या वर गेले की, आपण स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवावे असे म्हणतो.

**मोहन पाटील:-**

दहा लाखाच्या वर गेले नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

गेले आहे.

**मोहन पाटील:-**

ह्याच्यामध्ये तसे नाही आहे.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, आपण टेंडर कधी काढतो. प्रशासकीय आर्थिक मंजूरी घेतल्यानंतर स्थायी समितीपुढे आल्यानंतर मा. महासभेची मंजूरी घेतल्यानंतर आपण टेंडर काढत असतो. टेंडर काढल्यानंतर त्या टेंडरची अमाउन्ट फिक्स असते. एस्टीमेट रक्कम नउ लाख नव्वद हजाराचे टेंडर आहे. पण नउ लाख नव्वद हजार म्हणजे दहा लाखाच्या आतमध्ये झाले. मग दहा लाखाच्या आतमध्ये जर टेंडर झाले तर नियमाप्रमाणे ते पॉवर आयुक्त साहेबांना आहेत. मग आयुक्त साहेबांनी निर्णय आपल्या अखत्यारीमध्ये घ्यायला पाहिजे. आपण बेरीज, वजाबाकी करुन सांगता की, बिलो, अबाव्ह झाले आणि ते अकरा लाख झाले. त्याला आम्ही नाही देणार. नउ लाख नव्वद हजाराचे तुम्ही टेंडर एस्टीमेट काढले तर ते बिलो पण येणार आणि अबाव्ह पण येणार. जर नउ लाख नव्वद हजाराचे आहे तर आयुक्त साहेबांनी आपल्या अधिकार क्षेत्रात ते मंजूर केले पाहिजे व अवलोकनार्थ येथे पाठवायला पाहिजे आणि शब्द जाळयामध्ये पकडायचे असे हयाच्यामध्ये काहीच नाही आणि असे कुठे लिहिलेलेही नाही. आम्ही विचारलेही नाही. तुम्हाला की असे लिहा. आम्ही एवढेच सांगितले की, आयुक्त साहेबांना जे अधिकार आहेत दहा लाखाचे आणि टेंडर आपले नउ लाख नव्वद हजाराचे आहे. तर त्यांनी आपल्या अखत्यारीमध्ये निर्णय घेतला पाहिजे आणि अवलोकनार्थ येथे सादर करा.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

आयुक्त साहेबांनी शेरा मारला की, स्थायी समितीसमोर विषय ठेवा.

**मोहन पाटील:-**

आपल्याला टी.एस. नंतर घेता येते का?

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

कार्योत्तर मंजूरी घेता येते.

**मोहन पाटील:-**

कार्योत्तर मंजूरीचे सांगत नाही. टी.एस.बद्दल बोलतोय. एखादयाचा टेंडर आपण कॉल केल्यास, कार्योत्तर मंजूरी वेगळा प्रश्न आहे. कार्योत्तर मंजूरी एखादयाचे काम प्रशासनाला वाटले आणि त्यांनी ते अर्जन्ट केले आणि त्याला तुम्ही मान्यता दया. आपण हया ठिकाणी टी.एस. करतो आणि आपण फायनली सॅन्क्शन घेतो. आर्थिक मंजूरी आणि तांत्रिक मंजूरी घेतो आणि ते केल्यानंतर त्या कामाची निकड आहे. म्हणून आपण निविदा काढतो आणि निविदाला आपण मंजूरी देतो आणि सभागृहामध्ये निविदा मंजुरी घेउन येतो. हया ठिकाणी कसे झाले अगोदर टी.एस. घेतला नव्हता. टेक्निकली सॅन्क्शन घेतले नव्हते आणि त्याचे पॉवर आयुक्त साहेबांनी त्या अधिका-यांना दशोरे पाणी पुरवठयाचे अधिकारी यांना पॉवर्स दिल्या नव्हत्या. त्यांना आता पॉवर्स दिलेल्या आहेत. तर टी.एस. घ्यायची पध्दत कशी राहिल. कार्योत्तर मंजुरी वेगळी आहे. आपण काम केले आणि त्याची मंजूरी मागतोय हा भाग वेगळा आहे. तांत्रिक मंजुरीशिवाय आणि आर्थिक मंजुरीशिवाय आपण कामाची एस्टीमेट ठरवू शकत नाही की, काम काय आहे. काय कसे आहे ते आपण करु शकत नाही. प्रशासकीय मंजूरी म्हणजे आपली मंजूरी घ्यायची. टेक्निकली सॅन्क्शन म्हणजे अधिका-यांची मंजूरी घ्यायची. ही मंजूरी घेउन आपण टेंडर कॉल करतो. हया ठिकाणी काय झालेले आहे. आपण सर्व गोष्टी केल्या आणि त्या सगळया गोष्टी केल्यानंतर आपण सांगतो की, टी.एस. आपण घेतला आहे की नाही? कॅफोनी हयाचा खुलासा करावा. सभापती महोदय, की असे टी.एस.देखील आहे आणि ते योग्य आहेत आणि हयाच्यापुढेही असे टेंडर आम्ही काढू शकतो. मग टी.एस. आपण नंतर घेउ शकू.

**धनराज अग्रवाल:-**

चीफ इंजिनिअरला बोलावून आपण हयाचा खुलासा करावा.

**आसिफ शेख:-**

पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता याचा आम्हाला अभिप्राय पाहिजे. मग त्याच्यावर त्यांनी रिमार्क का मारला? तुमचे स्वयंस्पष्ट तुम्ही मांडा.

**धनराज अग्रवाल:-**

पूर्ण खुलासा करावा. मागच्या वर्षीदेखील आपण टेक्निकल सॅक्शन घेत नव्हतो. आता कितीला घ्यायला लागेल कितीला नाही. त्याचा आपण खुलासा करावा.

**मोहन पाटील:-**

असे टेक्निकल सॅन्क्शन न घेता कोणते काम झाले आहे. त्याचा आपण खुलासा करावा.

**शरदचंद्र वैरागडे:-**

टेक्निकल सॅन्क्शन घेतल्याशिवाय एकही काम केलेले नाही.

**धनराज अग्रवाल:-**

टेक्निकल सॅन्क्शन आपण नंतर घेतले का पहिले घेतले.

**शरदचंद्र वैरागडे:-**

पहिले घेतले.

**धनराज अग्रवाल:-**

आपण आता हे टेक्निकल सॅन्क्शन नंतर घेता हे चुकीचे आहे का?

**शरदचंद्र वैरागडे:-**

टेक्निकल सॅन्क्शन दोनदा घेता येतो. पहिल्यांदा जेव्हा ते चुकीचे असते तेव्हा त्याला रिव्हाईज टेक्निकल सॅन्क्शन परत देता येते.

**धनराज अग्रवाल:-**

आम्हाला एकच पाहिजे. आम्ही कुठेही अडकलो नाही पाहिजे. हयाच्यात चुकी असेल तर चुकी सांगा.

**मोहन पाटील:-**

सिटी इंजिनिअर साहेब, हयाच्यापुढे ही पध्दत अवलंबा. आपण कशाला डबल मंजूरी घेता. आपण सगळी कामे मंजूर करुन घ्या आणि मंजूरी येतील तेव्हा टी.एस. आपण घेउ या आणि तुम्ही

आम्हाला लेखी दया की, असे चालते आणि कॅफोने लेखी खुलासा करावा की, टी. एस. नंतर घेतलेले चालते.

**मा. सभापती:-**

आपणच स्थायी समितीने सांगितले की, टी.एस.घ्यावा आणि आपण मागे तो विषय पुन्हा घ्यायला सांगितला.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, कोणी घ्या म्हणून सांगितला. त्याकरिता घ्यायचा अशा पध्दतीचा कारोभार बरोबर नाही.

**मा. सभापती:-**

आपण सांगितले टेक्निकली घ्या. म्हणून टेक्निकली घेतले.

**शरदचंद्र वैरागडे:-**

सभापती साहेब सांगतात हयाच्याप्रमाणे आपल्याला जी ऑर्डर दिलेली होती. त्याच्याप्रमाणे आपण परत टेक्निकली सॅन्क्शन घेतलेले आहे.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेबांनी म्हणून टेक्निकली सॅन्क्शन घेतले. पण आपल्याला आवश्यकता वाटली का नाही.

**चंद्रकांत वैती:-**

पाणी पुरवठा अभियंता यांनी आपला खुलासा दयावा.

**मोहन पाटील:-**

ही टेक्निकली बाब आहे आणि कोणते काम न करणे आणि करणे हा विषय नाही आहे. टेक्निकली बाबीमध्ये आपण फायनाशियली सदस्यांना आपण आणू नका असे आम्हाला बोलायचे आहे आणि अशी पध्दत असेल तर हे काम आपण नंतर करत जाउ. कशाला आपण टी.एस.च्या भानगडीत पडायचे.

**निकम:-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतोय, मागच्या मा. सभेमध्ये असे ठरले होते की, टी.एस. घेण्यात यावे. जे एक्झीक्युटीव्हचे दहा लाखाचे पॉवर आहेत आणि दशोरे साहेबांच्या पॉवरमध्ये त्यांनी टी.एस. घेतलेले होते. पण ज्यावेळी असे ठरले गेले की, ते सिटी इंजिनिअरकडून घेण्यात यावे तर ते आम्ही तसे त्यांच्याकडून घेण्यात आले आणि त्यांना तशी दोन वेळेस घेण्याची पॉवर आहे आणि ते त्याप्रमाणे चेक केलेले आहेत आणि जे बारा टक्के रेट कोट केलेले आहेत, बारा टक्के अबव्ह, चौदा टक्के अबव्हही जर मॅन्युफॅक्चरींग कंपनी आहे. त्यांच्याकडून आपण ते रेट घेतलेले आहेत. ते रेट बघितले आणि तुलना केली. तर ते रिझनेबल आहे आणि अजून मार्केट रेट वाढणार आहे आणि ते अजून अबाव्ह जातील.

**मोहन पाटील:-**

बाजारामध्ये अबाव्ह जातील असे तुम्ही कोणत्या पध्दतीने बोलू शकता. आमचा विषय असा आहे, टेक्निकल सॅन्क्शन घ्यायचे अधिकार तुम्हाला माहिती नसेल तर आता दशोरे साहेबांना दिलेले आहेत. मग तुम्ही सांगता की, पुन्हा घेतले नाही असे तुम्ही एकच विषय बोललात. मी त्याच्यानंतर अवलोकनाचा विषयही बोललो होतो. जर असे टी.एस. न घेता आपण टेंडर काढले तर चालतील असे आपण आम्हाला सांगा की, टी. एस. न घेता टेंडर काढता येतील.

**निकम:-**

तसे काढता येतील. पण टी.एस. घेतला होता.

**मोहन पाटील:-**

म्हणजे त्यांना त्यावेळेला पॉवर नव्हती. आता कमिशनर साहेबांनी त्यांना पॉवर दिली.

**मा. सभापती:-**

आपल्याला ऑडीटर साहेब रिपोर्ट देतील.

**मोहन पाटीलः-**

माझा खुलासा पूर्ण होउ दे. निकमजी, मागच्या वेळेला त्यांना पॉवर नव्हत्या. म्हणून त्यांना कमिशनर साहेबांनी टी.एस.ची पॉवर आता दिली आहे आणि आता टी. एस. न घेता टेंडर काढले गेले आहे. म्हणजे त्यांना पॉवर्स नसताना त्यांनी ते टेंडर काढले असा अर्थ याच्यातून निघतो.

**निकमः-**

पॉवर्स आहेत असे गृहित धरुनच.

**मोहन पाटीलः-**

तुम्ही असे कसे बोलता की, पुन्हा पॉवर्स दिलेल्या आहेत.

**निकमः-**

आपण सांगितले की, टी.एस. सिटी इंजिनिअरकडून घ्या.

**मोहन पाटीलः-**

कॅफोने हयाचा खुलासा करावा.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

कार्यकारी अभियंताचा चार्ज दशोरे साहेबांना दिला होता. त्यावेळेला त्यांच्या सहिनेच टेक्निकल सॅन्क्शन आणि टेंडर मंजुरीचा गोषवारा यायचा. त्यावेळी आयुक्त साहेबांनी स्वतःच्या अधिकाराखाली दशोरे साहेबांना अधिकार दिले होते. त्यावेळेला त्यांचे मत असे होते की, दहा लाखाचे टेक्निकल सॅन्क्शन ते देउ शकतात. परंतु, स्थायी समितीसमोर त्या विषयावर चर्चा झाली व चर्चा झाल्यानंतर सर्व डिपार्टमेन्टचे टेक्निकल सॅन्क्शन हे सिटी इंजिनिअरकडून घ्यावे असे ठरले. त्यानंतर सिटी इंजिनिअरकडून टेक्निकल सॅन्क्शन घ्यायला लागले. पूर्वीचे जे काम आहेत. ते सिटी इंजिनिअरकडे जात नव्हती. त्यांच्या टेक्निकल सॅन्क्शनच्या आधारावर मंजूर केलेली आहे. वास्तविक अशी पध्दत आहे की, कोणतेही काम सर्व डिपार्टमेन्टचे असेल ते सिटी इंजिनिअरकडूनच टेक्निकल सॅन्क्शन घ्यायला पाहिजे. मागचे जे काम आहे ते दशोरे साहेबांच्या टेक्निकल सॅन्क्शननेच मंजूर केलेले आहे. त्यावेळेला निदर्शनास आल्यानंतर तुम्हीही केस सिटी इंजिनिअर साहेबांकडे पाठवली.

**आसिफ शेखः-**

आम्ही काय विचारतो आणि आपण काय खुलासा करत आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

काय खुलासा करायचा आहे. हे तुम्हालाही समजलेले आहे. पण ते न समजल्यासारखे बोलण्यात काही अर्थ नाही आहे. सर्व डिपार्टमेन्टने सिटी इंजिनिअरची पोस्ट मंजूर झाली. त्या पदावर व्यक्ती आली म्हणून त्या व्यक्तीकडून सर्व डिपार्टमेन्टने टेक्निकली सॅन्क्शन घ्यावे असे स्थायी समितीने इतर नगरपालिकेचे ॲप्लीकेबल करावे आणि प्रत्येक काम हे सिटी इंजिनिअरकडे जावे आणि त्यांच्याकडून टेक्निकल सॅन्क्शन घ्यावे असे ठरवून मग सिटी इंजिनिअरकडे ही केस पाठवावी व त्यांनी टेक्निकल सॅन्क्शन दिले तर हे सभागृहापुढे विषय आणावा. मागचे जे विषय आहेत ते सिटी इंजिनिअरकडे गेलेले नाहीत. त्यानंतर सिटी इंजिनिअरकडे सर्व डिपार्टमेन्टचे केसेस जायला लागल्या.

**आसिफ शेखः-**

आपल्या भावनांशी आम्ही सहमत आहोत. आपण ऐकून तर घ्या. हा मोबाईल आहे आणि सर्वसाधारणपणे मोबाईलची किंमत पाच हजारापर्यंत मार्केटमध्ये आहे. दहा हजारदेखील व पंधरा हजारदेखील असेल व एस्टीमेट रक्कम पाच हजार आहे. तर आपण काय केले ते पाच हजाराचे एस्टीमेट करायला पाहिजे होते. तर त्यांनी तीन हजाराची केले. तीन हजाराला जनरली मोबाईल कुठे मिळत नाही.

**आसिफ शेखः-**

डी.एस.आर. आता कसे आले. जे नउ लाख नव्वद हजाराचे टेंडर आलेले आहे. दहा लाखापर्यंत आयुक्त साहेबांना निर्णय घ्यायचा अधिकार आहे. मग त्यांनी तो निर्णय घ्यायला पाहिजे होता. तुम्ही स्थायी समितीला जबाबदार कशाला धरता?

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सभापती व संपूर्ण सभागृहातील सदस्य, ज्या आपण आपल्या तीव्र भावना येथे व्यक्त केल्या तर आपल्याला आठवत असेल की, आपल्यातलेच बहुसंख्य सदस्य सभागृहात नगरपालिका अस्तित्वात असताना होते आणि तेव्हा हा प्रश्न उपस्थित झाले होता सभागृहात की, इंटरनल पाईप

लाईन हया ग्रामपंचायतीच्या अनेक वर्षापासून आहेत आणि त्या पाईप लाईन फुटतात, पाणी आपल्या दाराशी आलेले आहे आणि आज अशी परिस्थिती झालेली आहे की, पाणी दाराशी येउन सुध्दा आपण लोकांना पाणी देउ शकत नाही. सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती आहे. त्यावेळी हा प्रश्न आमच्याकडे एम.जे.पी.ने उपस्थित केला होता की, इंटरनल पाईप लाईनसुध्दा आम्हाला टाकू दया. त्यावेळेस या सभागृहाने निर्णय घेतला होता की, इंटरनल पाईप लाईन नगरपालिका स्वतः टाकेल आणि ही इंटरनल पाईप लाईन स्वतः तुम्हाला टाकायची नसेल तर आपण हे काय एम.जे.पी.ला का देत नाही. आपण हे काम एम.जे.पी.ला करु दया. तर अशी शंका उपस्थित होत असेल. सर्व येथे सन्मा. सदस्य आहेत. गावामध्ये अदयापही ग्रामपंचायतीच्या काळामध्ये पंचवीस/तीस वर्षापूर्वीच्या सिमेन्टच्या पाईप लाईन आहेत. आता प्रेशरने पाणी येते आणि त्या सिमेन्टच्या पाईप लाईन दोन-तीन ठिकाणी फुटतात. जागोजागी ब्रस्ट होतात आणि हे गावाच्या लोकांना पाणी दयायचे आहे किंवा नाही ह्याचा विचार सभागृहाने करावा.

**मोहन पाटीलः-**

साहेब, आपण फायनानशिअली आम्हाला हयाच्यात अडकवू नका आणि त्याची एस्टीमेट वाढली होती.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

हयाच्यामध्ये फायनानशियली कोणीही अडकणार नाही.

**आसिफ शेखः-**

आपण आम्हाला अशी लेखी हमी दयावी की, या टेंडरमध्ये स्थायी समिती अडचणीत येणार नाही.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

आयुक्त साहेबांनी हा निर्णय का घेतला नाही. त्याबाबत नाईक साहेबांनी सांगितले की, दहा टक्केपेक्षा अबाव्ह असल्यामुळे जास्त रेट आले म्हणून स्थायी समितीवर आणावा लागणार आहे. हा त्यांचा खुलासा योग्य आणि समाधानी खुलासा आहे. हा ठराव फेर टेंडर कॉल करावा व परत एम.जे.पी. ला कामकाज का देउ नये.

**चंद्रकांत वैतीः-**

मा. केळकर साहेब, संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये आज आपल्याकडे पाणी आहे. परंतु, जागोजागी हया लाईन फुटत असतात. आपण ही व्यथा सांगितली. वास्तविक या शहराशी आपले नाते आहे. आपण येथे चीफ ऑफीसर होता. म्हणून आपण जी कळकळ व्यक्त केली. आपण करोडो रुपये खर्च करुन या मिरा भाईंदरपर्यंत पाणी पोहचवलेले आहे. भाईंदर पूर्व, पश्चिम परिसरात राई, मुर्धा, मोर्वा या परिसरात लाईन टाकण्याकरिता ही निविदा गेल्या सभेत आली होती आणि आपण त्यावेळेला त्यांना टी.एस. घेतला पाहिजे असे सांगितले होते व सभापती साहेबांनी या विषयावर चर्चा केलेली आहे. या विषयात कुठल्याही प्रकारचा तसा प्रॉब्लेम आला किंवा अडचण निर्माण झाली तर सभापती साहेब या विषयाला तोंड देण्यासाठी सक्षम आहेत. या ठिकाणी मी ठराव मांडत आहे.

**मोहन पाटीलः-**

साहेब, आपण ठराव नंतर मांडा.

**दिनेश नलावडेः-**

हया विषयाला माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेखः-**

ठराव मांडलेला आहे की, फेरनिविदा काढण्यात यावी.

**मोहन पाटीलः-**

कॅफोने अजून अभिप्राय दिलेला नाही आहे. एस्टीमेट त्याची जर वाढलेली होती. तर तुम्ही त्याचा रेट अलाउन्स केला का?

**मा.सभापतीः-**

ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

**मोहन पाटीलः-**

सभापती महोदय, असे नाही चालत. तुम्ही ठराव मंजुर करा. पण चर्चेला समाधानी उत्तर दया.

**शरद पाटील:-**

सभापती महोदय, तुम्ही ठराव केला व तो मंजूरही केला. पण आम्हाला त्याच्यावर बोलायचे आहे. या ठरावामध्ये कोणतीही जबाबदारी कायदेशीररित्या स्थायी समितीवर आल्यास आम्ही ती जबाबदारी आमच्यावर घेणार नाही असे आम्ही तुम्हाला सांगतो व मी हे जे बोललो आहे ते इतिवृत्तांत आले पाहिजे.

**मा. सभापती:-**

आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, ही जबाबदारी कोणावर ही येणार नाही.

**आसिफ शेख:-**

असे बोलून प्रशासनाचा कारभार चालत नाही.

**मोहन पाटील:-**

आपण खुलासा करणार नाही का? मनमानीने हे ठराव पास करणार का? अजूनपर्यंत कॅफो काहीच बोलले नाही. टी.एस. अशा पध्दतीने सुरु केले जाईल नाही केले जाईल अशा पध्दतीने बोलले नाही.

**आसिफ शेख:-**

आता केळकर साहेबांनी सांगितले की, फेरनिविदा मागवा. त्यांनी स्पष्ट त्यांचे मत मांडले आहे.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

फेरनिविदा मागवा असे मी मत व्यक्त केलेले नाही. हे जर तुम्हाला अमान्य असेल हयाच्याबाबत अविश्वास असेल तर निश्चितपणे तुम्ही फेरनिविदा मागवा. एम.जे.पी.ला परत दया. कारण हे काम शहराच्या विकासाच्या दृष्टिने अतिशय महत्वाचे आहे. एवढीच माझी आपल्याला कळकळीचे विनंती आहे.

**मोहन पाटील:-**

असे मनमानी ठराव पास करायचे असेल सन्मा.सदस्य वैती साहेब असे करायचे असेल तर दप्तर गुंडाळतो आणि तुम्ही जे बोलता ते ऐकतो. तुम्ही ठराव मांडा आणि ते अनुमोदन देतील असे सभा चालवतो. वैती साहेब असे चालत नाही.

**चंद्रकांत वैती:-**

मोहन पाटील साहेब, आपण आणि आसिफ शेख साहेब आपण दोघेच बोलत आहात. अन्य सदस्याला आपण बोलायलाच देत नाही.

**मोहन पाटील:-**

साहेब, आम्ही तेच बोलतोय. आपण आम्हाला टेक्निकली माहिती दया. हयाच्यापुढे टी.एस. घेता येईल असा आपण आम्हाला अभिप्राय दया. मग आम्ही ते मान्य करु.

**नाकाडी:-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतोय, पहिली गोष्ट म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाची जी नियम पुस्तिका आहे. ती महापालिकेला नगरपालिका लागू आहे की नाही हा पहिला मुद्दा आहे. नंतर ते एम.एस.सी. ॲक्ट १४५ जो नियम आहे. त्यानुसार पी.डब्ल्यु.डी. जे मॅन्युअल आहे. ते आपल्याला लागू आहे. मार्गदर्शक म्हणून एम.एस.सी. ॲक्ट १८५ नुसार व जेव्हा निविदा मागवले होते. तेव्हा ते दहा लाखाच्या आत होत्या. त्यानुसार बी.पी.एम.सी.ॲक्ट कलम ७३ नुसार आयुक्त साहेब यांची आर्थिक, प्रशासकीय निविदा काढून मंजुरी घेण्यात आली व आर्थिक, प्रशासकीय मंजूरी घेतल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका कलम १३५ परिशिष्ट ४२ अनुक्रमांक १३ नुसार दहा लाखाच्या आत ही निविदा असल्यामुळे प्रशासकीय मंजुरी घेतल्यानंतर तांत्रिक मंजुरी कार्यकारी अभियंताची घेतलेली आहे. सार्वजनिक बांधकाम पुस्तिका कलम १३५ परिशिष्ट ४२ अनुक्रमांक १३ नुसार दहा लाखाच्या आत असल्यामुळे तांत्रिक मंजुरी कार्यकारी अभियंताची घेतलेली आहे आणि त्या मॅन्युअलनुसार कार्यकारी अभियंत्याला दहा लाखापर्यंत च्या पॉवर आहेत. सुरुवातीला दहा लाखाच्या आत पॉवर होती.

**मोहन पाटील:-**

आपण बोललात दहा लाखाच्या आत होत्या. अगोदर म्हणजे त्याचे रेट वाढले. मग त्याचा ॲनालेस केले का? दहा लाखाच्या वर गेल्यावर तुम्ही त्याचे रेट ॲनालेस केले का?

**निकमः-**

केले आहेत.

**नाकाडीः-**

निविदा आल्यानंतर एस्टीमेटपेक्षा ती जास्त दराने मागणी आली व ती वाटाघाटीनंतर कमी करण्यात आली. वाटाघाटीनंतर ही दहा टक्क्यापेक्षा जास्त दराने निविदा आल्या. त्या मंजुरीसाठी कार्यकारी अभियंत्यांनी २००३ पासून पाईपचे दर वाढल्यामुळे जास्त दराच्या निविदा मंजूर करण्यासाठी पाठवित असल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. निविदा मागवण्याची तारीख १४/८/२००३ होती. त्यामुळे वरील स्पष्टीकरण मान्य करण्यास हरकत नव्हती. ज्या निविदा मागवल्या त्या निविदा येण्याच्या दरम्यानच्या काळात पाईपचे दर वाढले. त्यामुळे दहा टक्क्यापेक्षा जास्त दर आले असे कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेले आहे. या वाढीत दरामुळे निविदांची रक्कम दहा लाखापेक्षा जास्त झाली. त्यामुळे बी.पी.एम.सी. ॲक्ट कलम ७२ नुसार मा. आयुक्त साहेब हयांनी अवलोकनार्थ न पाठविता मा. स्थायी समितीसमोर निविदा मंजुरीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

**मोहन पाटीलः-**

आपण हा जो खुलासा केला. तो दप्तरी होता. हा खुलासा आपण सदस्यांसमोर आणला नाही. जेव्हा तुम्ही वाटाघाटी केल्या. तेव्हा हया समितीला ही माहिती नव्हते की, आपण वाटाघाटी केले आहेत. असा विषय झाला व त्याच्यानंतर पुन्हा रेट वाढले व त्याचे ॲनालेस केले ते देखील सभागृहापुढे आले नाही की, अशा पध्दतीने रेट ॲनालेस केलेले आहेत आणि ते पण आलेले नाहीत आणि दुसरी गोष्ट वाटाघाटी कोणी केल्या.

**नाकाडीः-**

वाटाघाटी संबंधित विभाग करतो.

**मोहन पाटीलः-**

त्या वाटाघाटी कोणी केल्या.

**नाकाडीः-**

आयुक्त साहेबांनी केल्या.

**मोहन पाटीलः-**

आयुक्त साहेब, संबंधित खाते आणि कॉन्ट्रक्टर.

**नाकाडीः-**

आयुक्त साहेबांनी अधिका-यांना पॉवर दिले आहेत ते.

**मोहन पाटीलः-**

त्याची तुम्हाला पूर्ण माहिती नाही. हे तुम्ही बोलत आहात. त्यावरुन लक्षात येते. तो विषय असा आहे की, दहा टक्क्यापेक्षा एस्टीमेटली अबाव्ह गेले. त्याच्यानंतर टी.एस. घेतला तर अशी पध्दत आहे का, एकदा निविदा मंजूर केल्या आणि त्या मंजुरीला आल्या की, नंतर आपण टी.एस. घेउ शकतो. जर अशी पध्दत असेल तर हे काम न करता न घेता आपल्याला हयाच्यापुढे टेंडर काढता येईल. फायनानशियली सॅन्क्शन आणि तांत्रिक मंजुरी ही न घेता आपण ऑब्जेक्शन न घेता हे काम आपण ताबडतोब करु शकतो. तुम्ही टी.एस.घ्या. त्याला आपण बाजूला ठेवायचे आणि फायनानशियली सॅन्क्शन करुन घ्यायची. टेंडर मंजुरी घ्यायची आणि टेंडर मंजुरीला आणायचे आणि मंजूरीच्या वेळी आपण ती टी.एस. घ्यायचे अशी पध्दत चालते का? चालत असेल तर आपला अभिप्राय तुम्ही दया की, कामामध्ये अशी पध्दत लावलेली आहे. हयाच्यापुढे अशी पध्दत चालू शकेल असा आपला अभिप्राय हया कामावर आहे का?

**मा.सभापतीः-**

आपण एकदा नाही आपण दोनदा टी.एस. रिपोर्ट मागवला आहे.

**मोहन पाटीलः-**

साहेब, आपण असे टी.एस. रिपोर्ट नंतर घेउ शकतो का? तर आपण टी.एस. अगोदर घ्यायचाच नाही.

**मा.सभापतीः-**

आपण सर्व सभासदांनी घ्यायला सांगितले आहे.

**मोहन पाटील:-**

साहेब, तो घेतला. कमिशनर साहेबांनी त्यांना पॉवर्स दिल्या. सभापती साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, कमिशनर साहेबांनी एक्झीक्युटीव्ह दशोरे साहेब हयांना दहा लाखाचे पॉवर्स दिले आहेत. हे आपल्याला माहिती आहे का? ते मला माहिती नाही. त्यांनी त्यांना असे दिले तर त्यांच्याकडे तशी पध्दत नव्हती. त्यांना अगोदर पॉवर दिल्या नव्हत्या. म्हणून त्यांना आता दहा लाखाचे पॉवर दिले आणि एस्टीमेटली जायला पाहिजे होत्या आणि चांगली पध्दत आणलेली आहे. एक ऑपरेशन कमी करुन आपण टेंडर घाईमध्ये काढू शकतो आणि टी.एस. आपण नंतर घेउ. तर तसा अभिप्राय कॅफोने दयावा की, ही पध्दत चांगली आहे आणि ही पध्दत आम्हाला ही आवडेल. सगळया सभागृहाला आवडेल.

**आसिफ शेख:-**

उपआयुक्त साहेबांनी हयाचा खुलासा करावा की, दशोरे साहेबांना काय पॉवर्स दिल्या आहेत. प्रशासकीय आर्थिक मंजुरीचे पॉवर्स दिले आहेत का, टेंडर मंजूरीचे पॉवर दिले आहेत.

**दिपक खांबीत:-**

स्थायी समितीने सांगितले म्हणून सिटी इंजिनिअरकडे टी.एस. दिले.

**मोहन पाटील:-**

गेल्या चार-पाच दिवसाच्या आतमध्ये एक्झीक्युटीव्ह दशोरेजींना अशा पॉवर्स का दिल्या असताना पुन्हा पॉवर का दिल्या. त्यांच्याकडे तसे पॉवर्स होते तर त्यांना तसे पॉवर्स देण्याचे आवश्यकता नव्हती.

**दिपक खांबीत:-**

स्थायी समितीने विचारले म्हणून त्यांना तशा पॉवर्स दिल्या.

**मोहन पाटील:-**

त्यांच्याकडे तशा पॉवर्स नव्हत्या. म्हणून दिल्या ना. माझा प्रश्न असा आहे की, त्यांना पुन्हा पॉवर्स कशाला दिल्या?

**मा. सभापती:-**

आयुक्त साहेबांना जाउन विचारुन घ्या की, त्यांना पॉवर कशा दिल्यात.

**मोहन पाटील:-**

असे नाही. आपण त्यांना जाउन विचारुन घ्या. हे बरोबर नाही. त्यांनी आता खुलासा केला की, ॲज ए सदस्य म्हणून मला विशिष्ट पॉवर्स आहेत. त्याच्यानंतर प्रशासनाने सांगितले की, तुम्हाला विशिष्ट पॉवर्स घ्या. त्या असलेल्या पॉवर्स पुन्हा मला दया. म्हणजे मागच्या पॉवर्समध्ये तथ्य नसेल किंवा मागची पॉवर अशा पध्दतीने दिल्या नसतील. त्या आहेत किंवा त्या पॉवर दयाव्या लागत असतील. कमिशनर साहेबांना त्या पॉवर दयाव्या लागत असतील.

**मा. सभापती:-**

हयाच्यापूर्वीदेखील त्यांना दहा लाखाच्या पॉवर्स होत्या असे त्यांनी सांगितले आहे.

**मोहन पाटील:-**

विषय असा झाला की, पॉवर्स नसताना त्यांना पॉवर्स दिल्या. म्हणून मी सांगतो सभापती महोदय, आपले ऑफीशियली काम कमी होईल. टेंडर ताबडतोब निघतील. आपण टी.एस. आणि फायनानशियली मंजुरी घेतो. तर आपल्याला टी.एस. घेण्याची गरज नाही. आपण टी.एस. नंतर घेउ. कॅफोने याबाबत आपला अभिप्राय दयावा.

**मा. सभापती:-**

हा विषय संपला. हा विषय मंजूर झाला आहे.

**आसिफ शेख:-**

हा विषय आला आणि एवढा वादग्रस्त झालेला आहे. चर्चेला आला आहे व गंभीर स्वरुप याचे आहे. या संपूर्ण बाबतीत मा. आयुक्त साहेब हयांनी योग्य तो निर्णय घ्यावा असा ठराव मंजूर करुन घ्यावा.

**अशोक पाटील:-**

सभापती साहेब, ज्यावेळी कार्यकारी अभियंताचे टेक्निकल सॅन्क्शन ज्यावेळी घेतले. त्यावेळी डी.एस.आर. रेट जे होते ते टेंडर कॉल केल्यानंतर किती टक्क्यांनी वाढले. कारण जेव्हा टेंडर कॉल करतो. तेव्हा टेक्निकल सॅन्क्शन घेतो. तेव्हा दहा टक्क्यापर्यंत सवलत असते. त्या डी.एस.आर.

रेटमध्ये तर असे किती टक्क्यांनी  रेट वाढले आणि टेक्निकल सॅन्क्शन दहा लाखाच्या वर गेले आणि आता आपल्याला स्थायी समितीच्यासमोर मंजुरीसाठी आणावे लागले.  अशी डी. एस.आर. रेट किती टक्क्यांनी वाढले.  हा महत्वाचा मुद्‌दा पहिल्यांदा त्या कार्यकारी अभियंत्यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती:-**

दहा-बारा टक्क्यांनी वाढलेले आहे असे दाखविले आहे.

**अशोक पाटील:-**

जेव्हा आपण टेक्निकल सॅन्क्शन घेतो.  त्यावेळी दहा टक्क्यांपर्यंत सवलत असते अशी किती टक्क्यांनी किती  दिवसात वाढते.

**निकम:-**

आपण जी मॅन्युफक्चरिंग कंपनी आहे.  त्यांचे रेट मागवले आणि आपले रेट ते कम्प्यारेझन केले.  डी.एस.आर २००२/०३ चा आणि ते अबाव्ह १४ ते १५ टक्क्यांनी आणि त्यांचे रेट त्यांनी कोट केले.  त्यांनी पहिले २४/२५ टक्क्यावर केले.  त्यानंतर मग निगोशिएशन करुन घ्या.  कम्पायर रेटला कोट करायला लावले.

**अशोक पाटील:-**

एवढा २४ टक्क्यांपर्यंत फरक पडला.

**निकम:-**

हे त्यांनी भरले होते.

**अशोक पाटील:-**

त्यांनी लाख भरले असतील.  पण आपला डी.एस.आर.रेट काय म्हणतो ते सांगा.  आपण जे टेंडर कॉल करतो.  ते आपल्या डी.एस.आर.रेटमध्ये बसेल असेच टेंडर कॉल करतो.  टेंडर भरणारा पन्नास टक्के, शंभर टक्के अबाव्ह भरेल.  आपण आम्हाला नियम सांगा.  २००२-०३ चे डी.एस.आर. रेट एवढा आहे आणि आता ते एवढया टक्क्याने वाढले.  त्यांच्यामध्ये आपली कॅपॅसिटी असेल तर तो टेंडर कॉल कोण करणार?   ठेकेदार म्हणतो त्याच्या अबाव्हप्रमाणे.

**निकम:-**

कंपनी मॅन्युफक्चरिंग करते.  त्यांचे रेट आपण मागवले आणि ते कम्पायर केले.  त्यांचा रेट येतो पंधरा ते चौदा टक्केपर्यंत आणि जे रिपोर्ट केले होते.  बावीस-तेवीस टक्क्यांपर्यंत त्याचे निगोशिएशन करुन त्यांना आम्ही भरायला लावले.

**मोहन पाटील:-**

अशी पध्दत असताना आपण त्याची फेरनिविदा काढावी.  तुम्ही वाटाघाटी करुन करता त्यापेक्षा आपण फेरनिविदा काढावी आणि हयाच्यावर आयुक्त साहेबांचा अभिप्राय घ्यावा.  हे तुम्ही सहज बोलता की, चोवीस टक्क्याचा फरक पडतो.  निगोशिएशनला तुम्ही करता आपण आर्थिक संकट डोक्यावर कशाला ओढून घेता.

**आसिफ शेख:-**

फेरनिविदा काढणे हा चांगला विषय मोहन पाटील साहेबांनी येथे घेतला आहे.

**मा.सभापती:-**

आपण सांगितल्याप्रमाणे मी सभापती हया नात्याने हयाची जबाबदारी घेतलेली आहे आणि हा विषय मंजूर झालेला आहे.  पुढचा विषय घेण्यात यावा.

**(सभागृहात गोंधळ आणि मतदानाची मागणी)**

**अशोक पाटील:-**

उपआयुक्त साहेब, नियमामध्ये बसते का?  त्याचे आपण स्पष्टीकरण करा.  नाईक साहेब, नियमामध्ये बसते का?  नियमबाहय ठराव पास करायचे त्याचा आपण खुलासा शासनातर्फे करावा.

**मोहन पाटील:-**

जर फायनानशली आपण एकटे जर हयाची जबाबदारी घेत असाल तर हयाच्यापुढे येणारे टेंडर सभापती महोदयांनी एकटयाने घ्यावे.  आम्ही बसू येथे.  हयाच्यामध्ये शाश्वता निर्माण आहे.  त्याचा खुलासा होत नाही.  अधिकारी चोवीस टक्के झाले.  ॲनालस केले गेले.  वाटाघाटी केल्या गेल्या आहेत असे बोलले जाते तर फेरनिविदा आपण काढावी.  फरक काय पडतो.  फेरनिविदा काढली तर

तुम्ही आपल्या डोक्यावर कशाला बोजा घेता.  तुम्ही एकटयाने कशाला डोक्यावर घेता आवश्यकता काय होती.

**मा.सभापती:-**

माझ्या डोक्यावर येणार नाही.  कमिशनर साहेबांनी गोष्टी झालेल्या आहेत.

**मोहन पाटील:-**

साहेब, ते बरोबर आहे.  मग कमिशनर साहेबांनी ते करुन घ्यावे.  कमिशनर साहेबांनी सभेसमोर आणायची आवश्यकता नाही.  सभापती महोदय, कमिशनरला एवढे पॉवर्स आहेत की, ते अवलोकन करु शकता.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, आपल्या कारकीर्दीमध्ये चांगले निर्णय झाले पाहिजे.

**मा. सभापती:-**

सन्मा.सदस्य आसिफ शेख हयांनी सांगितल्याप्रमाणे या विषयावर मतदान करण्यात यावे.

**प्र.सचिव:-**

प्रकरण क्र. १७५ हया विषयाला जे विरोधात आहेत त्यांनी हात वर करावे.

ठरावाच्या विरोधात

मोहन पाटील, आसिफ शेख, रिटा शाह, नितीन ठाकूर, हरेश गावंड, याकुब कुरेशी

तटस्थ

अशोक पाटील

**मिलन म्हात्रे:-**

ठरावाच्या बाजूने मतदान करण्याच्या अगोदर मला माझे विश्लेषण करु दया.

**आसिफ शेख:-**

ही पध्दत चुकीची आहे.  आता मतदानाची प्रक्रिया सुरु झालेली आहे व आता आपल्याला त्यावर चर्चा करता येणार नाही.

**मिलन म्हात्रे:-**

मला माझे मत मांडायचे.

**आसिफ शेख:-**

आता मतदानाची प्रक्रिया सुरु आहे.

**चंद्रकांत वैती:-**

म्हात्रेजी, आपण आले मत मांडून बोला.

**मिलन म्हात्रे:-**

मी मत मांडले आहे.  तुम्ही एवढे निगेटीव्ह बोललात.  आम्हालासुध्दा बोलण्याचा अधिकार आहे.  येथे पाउण तास बसून सगळे मी ऐकतोय.  मागच्या सभेत हा विषय मी काढला होता आणि मी मतदान का करतो हे ही तुम्हाला सांगतोय.  मागच्या वेळेला या विषयावर महत्वाचा मुद्दा मी उपस्थित करुन हा ठराव आपण परत फेटाळला होता.  सिटी इंजिनिअर हयांचे ओपिनियन घेण्याकरिता त्यांचे ओपिनियन आलेले आहे.  त्यांनी येथे जे विश्लेषण केले त्याचा विचार करता मी या ठरावाच्या बाजून मतदान करत आहे.

**प्र. सचिव :-**

ठरावाच्या बाजूने चंद्रकांत वैती, दिनेश नलावडे, अनंत पाटील, जोजफ घोन्सालवीस, शरद पाटील, धनराज अग्रवाल, मिलन म्हात्रे, मॉरस रॉड्रीक्स असे आठ सन्मा. सदस्य ठरावाच्या बाजूने आहेत.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र.१७५:-**

भाईंदर पूर्व व पश्चिम येथे जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता आलेल्या निविदांना मंजुरी देणे (दिनांक ६/११/०३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १६१)

ठराव क्र.

id. 14.08.2003 raojaIcyaa dOinak navaakaL¸ saagar¸ saamanaa yaa vaR<ap~amaQyao p`isaQd Jaalaolyaa jaahIr inaivada saucanaonausaar imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka xao~at kravayaacyaa inarinaraLyaa jalavaahInaI TakNao kamaakrIta zokodaranaI puZIlap`maaNao inaivada maQaIla dr idlaolao Aahot.

| A. Ë. | | kamaacao naaMva À zokodaracao naava | AMdaijat r@kmaÀdr |
|---|---|---|---|
| **1.** | | **navaGar raoD yaoiqala vasauMQara ApaT-** | |
| | | **maoMT to saujaata ka^mPlao@sa pya-t** | **9¸97¸208À¹** |
| | 1. | **jalavaahInaI TakNao ³ela.e.@laasa vyaasa** | 23.2‰jaada |
| | 2. | **150 ima.mal.¸ laaMbaI 825 mal.´** | dranao |
| | 3. | mao.vasaMt knsT/@Sana kM [MDIyaa | 25.00‰jaada |
| | | mao. p`kaSa ena. rayaisaMGaanaI | dranao |
| | | mao. ivaMQyaa T/Dsa- | 29.9‰jaada |
| | | | dranao |
| **2.** | | **Baa[-Mdr pUva- yaoiqala saa[-baabaa** | **7¸25¸903À¹** |
| | | **maMidr to JauNaka Baakr koMd`** | |
| | | **jaunaI isamaoMTcaI jalavaahInaI badlaUna** | |
| | 1. | **naivana ibaDacaI jalavaahInaI TakNao.** | 24.30‰ jaada |
| | 2. | **³ela.e.@laasa vyaasa 150 ima.mal.¸ laaMbaI** | dranao |
| | 3. | **625 mal.´** | 26.10‰ jaada |
| | | ikrNa bal. jaaQava | dranao |
| | | p`kaSa ena. rayaisaMGaanaI | 27.00‰ jaada |
| | | mao. ekaoTok [MijainaAsa- | dranao |
| **3.** | | **paoilasa sToSana to maubaark** | **8¸10¸521À¹** |
| | | **ka^mPlao@sa va ASaaok nagar yaoqao** | |
| | | **ibaDacaI jalavaahInaI TakNao.** | |
| | | **³ela.e.@laasa vyaasa 150 ima.mal.¸ laaMbaI** | |
| | 1. | **154 mal.´** | 23.80‰ jaada |
| | 2. | **³ela.e.@laasa vyaasa 200 ima.mal.¸ laaMbaI** | dranao |
| | 3. | **382 mal.´** | 26.00‰ jaada |
| | | mao. yaSa [MTrp`ayajaosa | dranao |
| | | mao. esa.ena. z@kr knsT/@Sana p`a.ila. | 27.00‰ jaada |
| | | mao. ekaoTok [MijainaAsa- | dranao |
| **4.** | | **ra[-gaava yaoiqala naL AaLI va Dba AaLI** | **9¸99¸175À¹** |
| | | **yaoqao jalavaahInaI TakNao** | |
| | | **³ela.e.@laasa vyaasa 100 ima.mal.¸ laaMbaI** | |
| | 1. | **300 mal.´** | 20.50‰ jaada |
| | 2. | **³ela.e.@laasa vyaasa 150 ima.mal.¸ laaMbaI** | dranao |
| | 3. | **600 mal.´** | 29.00‰ jaada |

| | | |
|---|---|---|
| 4. | mao. ivaMQyaa T/oDsa- | dranao |
| | mao. esa.ena. z@kr knsT/@Sana p`a. ila. | 30.00‰ jaada |
| | mao. saMdoSa DI. bauTalaa | dranao |
| | mao. yaSa [MTrp`ayajaosa | 35.00 jaada |
| | | dranao |
| **5.** | **ra[-gaava yaoiqala manapa p`aqaimak SaaLa to lyauba`Ikoma kMpnaI pya-t** | **9¸89¸185À1** |
| 1. | **jalavaahInaI TakNao** | 16.06‰ jaada |
| 2. | **3ela.e.@laasa vyaasa 100 ima.maI.¸ laaMbaI** | dranao |
| 3. | **815 maI.´** | 20.40‰jaada |
| | mao. KoraDo [MTrp`ayajaosa | dranao |
| | mao. saMdoSa DI. bauTalaa | 40.00‰ jaada |
| | mao. yaSa [MTrp`ayajaosa | dranao |
| **6.** | **maaovaa- gaava yaoiqala isamaoMTcaI jalavaahInaI badlaUna naivana ibaDacaI jalavaahInaI TakNao** | **9¸65¸748À1** |
| 1. | **3ela.e.@laasa vyaasa 100 ima.maI.¸ laaMbaI** | 19.00‰ jaada |
| 2. | **570 maI.´** | dranao |
| 3. | **3ela.e.@laasa vyaasa 150 ima.maI.¸ laaMbaI** | 24.00‰ jaada |
| 4. | **200 maI.´** | dranao |
| | mao. saMdoSa DI. bauTalaa | 26.00‰ jaada |
| | mao. yaSa [MTrp`ayajaosa | dranao |
| | mao. ikrNa baI. jaaQava | 28.00‰ jaada |
| | mao. ivaMQyaa T/oDsa- | dranao |
| **7.** | **DaoMgarI basasTa^p to caaOk Qa@ka yaa Baagaat isamaoMTcaI jalavaahInaI badlaUna naivana jalavaahInaI TakNao** | **9¸52¸067À1** |
| 1. | **3ela.e.@laasa vyaasa 150 ima.maI.¸ laaMbaI** | 22.7‰ jaada |
| 2. | **900 maI.´** | dranao |
| 3. | mao. saMdoSa DI. bauTalaa | 25.00‰ jaada |
| 4. | mao. ko. Ao. paTIla | dranao |
| 5. | mao. ikrNa baI. jaaQava | 31.50‰ jaada |
| | mao. KoraDo [MTrp`ayajaosa | dranao |
| | mao. ko. Aar. saaonaavaNao A^MnD sansa | 39.6‰ jaada |
| | | dranao |

rijasTr va Aayakr p`maaNap~ saadr kolaolao naahIt¸ %yaamauLo sadrhU inaivada r_

| | | |
|---|---|---|
| | | krNyaat Aalaolal Aaho. |
| **8.** | **DaoMgarI to d<amaMidr BaagaatIla isamaoMTcaI jalavaahInaI badlaUna naivana ibaDacaI jalavaahInaI TakNao** | **8¸89¸046À¹** |
| | 1. **³ela.e.@laasa vyaasa 100 ima.mal.¸ laaMbaI** <br> 2. **750 mal.´** <br> 3. mao. yaSa [MTrp`ayajaosa <br> mao. ikrNa baI. jaaQava <br> mao. saMdoSa DI. bauTalaa | 24.30‰jaada dranao <br> 27.00‰jaada dranao <br> 28.00‰ jaada dranao |
| **9.** | **DaoMgarI gaava yaoqao ija. Aaya. jalavaahInaI TakNao** | **8¸25¸800À¹** |
| | 1. **³imaDIyama @laasa vyaasa 100 ima.mal.¸** <br> 2. **laaMbaI 900 mal.´** <br> 3. mao. ko. e. paTIla <br> mao. p`kaSa ena. rayaisaMGaanaI <br> mao. vasaMt knsT/@Sana kM [MDIyaa | 5.5 ‰ jaada dranao <br> 22.2‰jaada dranao <br> 28.10‰jaada dranao |
| **10.** | **caaOk gaava yaoqao ija. Aaya. jalavaahInaI TakNao** | **9¸46¸115À¹** |
| | 1. **³imaDIyama @laasa vyaasa 100 ima.mal.¸** <br> 2. **laaMbaI 1800 mal.´** <br> 3. mao. ko. e. paTIla <br> 4. mao. saMdoSa DI. bauTalaa <br> mao. p`kaSa ena. rayaisaMGaanaI <br> mao. ko. Aar. saaonaavaNao A^MnD sansa | 2.5‰ jaada dranao <br> 24.5‰ jaada dranao <br> 29.8‰ jaada dranao <br> rijasT/oSana va Aayakr p`maaNap~o saadr kolaolaI naahIt¸ %yaamauLo sadrhU inaivada r_ krNyaat AalaolaI Aaho. |

varIla tulanaa%mak t@ta pahta AQaaoroKIt kolaolyaa inaivada hyaa savaa-t kmaI dracyaa Aahot. yaa inaivadaMpOkI A.Ë. 1 to 8 yaa kamaaMkrIta Aalaolyaa savaa-t kmaI dracyaa inaivada hyaa caalau baajaarBaavaa nausaar AvaajavaI dracyaa Aahot Asao idsaUna yaoto. sadrhU inaivada QaarkaMnaa id.02.09.03 va 03.09.03 raojaI kayaa-layaat vaaTaGaaTIsaazI

baaolaivaNyaat Aalao haoto. sadr zokodaraMnaI vaaTaGaaTInausaar KalaIla drap`maaNao kama krNyaasa tyaar Asalyaacao ilahUna idlaolao Aaho.

| A.Ë. | zokodracao naaMva | vaaTaGaaTInausaar kmaI kolaolao dr |
|---|---|---|
| 1. | mao. vasaMt knsT/@Sana kM. [MDIyaa | 12.00‰ jaada dranao |
| 2. | ikrNa baI. jaaQava | 14.00‰ jaada dranao |
| 3. | mao. yaSa [MTrp`ayajaosa | 13.00‰ jaada dranao |
| 4. | mao. ivaMQyaa T/oDsa- | 13.50 ‰jaada dranao |
| 5. | mao. KoraDo [MTrp`ayajaosa | 13.00‰ jaada dranao |
| 6. | mao. saMdoSa DI. bauTalaa | 14.00‰ jaada dranao |
| 7. | mao. saMdoSa DI. bauTalaa | 12.50‰ jaada dranao |
| 8. | mao. yaSa [MTrp`ayajaosa | 14.00‰ jaada dranao |

varIla p`maaNao zokodaraMcyaa baraobar vaaTaGaaTInausaar kmaI kolaolao dr pahta caalaU baajaar Baavaacyaa tulanaonausaar vaajavaI Aahot.

tsaoca A.Ë. 9 cao kamaakrIta mao. ko.e. paTIla yaaMcaI 5.5‰ jaada dracaI va 10 cao kamaakrIta mao.ko.e. paTIla yaaMcaI 2.5‰ jaada dracaI inaivada caalaU baajaarBaava pahta vaajavaI dracyaa Aahot.

trI varIla kamaaMcyaa savaa-t kmaI dracyaa inaivadaMnaa maa.sqaayaI saimatI maMjaUrI dot Aaho.

**zravaacyaa baajaUnao**

1. EaI. maa^rsa ra^D/I@sa
2. EaI. caMd`kaMt vaOtI
3. EaI. idnaoSa nalaavaDo
4. EaI. AnaMt paTIla
5. EaI. jyaaojaf gaaonsaalaivasa
6. EaI. Sard paTIla
7. EaI. Qanaraja Aga`vaala
8. EaI. imalana mha~o

**zravaacyaa ivaraoQaat**

1. EaI. maaohna paTIla
2. EaI. AasaIf SaoK
3. EaImatI. irTa Saha
4. EaI. inatIna zakur
5. EaI. hroSa gaavaMD
6. EaI. yaakuba kuroSaI

**tTsqa**

1. EaI. ASaaok paTIla

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. अनंत पाटील.**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७६ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

या विषयात जी आकडयाची दुरुस्ती आहे ती माशाळकर यांनी सांगावे.

**माशाळकरः-**

आयटम नं. ३ पहिल्या पानावर लायम मॅट्रीक्स प्रिंटर आहे. त्याची किंमत दोन लाख नउ हजाराच्या जागी वीस हजार नऊशे झाले आहे. एक शुन्य टायपिंग राहिले आहे. २,०९,००० आणि त्यांची अमाउन्ट लिहिलेली आहे.

**मिलन म्हात्रेः-**

ती अमाउन्ट लिहिलेली नाही.

**माशाळकरः-**

२४,९१,९०० लिहिण्यात आलेले होते. त्याच्यात १,८८,९०० ॲड करायला पाहिजे. हे जे मायनस झालेले २६ लाख ८० हजार टोटल येते व १ लाख ८८ हजार शंभर ॲड करायचे आहे व दुस-या पानावर शेवटच्या परिच्छेदात तिथे दुरुस्ती करायचे आहे. २६ लाख ८० हजार करायचे वजा ४९,०९० करुन जी अमाउन्ट येते ती २६ लाख ३० हजार ८० रुपये करायचे आहे.

**मिलन म्हात्रेः-**

या खरेदीच्या बद्दल आपल्याला आणखीन काही मत नोंदवायचे असेल तर आपण नोंदवावे व मला या विषयावर बोलायचे आहे. त्याकरिता आपण नंतर मला परवानगी दयावी.

**मा.सभापतीः-**

आपण या विषयावर बोलून घ्यावे.

**मिलन म्हात्रेः-**

या महानगरपालिकेमध्ये संगणकीकरण प्रथमच होत आहे. आपण जे मटेरियल येथे आणणार आहात आणि जे कार्यरत करणार आहात. त्याबद्दल आम्हाला सर्व सभासदांना स्थायी समितीच्या सदस्यांना व्यवस्थित माहिती दया.

**धनराज अग्रवालः-**

आपण हे जे काढले आहे त्यात सी.पी.यु. कुठले आहे. मदरबोर्ड कुठले आहे व आर.पी.एम. काय असणार आहे.

**माशाळकरः-**

आर.पी.एम. आपण हार्डडिस्कचा विचारत आहोत. तर हार्डडिस्कचे जे आर.पी.एम. असतात. ते नॉर्मल कॅम्प्युटरमध्ये आर.पी.एम. चे हार्डडिस्क असतात. त्याचे आर.पी.एम. असते ते ७,२०० आणि ५,३०० असे असते आणि येथे जे मी घेतले आहे. ते हायअल्ट्रा स्पीड असे त्याचे स्पेसीफिकेशन आहे.

**धनराज अग्रवालः-**

ती ७,२०० हे चांगले असते का?

**माशाळकरः-**

नॉर्मल जे संगणकामध्ये आम्ही वापरतोय तर त्याचे आय.डी.ई. कंट्रोलर असतात. त्याचा स्पीड नॉर्मल संगणकाकरिता असतो. ज्यावेळेला आम्ही सर्वेअर म्हणून वापरतो त्याचा स्पीड आणि परफॉर्मन्स हायर असायला पाहिजे. सगळा डेटा एका संगणकामध्ये स्टोअर केला जातो आणि सगळयांना संगणकाची रिक्वेस्ट पुरविण्यासाठी त्याचा स्पीड जास्त असायला पाहिजे. त्याच्यासाठी आम्ही जे येथे वापरलेले आहे. छोटे हार्डडिक्स ३.५ ची साईज आणि ३२० अल्ट्रा स्पीड आहे. हे स्कसी हार्डडिक्स आहे आणि हॉट स्वॅपेबल आहेत.

**धनराज अग्रवालः-**

८ नंबरवर जे डेस्क प्रिंटर आहे. त्याची रेट ८,९०० आणला.

**माशाळकरः-**

आपण जे डेस्क जेट प्रिंटरबद्दल म्हणालात तर काल पण फॉरमली बोलणे ज्यावेळेला झाले होते. त्यावेळेला डेस्क जेट जे प्रिंटर आहे. ५६१० हे डेस्क जेट प्रिंटरचे आम्ही एच.पी. कडून मागितले होते व त्याच्यात एकूण एक मॅन्युफॅक्चरींग आहेत. त्यांच्याकडून आम्ही रेट मागवून घेतला होता. त्याप्रमाणे आम्ही बाजारभाव काढून काढले आहेत. त्याच्यापेक्षा कमी आणले आहेत. डेस्क जेट प्रिंटर नॉरमली लमसममध्ये घेतले तर फरक पडतो. ज्यावेळेला व्हिप्रो किंवा दुसरी पार्टी एक दोन सप्लाय करतो. त्यावेळेला रेटमध्ये शंभर, दिडशे, हजार, बाराशे एवढा फरक होण्याची शक्यता आहे.

**धनराज अग्रवालः-**

आपण जे फॅक्स मॉडम घेतलेले आहे. तर किती एकच मशीन आहे.

**माशाळकरः-**

एका ठिकाणी फक्त एकच मशीन आणि आम्ही ते कॉन्फीगरेशन करुन सगळयांना वापरायला देउ शकतो. एक मॉडम अस झाले. म्हणजे मी एकटा वापरु शकतो असा काही प्रकार नाही आहे. पूर्ण महानगरपालिकेसाठी एक मॉडम बस झाले.

**धनराज अग्रवालः-**

स्विचमध्ये काय.

**माशाळकरः-**

साहेब, स्विचमध्ये मॅनेज आणि अनमॅनेज स्विच असे दोन प्रकारचे असतात. सध्या मला जे काम राबविण्यासाठी पाहिजे व सध्या जे काम हाती घेतलेले आहे. तर ते प्रॉपर्टी टॅक्स, वॉटर टॅक्स आणि हे काम आम्हाला मे महिन्यामध्ये सुरु करायचे आहे असे महानगरपालिकेने ठरविलेले आहे. सध्या आम्ही जे वीस मशीन घेतोय तर पंधरा मशीन आम्ही हिस्ट्री एन्ट्री करण्यासाठी वापर करणार आहोत आणि ते पंधरा मशीन सध्या जे संगणकी करण्याचे रुम आहे. तिसरा माळा तिथे बसवायचे आहे आणि अनमॅनेज स्विच २४ पोर्टचे येथे घेतोय कारण बारा पोर्ट असले तर २४ असेल तर चार रिकामी राहिले तर चालेल. मला पाहिजे असेल तर मी पुढे चार वाढवू शकतो. डेटा एन्ट्रीसाठी उशिर होतोय असे वाटले तर मी चार संगणक जास्त वाढवून २४ पर्यंत वाढवू शकतो. सध्या मी अनमॅनेज घेतलेले आहे. म्हणजे हयाच्यात काही इंटलेजेन्टली वापरणसारखे नसते. हयाच्यात आपण नेटवर्कींग एक रुमपर्यंत क्रिएट करायचे तिथे डेटा एन्ट्री करण्यासाठी अनमॅनेज स्विच २४ पोर्टचे घेतलेले आहे.

**चंद्रकांत वैतीः-**

आपण महापालिकेचे संगणकीकरण करायला आपण सर्व डिस्काउन्ट आणि आपण प्रिंटर सहा पध्दतीचे घेतोय. हयाच्यामध्ये आपण सी.डी. रायटर घेतोय आणि ते रेकॉर्डिंगला कामकाजाला नक्की गती देण्यासाठी उपयुक्त असेल. परंतु, हयाच्यामध्ये आपण जे हे मॉनीटर आणि प्रिंटर घेतोय. या सगळया आपण कुठल्या कंपनीचे घेतोय का कसले बंधन घातलेले आहे का? आणि त्यानंतर त्याच्याशी जे संबंधित काम असेल त्याची फिटींग करणे किंवा त्याच्याबद्दल पुढचे मेन्टेनन्स त्या अटीशर्ती कंपनीला घातलेल्या आहेत का?

**माशाळकरः-**

टेंडरमध्ये जे घ्यायचे ठरविले आहे. ते ओनली नॅशनल अॅन्ड इन्टरनॅशनल ब्रॅन्डचे घ्यायचे ठरविले आहे.

**चंद्रकांत वैती:-**

साधारणपणे कुठला ब्रॅन्ड असेल.

**माशाळकर:-**

आम्ही एक्झॅम्पल सांगू शकतो आणि मला जे आले आहे ते ही सांगू शकतो.

**चंद्रकांत वैती:-**

आपण सांगावे.

**माशाळकर:-**

उदाहरणार्थ नॅशनल अॅन्ड इन्टरनॅशनल ब्रॅन्डमध्ये माझ्या डोक्यात फक्त आय.बी.एम. हयुलेट पॅकेट आणि विप्रो हे मी ठेवले होते आणि मी जे ऑलरेडी बाजारभाव काढले होते. हयुलेट पॅकेट आणि विप्रोचे बाजारभाव काढून माझ्याकडे ठेवलेले आहे आणि त्याच्याप्रमाणे टेंडरचे प्रोसेसिंग केले होते व त्याप्रमाणे आम्हाला जे आलेले आहेत. संगणकापैकी सर्वेअर आणि डेस्क टॉप आणि दोन डॉटमॅट्रिक प्रिंटर्स हे विप्रोचे आलेले आहे आणि लेझर प्रिंटर घेतोय ते युनेट पॅकेट घेत आहे. ते इन्टरनॅशनल स्टँडचे आहे आणि आमचे जे बिल प्रिंट होण्यासाठी जी क्षमता पाहिजे. त्याकरिता लेझर प्रिंटर पाहिजे. हयुलेट मला माहिती आहे. ते महाग आहे. पण बिलासाठी तेच वापरायला पाहिजे. त्याच्यासाठी मी एच.पी. डोक्यात ठेवले आहे.

**चंद्रकांत वैती:-**

एम.एस. ऑफीस मिडीया आणि एम.एस. ऑफिस लायसन्स काय आहे?

**माशाळकर:-**

एम.एस. आफीस मिडीयामध्ये लायसन्स घ्यायला गेलो तर त्याच्यासाठी जास्त पैसे लागतात. जे एम.एस. ऑफिस पॅक येतोय. त्याच्यामध्ये मॅन्युअल डॉक्युमेटेन्शन आणि एक सी.डी. असते आणि जे काय आम्ही कम्प्युटर वापरतो तर आतापर्यंत महानगरपालिकेत आम्ही जे कम्प्युटर परचेस केले आहे. आम्ही एकपण लायसन्स कॉपी घेतलेली नाही आहे. ही चुकीचे पध्दत आहे आणि महानगरपालिका लोकल सेल्फ गर्व्हनमेन्टमध्ये असल्यामुळे आम्हाला लायसन्स कॉपी घेणे भाग आहे. त्यामुळे आम्ही आधी पंधरा मशीन ठरवले होते. फक्त आम्ही पंधरा मशीनसाठी पंधरा लायसन्स वापरले आहेत. अजून कुठे जरुरी नाही आहे की, आम्ही पन्नास मशीन घेतले तर पन्नास एम.एस. ऑफीस जरुरी नाही आहे. जे ऑफिसर आणि जे टायपिस्ट वापरतात. त्यांना एम.एस.ऑफिस लागते. जे काउन्टरवर बसून पैसे घेणारे आहेत आणि पावती देणारे आहेत. त्यांना एम.एस. ऑफिस लागत नाही. त्यामुळे जेवढी आवश्यकता आहे. तेवढेच मागवले. आता मला पंधरा आवश्यक वाटले म्हणून मी पंधरा नमुद केलेले आहे आणि पुढे आवश्यक वाटले तर रिपिट रेट ऑर्डरमध्ये जे रेट ठरलेले आहे. त्याप्रमाणे आम्ही त्यांना ऑर्डर करु शकतो आणि हयांनी जे विचारले आहे. हे जे रेट आहे. त्या रेटमध्ये इन्क्युलिझिव्ह ऑल त्याच्यात ऑक्ट्रॉय, सेल्स टॅक्स, इन्शुरन्स आणि ट्रान्सपोर्टटेशन आणि दोन वर्षाची ॲडिशनल वॉरन्टी. आता जे मशीन आम्ही घेतोय. त्याचे कमीत कमी तीन वर्ष स्पेअर पार्टस उपलब्ध व्हायला पाहिजे. नाहीतर आम्ही ते घेउन इन्टॉल होईपर्यंत तीन ते चार महिने लागणार. आमचे काम पाच ते सहा महिन्यात चालू झालेले असते. परंतु, अॅन्युअल मेन्टेनन्स कॉन्ट्रॅक्टसाठी परत ठेवावे लागते. त्याच्यासाठी अटीशर्तीमध्ये जे रेट आता घेतलेले आहे. त्यांना सांगितलेले आहे. तुम्ही दोन वर्ष ॲडिशनल अॅन्युअल मेन्टेनन्स ॲड करुनच हयाच्यात दया. आता एकदा मशीन घेतली तर तीन वर्षापर्यंत आम्हाला हयाच्या भानगडीत पडायचे नाही.

**धनराज अग्रवाल:-**

ऑक्ट्रॉयमध्ये आपले काय ठरले आहे. आपल्या महापालिकेची वस्तु असेल तर त्यांना ऑक्ट्रॉय दयावा लागतो का?

**माशाळकर:-**

मी जे माहिती घेतली होती. आतापर्यंत ते वेन्डरने भरायला पाहिजे आणि जर वेन्डरने भरायचे असेल तर इट हॅज टु इन्क्युड ऑक्ट्रॉय व महानगरपालिका वगळत असेल तर मला माहिती नाही.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती महोदय, माशाळकर साहेबांनी केळकर साहेब हयांच्या सहीचे एक पत्र दिले आहे. त्या माहितीचे माझे पत्र होते १८/११/०३ चे एक महिन्या अगोदर त्यांना मी पत्र दिले होते. परंतु, सदर माहिती ही काल रात्री माझ्या घरी पोहोचली साडे-सात, आठच्या दरम्यान. आपण हे जे कॅम्प्युटर खरेदी करतोय किंवा करणार आहे त्याचे शासनाकडून आपल्याला अनुदान वगैरे काही.

**माशाळकरः-**

सध्या हया कामासाठी शासनाकडून अनुदान नाही आहे. मी आणि स्वतः आयुक्त साहेब मंत्रालयात गेलो होतो आणि सचिव माहिती तंत्रज्ञान श्री. कुल्लर साहेबांशी बोललो आणि हे क्त पायलेट प्रोजेक्ट म्हणून नागपूर आणि उल्हासनगरला त्यांना दहा लाखाचे अनुदान दिले होते. मी तुमच्या पत्रात उल्लेख केला होता. ॲप्लीकेशन सॉफ्टवेअरसाठी जे काही पैसे लागतील. शासनाने महिना किंवा दीड महिन्यानंतर निर्णय घेणार आहे. शासनाने कदाचित निर्णय घेतले तर.

**मिलन म्हात्रेः-**

आपण शासनाकडे कधी गेला होता.

**माशाळकरः-**

२४/११/२००३ ला गेलो होतो.

**मिलन म्हात्रेः-**

कारण आपल्याला शासनाकडून (अ) वर्ग नगरपरिषद पन्नास टक्के (ब) वर्ग पासष्ठ टक्के आणि (क) वर्ग पंच्याहत्तर टक्के शासन अनुदान देणार आहे. हा आपल्या महानगरपालिकेला जी. आर. अवलंबला आहे. आपण हा जो सदरचा विषय आणला आहे. त्याच्यामध्ये आपण ही माहिती कुठेही दिलेली नाही. तर हया अनुषंगाने जी. आर.ची कॉपी मी आपल्याला देतोय १७ सप्टेंबर २००३. आपण अकराव्या महिन्यात गेला होता आणि सप्टेंबर महिन्यात जी.आर. आला आहे आणि आपल्याला जर अनुदान मिळत असेल तर त्याच्यासाठी शासनाला पाठपुरावा करावा. अमाउन्ट फार मोठी आहे. हा जी. आर. मी आपल्या माहितीसाठी देतोय. सचिवांनी तो जी. आर. रेकॉर्डवर आणावा. ही जी. एस. आर. एनफोटेक आहे. त्याचा बजेटवर परिणाम होईल. तर तुम्हाला अनुदान मिळत असेल तर ते अनुदान मागण्याकरिता शासनाकडे अर्ज करावा लागेल. कारण आता दोन ते तीन महिने झाले. आता आपण आले बजेट हयाच्यामध्ये मोडीफाय करणार आहे. त्यांच्यामध्ये ही अमाउन्ट जर तुम्हाला मिळू शकेल तर तुम्हाला हयाच्या पुढचा जो प्रोजेक्ट आहे किंवा आता जर तुम्ही पन्नास कॅम्प्युटर आणायचे ठरवले किंवा भविष्यात तुम्हाला अजून पंचवीस घ्यायचे आहे. तर हयाच्यामध्ये आपण आणखीन काही सोय करु शकतो. लॅन्ड लाईनची हयाच्यामध्ये काय प्रोसिजर आहे. लोकल एरिया नेट वर्कींगचे जे आहे. मी तुमच्या पत्रातदेखील शेवटच्या परिच्छेदात उल्लेख केला होता.

**माशाळकर :-**

लोकल एरिया नेटवर्किंग सध्याच्या परिस्थितीत आम्ही पहिले रेव्हेन्युला प्रिफरेन्स देउन आधी बिल काढून बिल वाटायचे. मे पर्यंत पहिल्या आठवडयापर्यंत त्याच्यांनतर ग्राउन्ड फ्लोअरपासून चार माळयापर्यंत जे लोकल एरिया नेटवर्कींगचे केबलिंग करायचे आहे. ते प्रॉपर प्लॅनिंग किंवा लिटरली बांधकाम विभागाकडून ड्रॉईंग घेउन जागा फिक्स करुन ते करायचे आहे. ते एप्रिलच्यानंतर करायचे ठरविले आहे. त्यावेळेला जे नागरी सुविधा केंद्र बनवायचे आहे. ते आम्ही लक्षात घेउन मग त्याच्याप्रमाणे आम्ही प्रोसिजर करणार आहोत.

**मिलन म्हात्रेः-**

तरतुद किती आहे.

**माशाळकरः-**

पुढच्या फायनानशिल ईअरमध्ये.

**मिलन म्हात्रेः-**

वाईड एरिया नेटवर्कबद्‌दल आपले मत काय?

**माशाळकरः-**

आपण जे म्हणता वाईड एरिया नेटवर्कींग बाकी एक-दोन ठिकाणी केलेले आहे. उदाहरणार्थ आपण जे म्हणालात तर वाईड एरिया नेटवर्कींग आम्ही कल्याणमध्ये केले होते. तिथे मी स्वतः प्रकल्प प्रबंधक असल्यामुळे मला ते माहिती आहे. त्या तिथे वेगवेगळे आठ वॉर्ड ऑफिस होते आणि डोंबिवली डिव्हजन होते. त्यामुळे वाईड एरिया नेटवर्कींग हे वेगळे म्हणजे आता जे आम्ही सॉफ्टवेअर करतोय

आणि पुढे जे वाईड एरिया सॉफ्टवर्किंग करावे लागले तर पुढे आम्हाला लिझलिंग डी.एस.एन.एल. किंवा एम.टी.एन.एल. कडून घ्यावे लागते. आम्हाला येथे एम.टी.एन.एल. उपलब्ध असल्यामुळे आम्ही एम.टी.एन.एल. कडून टू एम.बी.बी.एस.आर. १२० के.बी.बी.एस. त्याचे लिझलेंग घेउन आम्ही एस्ट्राबीश करु शकतो. हे जे ॲप्लेकेशन सॉफ्टवेअर आम्ही वापरणार आहोत हे मल्टीयुझर ॲनव्हाटमेन्टमध्ये चालणार आहे. फक्त आम्हाला लोकेशन वाढतील आणि ते लोकेशनला जोडायचे कसे इथपर्यंत वायर नेता येत नाही. त्यामुळे आम्हाला एक लिझ लॅन्ड परचेस करावा लागणार आहे आणि ज्यावेळेला आमचे वार्ड ऑफिस होतात नाहीतर मिरा रोडच्या ऑफिस येथे पूर्णपणे कामकाज सुरु केल्यानंतर वी कॅन एस्टॅब्लिश दॅट लिंकिंग ओव्हर देम.

**मिलन म्हात्रे:-**

बारा नंबरच्या पॉईन्टला तुम्ही फॅक्स म्हणू दिले आहे. त्याच्यात आपण टेलिफोन मॉडमची सुध्दा आपण तरतुद करावी.

**माशाळकर:-**

आपण सविस्तर खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे:-**

चेनापासून ते उत्तनपर्यंतचा परिसर आहे आणि उदया तुम्ही तुमच्या हयाच्यामध्ये इन्फोरमेशन टेक्नॉलजी आणि सिस्टीम चालू करणार तर समजा एखादया उत्तनच्या किंवा चेन्नाच्या किंवा पेणकर पाडयाच्या व्यक्तीला तुम्हाला फोनने तक्रार करायची असेल किंवा त्याच्याकडे इंटरनेट आहे. समजा माझ्याकडे इन्टरनेट आहे. नेटवर्क आहे. माझ्या वार्डमधल्या किती नागरिकांनी तक्रारी केल्या किंवा कुठल्या कुठल्या केल्या आहेत. लेटेस्ट टेकनॉलजी गोळा करायच्या असतील तर मी फोन केला आणि मला त्या फोनवर उपलब्ध होउ शकतात. त्याकरिता तुम्ही जे फॅक्स मॉडम दिले आहे. तर माझी आपल्याला विनंती आहे. त्याच्यामध्ये टेलिफोन मॉडमदेखील आपण ॲड करा. त्याच्यानंतर आपले पी.आर.ओ. सॅन्क्शन चालू होणार आहे. जेव्हा आम्ही ठरवू तेव्हा पी.आर.ओ. बसेल तर त्या पी.आर.ओ.च्या ऑफिसला हे टेलिफोन मॉडम फार उपयोगी पडणार आहे आणि आपण आता प्रोव्हिजर करायला काय हरकत आहे. एक शब्द नुसता तुमचा त्या लिस्टमध्ये नसेल तर एकेका शब्दावरुन येथे दोन-दोन तास मारामाऱ्या होतात.

**माशाळकर:-**

आपण आता हे जे विचारले आहे. तर वाईस शेडयुल बी कनव्हरटेड इन टू कम्पलेन्ट म्हणजे ते आमच्याकडे यायला पाहिजे. फॅक्स मॉडमच्या जागी टेलिफोन फॅक्स मॉडम असायला पाहिजे असे तुमचे म्हणणे होते. हे फक्त मॉडममध्ये कार्यप्रणालीचे प्रफॉमन्स होत नाही. हयाचसाठी आय.व्ही.आर.एस. म्हणून असते. वाईड रिर्सोसेज असतात. उदाहरणार्थ आम्ही जे टेलिफोनमध्ये कम्पलेन्ट करतो. त्याने फक्त रेकॉर्ड मॅसेज असतात. ही कम्पलेन्ट आहे तर असे करा. असे आय.व्ही.आर.एस. आमच्यापुढे फॅसिलिटी जे नागरी सुविधा केंद्र करतोय. तर ज्यावेळेला आम्हाला लागणार जे हार्डवेअर असतात. त्यावेळेला आय.व्ही.आर.एस. सर्वेअरसाठी आम्ही ते नमुद करणार आहोत. त्यावेळेला नागरी सुविधा केंद्रासाठी वेगळे टेंडर आणि नेटवर्किंगसाठी वेगळे टेंडर येणार आहे. तुम्ही सांगितलेले आम्ही ते नक्की लक्षात घेउन आय.व्ही.आर.एस.चा समावेश करु.

**मिलन म्हात्रे:-**

एम.आय.एस.बद्‌दल आपले काय म्हणणे आहे.

**माशाळकर:-**

एम.आय.एस.साठी आमच्याकडे पुढे नेक्स्ट फायनानशियल ईअरमध्ये एक्झीक्युटीव्ह एन्फॉरमेशन सिस्टम म्हणून एक मॉडेलच आहे.

**मिलन म्हात्रे:-**

तुम्ही हे भविष्यामध्ये न ठेवता एम.आय.एस.म्हणजे मॅनेजमेन्ट इन्फॉरमेशन टेकनॉलजी सिस्टीम जी आहे. ही तुम्हाला सगळयात पहिल्यांदा घ्यायला लागेल. कारण आजचा आपला किती तास फुकट गेला. सभा अकराला चालू झाली व सव्वा एक वाजले आहे. मॅनेजमेन्ट सिस्टीम बरोबर नाही म्हणून एवढा उशिर झाला. आपण जर ती व्यवस्थित केली तर एम.आय.एस. ची प्रोव्हिजर तुम्ही सगळयात पहिले केली पाहिजे. कारण आता आपल्याला सचिव काय बोलले. सन्मा. सदस्या रिटा शाह यांचे एक पत्र बांधकाम खात्याला गेले व एक पत्र मला आले आणि ही दोन पत्रे दोन ठिकाणी

गेली आणि त्यामुळे आपले दीड ते पाउणे दोन तास फुकट गेले. त्याकरिता एम.आय.एस.चे आपण सगळयात पहिले घ्या.

**माशाळकर:-**

एम.आय.एस. असे वेगळे नसते.

**मिलन म्हात्रे:-**

तुम्ही तुमच्या टोटलमध्ये घ्या आणि हया लिस्टमध्ये ते आहे का?

**माशाळकर:-**

ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर असे वेगळे नसते. ॲप्लीकेशन सॉफ्टवेअरमध्ये एम.आय.एस. इन्फॉरमेशन सिस्टिम म्हणजे मॅनेजमेन्ट इन्फॉरमेशन सिस्टिम एक्झीक्युटिव्ह इन्फॉरमेशन सिस्टिम आणि जे आवक जावक क्रमांक असते आणि आम्ही खाली जे पत्र पाठवतो आणि उदया जर कोणी नागरिकांनी कम्पलेन्ट केली नाही तर कोणी सुविधा घ्यायला आले तर त्याचे एक्झॅक्ट स्टेटस कोणाकडे आहे. आता कुठली कार्यवाही झालेली आहे. ते सगळे नागरी सुविधा केंद्रामध्ये आम्ही उपलब्ध करुन देणार आहोत.

**मिलन म्हात्रे:-**

एम.आय.एस. बद्दल आपली आताची स्टेज काय आहे. तुम्ही आमच्या समोर हे जे कोष्टक ठेवले आहे. हयाच्यामध्ये एम.आय.एस.ची सुविधा कधी करणार आहे.

**माशाळकर:-**

आता फक्त तीन मॉडल एम्प्लीमेन्ट करतोय. सगळे कडून आले तर एम.आस.एस. होते.

**मिलन म्हात्रे:-**

त्याची प्रोव्हिजन तुम्ही करत आहात का?

**माशाळकर:-**

हो, करत आहोत.

**मिलन म्हात्रे:-**

आपण हा जो विषय जेवढा लाईटली घेतला आहे. कारण अकरा तारखेचे पत्र आहे आणि मला तुम्ही काल रात्री माहिती दिली. मी तुम्हाला दोन दिवस अगोदर भेटून आलो. एवढया मोठया पैशाचा प्रश्न आहे. मी दोन वेळा ऑफिसला येउन गेलो. आपण पहिले बोललात की, सिंगल पत्र केळकर साहेबांच्या सहीचे देतो. तुम्हाला हा अधिकार नाही. स्थायी समितीच्या सदस्याने जे पेपर मागितले ते न डावलता सगळे पेपर दिले पाहिजे. तुम्ही प्रोव्हिजन पिरियडमध्ये आहात. आम्हाला जी माहिती पाहिजे, मी तुमच्याकडे दोन वेळा येउन गेलो. तुम्ही बोललात एवढी फाईल दयायची का? ती दिली गेली नाही. आता तुम्ही जे पत्र दिले. तुम्हाला मी जी.आर. दिला. आपल्याला हया सर्व कामाकरिता विशेष म्हणून नगरपालिकेने नियुक्त केले आहे. जो जी. आर. मी आणू शकलो तो तुम्ही का नाही आणू शकलात? आपण कुठेतरी कमी पडलो. नगरपालिकेत बसू नका. मंत्रालयात जा. तुमच्या डिपार्टमेन्टला फिरा. कलेक्शन करा आणि ते घेउन या आणि आम्हाला दया. आम्हाला हयाच्यातले काहीच माहिती नाही. मी प्रामाणिकपणे सांगतो. मी कुठला इंजिनिअर नाही. मट्रिकपर्यंत शिकलेलो आहे. मी वकीलसुध्दा नाही. त्यामुळे आम्हाला तुम्ही सगळे मटेरियल दया. तुम्ही इकडचे तज्ञ आहात. म्हणून आम्ही तुमची नियुक्ती केली. आपण हे लेखी दिले हयाच्यामध्ये त्याचा कुठेही असा जी.आर.चा उल्लेख केलेला नव्हता. त्याच्यामुळे आपल्या संपूर्ण बजेटवर परिणाम होईल. तुमचा प्रोजेक्ट तुम्हाला एक्सपान्ड करता येईल. तसेच आता आपण ही जी मशिनरी दिलेली आहे. तर आताची स्टेटस काय? पी. फोर पेन्टीयम हा जो शेवटचा लास्ट मॉडल आला. त्याच्यानंतर नविन मॉडल आलेला आहे का?

**माशाळकर:-**

हे इलेक्ट्रॉनिक मिडीया आहे आणि तीन महिने, सहा महिने काही येउ शकते.

**मिलन म्हात्रे:-**

तुम्ही आम्हाला हे सगळे दिले. त्याचे टेंडर निघणार. सर्व प्रोसिजर पूर्ण करणार व सर्व तुम्ही ॲडॉप केल्यानंतर तीन किंवा दोन महिन्यांनी प्रत्यक्ष पीस आमच्यासमोर येणार. त्यावेळेला जो ॲडव्हान्समध्ये येणारा पीस आहे. त्याच्यात प्रिंटर सी.पी.यु., माउस, की-बोर्ड सर्व घ्या. पुढच्या तीन महिन्यामध्ये मॉडीकल मशिनरी कोणती येत आहे. तिचा हयाच्यात उल्लेख आहे का? मी संगणक

घेतला एक दिवसानंतर मला माझा डिलर बोललो. साहेब, आपण दोन दिवस थांबा. मी तुम्हाला आता पेन्टीयम थ्री देतोय आणि जर आपण दोन दिवसांनी घेतले तर पेन्टीयम फोर येईल. मी जो प्रिंटर घेतला आहे. त्याच्यामध्ये तो ॲसेम्बल प्रिंटर आहे. तो अगदी चांगला प्रिंटर आणि आता त्याच मध्ये ॲसेम्बल थर्ड क्लास प्रिंटर येतोय. म्हणजे तिचे अमाउन्ट आहे. पण एक हजार रुपये कमी झाले. पण प्रिंटर थर्ड क्लास आहे. हा मला स्वतःला व्यक्तिगत अनुभव आहे. त्याच्याकरिता या सभेमध्ये हया ठरावावर बोलताना माझे हे वाक्य तुम्ही विशेष करुन नोंदवून घ्या. संगणकक्षेत्रातील जे इलेक्ट्रॉनिक पार्टस आहेत. तर मी तरी हयाच्या निष्णात नाही आहे. मला जी माहिती मिळाली ती मी तुमच्यासमोर ठेवली आहे आणि हयाच्यामध्ये पुणे महानगरपालिकेचे जे वंशपायन म्हणून आहेत. त्यांना आपण ओळखत असाल. काल आम्ही एल.एस.जी.डी.ला गेलो होतो. संपूर्ण हा सेट, जी.आर. आणि बरीचशी माहिती त्यांनी आम्हाला दिली. हयाची कॉपी मला करुन पाठवायची आहे किंवा आपण परत सांगाल की, हे मला जमणार नाही. हयाच्यामध्ये त्यांनी हया टेकनॉलजीबद्दल बरीचशी माहिती दिली. त्यांना जर आपण येथे त्यांना बोलावले तर तुम्हाला हातभार लागेल. त्यांनी आम्हाला चांगले मार्गदर्शन केले व काल पूर्ण दिवस त्यांनी हयाचे एक्सप्लेनेशन दिले आणि हयाच्याकरिता ही माहिती मी घेउन आलो आहे. आपण हया प्रस्तावात म्हणजे जी मशीनरी घेणार आहोत. तर त्यांनी बुकलेट दिले आहेत. त्याच्यातून जर का तुम्हाला काही चांगले घेता आले. महानगरपालिकेचा आर्थिक फायदा आणि प्रशासनाचे काम चांगले होण्याकरिता हयाचा उपयोग करता आला तर करा. या ठरावाला मी सुचविलेल्या सर्व सुचनांना आपण अधिन राहून मी माझी स्वतःची मंजुरी देत आहे आणि सुचक म्हणून माझे नाव घेण्यात यावे.

**चंद्रकांत वैती:-**

हयाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १७६:-**

संगणकीकरणाबाबत आलेल्या निविदांना मंजुरी देणे.

**ठराव क्र.**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailakot saMgaNakIkrNa krNaobaabatcaa p`stava tyar k$na sadrcaa p`stava maa.mahasaBaa id.18.09.2003 zrava Ë.26 nao Aaiqa-k¸ p`SaasakIya maMjaUrI idlaolaI Aaho. %yaanausaar mahanagarpailakonao id.07.11.2003 raojaI ‘dOinak sakaL’ va ‘dOinak vaata-hr’ yaa vaR<ap~at p`isaQd kolaolyaa jaahIr inaivada saucanaonausaar KalaIla p`maaNao zokodaraMnaI Aaplyaa inaivada maudtIt saadr kolaolyaa Aahot. ekuNa caar inaivada p`aPt Jaalaolyaa Aahot.

**A.Ë. kMpnaIcao naaMva**

1. mao. par [MTIga`oToD isasTIma p`a.ila.
2. mao.svaana saaolyauSana p`a.ila.
3. mao. ma^gnaamaa^yasa isaisTIma p`a.ila.
4. mao. esa.Aar.[nfaoTok

]prao@t caar inaivadaMpOkI inaivadotIla ATISatI-nausaar taMi~k baabaIMcaI pDtaLNaI krta mao.esa.Aar. [nfaoTok yaaMcaI inaivada taMi~k dRYTyaa saxama nasalyaanao r_ zrivaNyaat yao}na¸ ]va-rIt tIna inaivadaMcaa ivacaar krNaot

Aalaolaa Aaho. ekMdr sava- AavaSyak to saMgaNakIkrNa pirmaaNa va [tr AavaSyak saaih%ya yaa baabatcaa tIna inaivadaQaarkaMcaa tpSaIla KalaIla p`maaNao

| Sr. No. | Item | Qty | PAR | | SWAN | | MAGNAMIOUS | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Unit Price | Amount | Unit Price | Amount | Unit Price | Amount |
| 1 | Server | 1 | 396000 | 396000 | 402000 | 402000 | 414000 | 414000 |
| 2 | desktop | 20 | 49600 | 992000 | 49990 | 999800 | 51600 | 1032000 |
| 3 | Line Matrix Printer | 1 | 209000 | 209000 | 211000 | 211000 | 214000 | 214000 |
| 4 | 80 Column Dot Matrix Printer | 2 | 11800 | 23600 | 12200 | 24400 | 12100 | 24200 |
| 5 | High End Network Laser Printer | 1 | 317200 | 317200 | 327000 | 327000 | 339000 | 339000 |
| 6 | Mid Range Network Laser Printer | 1 | 78400 | 78400 | 81050 | 81050 | 89000 | 89000 |
| 7 | Entry Level Laser Printer | 2 | 20600 | 41200 | 21100 | 42200 | 23000 | 46000 |
| 8 | Desk Jet Printer | 3 | 8900 | 26700 | 9100 | 27300 | 9200 | 27600 |
| 9 | UPS | 1 | 39000 | 39000 | 40000 | 40000 | 78000 | 78000 |
| 10 | scanner | 1 | 5900 | 5900 | 6100 | 6100 | 6050 | 6050 |
| 11 | CD Writer | 1 | 3900 | 3900 | 4100 | 4100 | 4100 | 4100 |
| 12 | Fax Modem | 1 | 2100 | 2100 | 2200 | 2200 | 2100 | 2100 |
| 13 | Switch | 1 | 15100 | 15100 | 15400 | 15400 | 15225 | 15225 |
| 14 | Win 2000 Adv. Server | 1 | 184900 | 184900 | 190000 | 190000 | 189000 | 189000 |
| 15 | MS-Office Media | 5 | 3600 | 18000 | 4200 | 21000 | 3950 | 19750 |
| 16 | MS-Office License | 15 | 21800 | 327000 | 23100 | 346500 | 23000 | 345000 |
| | **Total** | | | **2680000** | | **2740050** | | **2845025** |

varIla tulanaa%mak t@ta pahta mao.par [MTIga`oTD p`a.ila. yaaMcao inaivadotIla dr savaa-t kmaI Aahot. yaa kamaI saMgaNak va [tr saaih%ya KrodI k$na¸ sadr kaya-p`NaalaI sau$ krNaopUvaI- mahanagarpailakonao id.24.11.03 raojaI maa.saicava¸ Dayaro@Tr Aa^f [nfao-maoSana To@naa^laa^jaI¸ naivana p`SaasakIya Bavana¸ mauMba[- yaaMcaoSaI saMgaNak kaya-p`NaalaI baabat rajya Saasanaacao dr krar maMjaUr Aahot ikMvaa ksao yaa saMbaMQaI ivacaarNaa kolaI Asata ]@t inaivadotIla KalaIla AayaTmacao dr rajya SaasanaakDo dr krarap`maaNao ]plaQba Aahot. to KalaIla p`maaNao

| A. Ë. | tpSaIla | inaivadotIla dr | Saasanaacao dr |
|---|---|---|---|
| 2. | DoskTa^p | $.49600À¹ | $.47965À¹ |
| 4. | 80 ka^lama ¹ DIemapI | $.11¸800À¹ | $.9165À¹ |
| 7. | enT/I laovhla laoJar ip`MTr | $.20600À¹ | $.14625À¹ |

yaa vyaitir@t mahanagarpailakonao inaivadot dSa-ivalaolao prMtu mahanagarpailakosa AavaSyak AsaNaaro saaih%yaacao dr Saasanaacyaa dr krarat ]plaQba naahIt Asao saMbaMiQatanao kLivalao Aaho. ]@t tpSaIlaanausaar maa.Aayau@t saaao.¸ yaaMnaI inaivadotIla savaa-t kmaI dracyaa zokodarasa mao.par.[MTIga`oToD isaisTma p`a.ila.

yaaMsa id.28.11.2003 raojaI p`%yaxa cacaa- krNaosaazI baaolaaivalao Asata¸ Jaalaolyaa cacao-nausaar %yaaMnaI inaivadotIla dr kmaI krNyaacao maanya kolaolao Aaho. %yaanausaar %yaaMcao dr KalaIla p`maaNao

**mao.par [MiTga`oToD isaisTma p`a.ila.**

| A. Ë. | tpSalla | inaivad otIla dr | zokodar anao kmaI kolaolao dr | tfavat | na ga | ekuNa tfavat |
|---|---|---|---|---|---|---|
| 2. | DoskTa^p | $.49600 | $.47965 | $.1635 | 20 | $.32700 |
| 4. | 80 ka^lama ¹ DIemapI | $.11¸800 | $.9165 | $.2635 | 2 | $.5270 |
| 7. | enT/I laovhla laoJar ip`MTr | $.20600 | $.14625 | $.5975 | 2 | $.11950 |
| | **ekuNa** | | | **$.10245** | | **$.49920** |

varIla Saasana dr kraracao drapya-t zokodaranaI kmaI kolaolao dr Aahot. ]@t AhvaalaacaI maaihtI GaotlaI Asata mao. par [MiTga`oToD isasTIma p`a.ila. yaaMnaI saadr kolaolyaa ekUNa $.26¸80¸000À¹ yaa rkmaotUna $.49¸920À¹ vajaa jaata r@kma $.26¸30¸080À¹ yaa r@kmaosa saMgaNak saaih%ya va [tr mao. par [MiTga`oToD p`a.ila. purvaza krNaar Aaho. trI varIla sava- va Anya saaih%ya KrodI krNaobaabat baajaarBaava p`%yaxa ivacaarNaa kolaI Asata¸ inaivadaQaarkanao saadr kolaolao dr ho vaajavaI Asalyaanao¸ maMjaUrI doNyaat yaot Aaho. SaasanaakDIla nagar ivakasa ivaBaaga Saasana inaNa-ya Ë. saMhaA¹102003Àp`Ë¹21À03À naiva¹8 maM~alaya mauMba[- id.17.09.03 nausaar hyaa saMgaNakIkrNa p`klpasa AnaudanaacaI maagaNaI kravaI. tsaoca vairla sava- saaih%ya A%yaaQauinak (Latest Technology) ]plaQba Asalaolao maSaInarI KrodI kravao. mahanagarpailakosa saMgaNak va [tr AavaSyak saaih%ya KrodI k$na purvaza krNaosa va %yaakamaI yaoNaaro doyak Ada krNaosa maa.sqaayaI maMjaUrI doNaoMt yaot Aaho.

सुचक :- श्री. मिलन वसंत म्हात्रे. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
मा. सभापती,
स्थायी समिती सभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७७ चे वाचन केले.)

**रिटा शाहः-**

सचिव साहेब, माझ्या पत्राचे वाचन करावे आणि सभापती साहेब जी रुलिंग दयायची आहे. ती रुलिंग आपण दयावी.

(प्र. सचिवांनी सन्मा.सदस्या रिटा शाह हयांच्या पत्राचे सभागृहात वाचन केले.)

**मा.सभापतीः-**

सदर पत्राबाबत आपल्याला लेखी उत्तर देण्यात येईल.

**अशोक पाटीलः-**

सभापती साहेब, प्रकरण क्र. १७७ शिक्षण विषयाशी संबंधित हा विषय आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षकांचे वेतन, निवृत्त वेतनासाठी सन २००३-०४ चा अंदाजित एकूण खर्च पन्नास टक्के. पन्नास टक्के महानगरपालिका म्हणजे तीन करोड तेरा लाख शहाण्णव हजार एवढा आवश्यक होता. त्यानुसार महानगरपालिका अर्थ संकल्पानुसार शासन क्र. २० एप्रिल, २००२ नुसार पन्नास टक्के रक्क्म जवळजवळ दीड करोड रुपये अपेक्षित होती. एक करोड सत्तावन्न लाख रुपये. अर्थ संकल्पात तशी तरतुद करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाकडून का आला नाही. आपणाकडून त्यांचा हा हलगर्जीपण आताही तीस टक्के रक्कम मागणी केलेली ते दुस-या खात्यातून त्याच्यात खर्च करणार आहे. शिक्षण विभागाकडून हा हलगर्जीपणा झाला का? अगोदर तसा प्रस्ताव सादर केला नाही का? त्यांना हया गोष्टीची जाणीव नव्हती का?

**संन्याशिवः-**

मा.सभापती साहेब, हयांच्या परवानगीने बोलतोय. हा शिक्षण मंडळाचा हलगर्जीपणा नसुन पूर्वी नगरपालिका असताना शासनामार्फत ऐंशी टक्के अनुदान आणि नगरपालिकेतर्फे वीस टक्के अनुदान प्राप्त होते. परंतु, महापालिका झाल्यानंतर महापालिकेला पन्नास टक्के अनुदान बंधनकारक आहे आणि शासनाकडून पन्नास टक्के मिळत होते. ते पन्नास टक्क्यावर आले आणि त्यावेळेला जे आर्थिक अनुदान हया ठिकाणी मंजूर केलेले होते. ते वीस टक्क्याप्रमाणे केले होते आणि वीस टक्क्याप्रमाणे एकूण पन्नास लाख रुपये केले होते. त्यापैकी अठ्ठेचाळीस लाख पंचवीस हजार खर्च झालेले आहेत आणि एक लाख ७५ हजार शिल्लक आहेत. परंतु, ते जे शिल्लक आहेत. ते वीस टक्क्यामधले आणि म्हणून पन्नास टक्क्याप्रमाणे वीस टक्के रक्कम अजून आवश्यक आहे. पगारासाठी महापालिका झाल्यामुळे ज्या ज्या ठिकाणी महापालिका झाली आहे. तिथे शासनाचा परिपत्रक आहे. त्या परिपत्रकानुसार जर महापालिका असेल तर महापालिकेने शिक्षणाच्या वेतनाचा हिस्सा पन्नास टक्के आणि शासनाने पन्नास टक्के उचलायचा आहे.

**अशोक पाटीलः-**

हा निर्णय २० एप्रिल, २००२ चा आहे. त्याच्यानंतर अर्थसंकल्प सादर झाला आहे.

**आसिफ शेखः-**

आपण आम्हाला एवढीच माहिती दया. जेव्हा बजेट संदर्भातील बैठकी आयोजि करण्यात आल्या. ज्या मॅरेथॉन बैठक चालल्या होत्या. त्यावेळी स्थायी समितीपुढे आपला प्रस्ताव आला होता का?

**संन्याशिवः-**

त्यावेळेला वीस टक्क्यानुसार रक्कम मिळत होती.

**अशोक पाटीलः-**

आपण जे हया परिपत्रकाचा उल्लेख केला आहे. ते २० एप्रिल, २००२ चा आहे आणि ज्यावेळी अर्थसंकल्प मंजूर झाला. त्यावेळी आपण प्रस्ताव का मांडला नाही.

**संन्याशिवः-**

मागच्या वर्षीपर्यंत नव्हता. परंतु, १३/०३/०३ ला शासनाचे अर्ध शासकीय पत्र आले आणि त्यानुसार त्यांनी महापालिकेच्या शिक्षण मंडळाला कळविले आहे की, पन्नास टक्के अनुदान हे महापालिकेने दयायचे आहे. त्यानुसार तेवीस लाख रुपये बाकी काढलेले आहे आणि त्याच्यानंतर आम्ही ही मागणी केलेली आहे.

**आसिफ शेखः-**

ही मागणी आता केलेली आहे. बजेट मंजूर झाले तेव्हा वर्षभर काय केले?

**संन्याशिवः-**

पत्र आम्हाला १८/७/०३ ला प्राप्त झाले आहे.

**आसिफ शेख:-**

पत्र मिळाले नसते तर शिक्षकांचे पगार झाले नसते का?

**संन्याशिव:-**

१८/७/०३ ला पत्र प्राप्त झाले आणि त्या पत्रात त्यांनी नमुद केले आहे. पन्नास टक्के अनुदान महापालिकेने दयायचे आहे.

**अशोक पाटील:-**

याचा अर्थ शासन जे निर्णय घेते. त्याचे परिपत्रक आपल्या महानगरपालिकेत येत नाहीत का? शिक्षण खात्यात पोहचत नाही का?

**संन्याशिव:-**

शिक्षण विभागात येतात. येथे शिक्षण मंडळ नसल्यामुळे शिक्षण विभागाचे सभापती म्हणून मा. आयुक्त साहेब त्यांच्या कानावर त्यावेळेस मी टाकले आणि त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

**मिलन म्हात्रे:-**

साहेब, आपल्या प्रतिनियुक्तीची तारीख काय?

**संन्याशिव:-**

१ जुलै, २००३ ला मी येथे आलो.

**चंद्रकांत वैती:-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतोय, शिक्षण अधिकारी साहेब, आपण दोन प्रकारचा बदल करतोय. एक शिक्षकांचे वेतन आणि दुसरे निवृत्ती वेतन. दोन्हीमध्ये एकच निकष लागू आहे. पन्नास, पन्नास टक्क्यांचा. कारण पूर्वी नगरपालिका होती. तेव्हा वीस टक्के आणि ऐंशी टक्के असे करायचे. हे करताना आपल्याकडे शासनाचे परिपत्रक वास्तविक मागचे बजेट करताना तेव्हा उपलब्ध झाले असतील. आपण एक गोष्ट निश्चित मानायला पाहिजे की, आपण हया गोष्टीचा पाठपुरावा करत नाही. पहिली गोष्ट अशी की, आपल्याला सुचना वजा विनंती आहे. आपण आपल्या ऑफिसमध्ये उपस्थित असायला पाहिजे आणि उपस्थित असल्यानंतर दुसरे महत्वाचे की, आपण त्या ठिकाणी ही अशी परिपत्रके शासनाची येत असतात. हया शासनाच्या परिपत्रकाचा फॉलआप केला पाहिजे. म्हणजे वेळेच्या वेळी हे जर प्रकरण झाले असते तर आज आपल्याला एवढया उशिरा हे प्रकरण आणायची गरज नव्हती. आज आपल्याला हे करणे क्रमप्राप्त आहे. आपण एवढा पगार शिक्षकांना देत असतो. निवृत्त वेतन ही दयायचे आहे. आपल्याला शिक्षकांच्या भरत्या करायच्या आहेत. पण हे करताना शिक्षण मंडळाचे सध्याचे तुम्ही जे काम पाहत आहात. ते शिक्षण मंडळाचे काम समाधानकारक नक्कीच नाही आहे. कारण आपण एवढा मोठा खर्च करुन आज शाळांची इमारती विकसित केल्या. शाळेचा पट दिवसेंदिवस घटतोय. शिक्षकांनी विदयार्थ्यांना काय शिकवले पाहिजे. शिक्षकांवर आपला वचक पाहिजे, अंकुश पाहिजे. शिक्षक महापालिकेच्या कार्यालयात एवढयासाठी येत असतात की, मी अमुक ठिकाणाहून येते आणि मला जवळची शाळा पाहिजे. बाहेरुन शिक्षक वाडा किंवा कल्याण-डोंबिवली लांब राहणारे शिक्षक तेथून बदली करुन घेतात आणि मिरा भाईंदर महापालिकमध्ये शिक्षक भरतीसाठी येथे रुजु होण्याचा प्रयत्न करतात. आता आपण शिक्षण अधिकारी या नात्याने एक गोष्ट नक्की करायला पाहिजे की, आपल्याला बँक लॉक किती भरायचा आहे. शिक्षक भरती आपण केली पाहिजे. कारण ज्या विदयार्थ्यांचे भवितव्य महापालिकेच्या शाळेतून जे शिक्षण घेणारे विदयार्थी आहेत. त्यांचे भवितव्य आजच्या तारखेस अंधारात आहे. एक-एक वर्गावर शिक्षक नाहीत. ही दुरावस्था आहे. आपण शाळांमध्ये खिचडी वाटप सुरु केले आहे. केंद्र सरकारचे धोरण आहे, महापालिकेने त्याला अनुदान दिले आहे. पण हे खिचडी वाटप झाल्यानंतर त्या त्या संबंधित शिक्षकांचे कर्तव्य काय आहे? शिक्षकांनी त्या विदयार्थ्यांना शिस्त लावायला नको का? फक्त बदली पाहिजे, मला बढती पाहिजे, मला जवळची शाळा पाहिजे हा जो सोस आहे तो बंद झाला पाहिजे. महापालिकेमध्ये शिक्षकांचा प्रतिनिधी किंवा त्यांच्या शाळेचा प्रतिनिधी आला तर चालेल. पाच-पाच, दहा-दहा शिक्षिका महापालिकेच्या तिस-या माळयावरती संध्याकाळच्या सहा-सात वाजेपर्यंत असतात. मग तुम्ही दिवसभर शाळांमध्ये गणवेश आहे की नाही, बसण्याची व्यवस्था आहे की नाही, शिक्षकांना टेबल आहेत की नाही, शाळेत पुरेशी कपाटे आहेत की नाहीत. हया गोष्टींची आपण माहिती घेउन बघा. शाळेला आपण जी वस्तु, साहित्य पुरवठा केलेला आहे. त्याचा विनियोग व्यवस्थित होतोय की नाही, ते बघा. शाळा

वेळेवर भरते की नाही, वेळेत सुटते की नाही, ते बघा. यावेळेत आपण कधी शाळांना व्हिजीट दया आणि जेव्हा व्हिजीट दयायची असेल तेव्हा स्थायी समितीचे सभापती किंवा इतर सदस्य आहेत. त्या लोकांना तुम्ही इंटिमिशन दया. एकदा व्हिजीट करा.

**याकुब कुरेशीः-**

सभापती महोदय, हा विषय आपण वेगळा घेतला तर चांगले होईल. आपण एवढी दिलगिरी व्यक्त करत आहात. आपण वेगळा एक विषय घ्यायला लावा आणि हया विषयावर आपण पध्दतशीर चर्चा करु या.

**चंद्रकांत वैतीः-**

संन्याशिव साहेब, हयाबाबत आपण व्यवस्थित माहिती दयावी.

**मिलन म्हात्रेः-**

सभापती महोदय, अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा विषय सभागृहासमोर आलेला आहे. हया अगोदर सानुग्रह अनुदानाचा विषयदेखील मा. महासभेसमोर आला होता. आम्ही सर्वांनी स्थायी समितीमध्ये व नंतर मा. महासभेमध्येसुध्दा कुठलाही दुजाभाव न ठेवता आपण प्रथम शिक्षकांना दोन हजार रुपये सानुग्रह अनुदान मंजूर केलेले आहे. ऑडिटर साहेब बसलेले आहेत. बरीचशी चर्चा झाली आणि आपण दोन हजार रुपये मंजूर केले. दोन-तीन लिडर त्यांचे आपल्याकडे आले होते. शिक्षकांचे प्रतिनिधी त्यांना जे काय बोलायचे होते. ते मी तोंडावर स्पष्टपणे बोललो की, शिक्षकांच्या फायदयाचे बोलू. शिक्षकांच्या कर्तव्याचे बोला आणि आज तर मी त्यांना धन्यवाद देईल. आज प्रथमच स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित असलेले बघतोय. कारण हया अगोदर ते आलेच नव्हते. हा जो विषय आज उपस्थित झाला तर बजेटमध्ये प्रोव्हिजन करताना काही रक्कमेची तरतुद सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी बोलले. मला चांगले आठवतेय. शिक्षण खात्यातर्फे ज्यावेळी बजेटची रचना करत होतो. सर्व सदस्य आठवडाभर सकाळी दहा ते रात्री नउ वाजेपर्यंत बसायचे. बहुतेक सर्व खात्यातील अधिका-यांनी चांगली साथ दिली. त्यांच्या सुचना मांडल्या व साधक-बाधक चर्चा झाली. काय तरतुदी करायच्या होत्या. त्या केल्या गेल्या. परंतु, हया संपूर्ण आठवडयामध्ये शिक्षण विभागाचा एकही अधिकारी किंवा क्लार्क उपस्थित नव्हता. शिक्षण विभागातर्फे आम्हाला कसलीही माहिती देण्यात आली नाही. आयुक्त साहेबांनी त्यांचे ढोबळ अंदाज पाठवले होते. त्यांच्यावर स्थायी समितीने चर्चा करुन जे निर्णय घ्यायचे होते ते त्यावेळेला घेतले. आज परिस्थिती अशी उद्भवली आहे की, शिक्षकांना आज पगार होईल की नाही हे विचार सगळे करत आहेत. परंतु, शिक्षक काय करत आहे. हया दोन आठवडयापूर्वी संपूर्ण शाळेला जी सुट्टी लागली होती. हया सुट्टीमध्ये पाच माळे लिटरली साफ करुन घेतले. भाईंदर सोळा, सतरा, अठरा आणि तीस कर्मचारी आम्ही लावले होते. मी स्वतः तिथे सहा-सात तास हजर होतो. हे मी काम केले हे मला सांगायचे नाही. हे माझे काम नाही आहे. मी तिथे जाण्याची देखील गरज नाही आहे. परंतु, वर्गामध्ये पडलेली घाण, पेपरमेन्टचे तुकडे, खिचडीचे खरकटे हे सर्व वर्गात त्या बँचेसच्या खाली आम्ही जेव्हा लहान होतो. तेव्हा आमचे वर्ग शिक्षक किंवा जे हेडमास्तर असत. ते मुलांना कामाला लावून सगळे बँचेस बाहेर काढून सगळा वर्ग धुवायला लावायचे. आता आम्ही गेलो होतो तर शिक्षक सरळ हात वर करतात. सफाई कामगार आहेत ते आमचे ऐकत नाहीत. सभापती साहेब आणि केळकर साहेब आपण लक्षात ठेवा. त्यांना ॲसीड, जंतुनाशके आणि पावडर, अवजारे जसे घमेले, झाडू हे सगळे आम्हाला दयायला लागते. मी गोलो नसतो तर आणखीन दोन दिवस मिळाले नसते. नेमके त्या शिक्षकांचा विचार काय आहे? आम्ही कोणीतरी नावे म्हणून त्यांना मदत करावी आणि त्यांनी ते घ्यावे. स्पष्टपणे सांगून टाकले आम्हाला हे मिळत नाही. जर अवजारे आम्ही मांडून मिळवू शकतो तर शिक्षकांचे काम नाही का? शिक्षण मंडळ असा उल्लेख होतो आणि आपणही सुवाच्य अक्षरात सही करता आणि पाठवून देता. जी वस्तु अस्तित्वात नाही. त्याच्यावर त्या प्रमुखाचे ही लक्ष नाही की, हे मंडळ अस्तित्वात नाही आहे. तर आपण हयाचा उल्लेख काय करायचा? पगार आला तर सगळे धावतात. आज शाळेत एवढी वाईट परिस्थिती आहे की, लाईटची, बाकडे व्यवस्थित नाही आणि एकेका शाळांमध्ये गटार, संडासे तुंबलेले आहेत. पण कोणाला होत नाही जसे आपण युनियनच्या नेत्यांकडे धावत जातो. न्याय मिळवण्याकरिता हातपाय पकडतो. अधिका-यांकडे जावे. त्यांना तुम्ही रिक्वेस्ट करा. कुठेतरी वरपर्यंत गेले पाहिजे. नुसते शिक्षकांच्या बदल्या, पगार वाढवणे. आता जवळजवळ पाचव्या वेतनाला आपल्याला बरीचशी रक्कम खर्च करावी लागते. आपण जी अमाउन्ट देतोय. त्या कॅटेगिरीचे शिक्षण

नाही आहे. लोकप्रतिनिधी गेल्यानंतर वर्गामध्ये उठून उभे राहण्याचे सौजन्यदेखील त्यांच्यात नाही आहे. आम्ही अशी इच्छा कधीच करत नाही की, आम्हाला कोणी सलाम घालावा. पण एक पध्दत असते ती त्यांनी अवलंबिली पाहिजे. जवळजवळ तीन ट्रक तांदूळ आला होता आणि तीन ट्रक तांदुळ गोणी उलटयापुलटया पडलेल्या आणि जवळजवळ दहा ते वीस गोणी तांदूळ आम्ही जमिनीवरचा भरला. हात लावू देत नव्हते. तरी ते भरुन ठेवले आणि आता शहरामध्ये मुले पळविण्याची अफवा भरपूर आहे. लहान मुले बालवाडी सोडून रस्त्यावर फिरायला जातात. तो गोडाउन त्या गोण्यांनी भरला आणि त्या मुलांना बाहेर काढले. सोळा, सतरा, अठरा या शाळेमध्ये गोडाउन असे कुठेही बनलेले नाही. सगळे शाळेचे वर्ग आहेत. आपण समजू शकतो. ज्या वजनदार गोणी आहेत. त्यावर घेउन जायला भारी पडते. तर ठेवा खाली. एक ट्रक भरुन अख्खी चालू वर्षाची पुस्तक हेडमास्तर सरळ बोलतो. तो मेरा काम नही वो मिश्रा सर का काम है । मिश्रा सर बोलतो हम क्या करेगा, जो बाटने का था वे हमने बाँटा । बाकी नवी कोरी पुस्तके अस्थावस्थ पडलेले होते आणि शंभर रुपये मी माझ्या खिशातले काढून रस्सी आणली आणि ते गठ्ठे बांधून व्यवस्थित लावून घेतले. स्वच्छ तिन्ही वर्गामध्ये जागा करुन आजच्या तारखेला हया बालवाडया चालू आहे. हे जे मी केले ते त्या शिक्षकांना, हेडमास्तरांना, शिक्षण मंडळाच्या अधिका-यांना जमले असते. परंतु, त्यांनी केले नाही. ही कुठेतरी बाब तुम्ही पटलावर आणा. आम्ही आमच्या व्यथा मांडतोय, बोलतोय. आपण पाच-पंचवीस शिक्षकांना पन्शीमेन्ट दया. त्याशिवाय ते वटणीवर येणार नाही. दरवेळेला आपण बोलत राहायचे. हिंदी, गुजराती मिडीयम, मराठी मिडियम हयांना साधी जंतुनाशके घेता येत नाही. स्वीपअरखाली बसून गप्पा मारत बसलेले असतात आणि जेव्हा जावे तेव्हा काम सोडून बाजूला बसलेले असतात. दुसरी गोष्ट म्हणजे सर्वात शरमेची बाब या वर्षी कुठल्याही शाळेत शिक्षक दिन साजरा केला नाही व शिक्षक मंडळानेही केला नाही. फारमोठा गाजावाजा करु नका. एक व्याख्यान घेतले असते. शिक्षक दिन म्हणजे नेमके काय, असा कार्यक्रम लावला असता तर लोकांना कळले तरी असते. हया तारखेला शिक्षक दिन. आम्ही म्हणत नाही की, तुम्ही पाच-दहा लाख उडवा किंवा पाच-पंचवीस लाख उडवा. करायला पाहिजे होता. पण आपण तो केलेला नाही.

**संन्याशिवः-**

शाळेत कार्यक्रम झालेला आहे.

**मिलन म्हात्रेः-**

आम्हाला कोणी माहिती दिली. हया ऑफिसलादेखील माहिती देण्यात आली का? आता हा ठराव येथे कशाला मंजुरी करता आणला? उदया तुम्ही काही कराल आणि आमच्यावर हया महापालिकेचे महापौर आहेत. सभापती आहेत. आम्ही सर्व स्थायी समितीचे सदस्य आहोत. अधिकारी आहोत. आयुक्त साहेब आहेत, त्यांना तुम्ही काहीतरी कळवाल का? असा कार्यक्रम केला आणि तुम्ही बाकीचे एवढे दिन आयोजित केले. नगरपालिकेने त्यांना आम्ही वेळात वेळ काढून तिथे उपस्थित राहिलो. ही जी पध्दती आहे ती चुकीची आहे. तुम्ही सर्व कराल ते पूर्व तसे होत नाही. तुमच्या शिक्षकांना हातखर्चाला किती रक्कम दिली जाते.

**संन्याशिवः-**

सर्व शिक्षण अभियान अंर्तगत पाचशे रुपये शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी दोन हजार रुपये शाळेच्या साहित्यासाठी.

**मिलन म्हात्रेः-**

पाचशे रुपये कशाकरिता आहेत आणि ते कधी मिळते.

**संन्याशिवः-**

शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी पाचशे रुपये आहेत व ते वर्षातून एकदा मिळते आणि दोन हजार रुपये शाळेच्या साहित्यासाठी मिळते.

**मिलन म्हात्रेः-**

पाचशे आणि दोन हजार हेड मास्तराला मिळते का? प्रत्येक शिक्षकाला मिळते.

**संन्याशिवः-**

वार्ड समिती आहे. त्या वार्ड समितीची मंजूरी घेउन त्यानंतर मुख्याध्यापकाने खर्च करायचे आहे.

**मिलन म्हात्रेः-**

तुमच्याकडे किती शिक्षकांच्या हाताखाली अशी रक्कम आहे.

**संन्याशिवः-**

२९ शाळा आहेत.

**मिलन म्हात्रेः-**

किती शाळांनी नेली.

**संन्याशिवः-**

आम्ही परस्पर बँकेमध्ये जमा करतो.

**मिलन म्हात्रेः-**

किती शिक्षकांनी विड्रॉ केली.

**आसिफ शेखः-**

सभापती साहेब, शासनाकडून जे पत्र आले आहे. ते वाचून दाखवा. वेतनासाठी पाहिजे की, निवृत्त वेतनासाठी पाहिजे.

**मिलन म्हात्रेः-**

तुमच्याकडे पाचशे रुपयाची रक्कम देता. माझ्या माहितीनुसार काही शिक्षकांनी ती रक्कम नेलेली नाही. बँकेत रक्कम भरल्याने शाळेचा विकास होत नाही. त्या त्या शिक्षकाला तुम्ही दिली का? त्यांनी विड्रॉव्हल झाले का?

**संन्याशिवः-**

विड्रॉव्हल झालेले आहे.

**मिलन म्हात्रेः-**

तुमच्या शिक्षकाकडे आज टेबल पुसायला कपडा नाही आहे. त्यांनी का नाही खर्च केला. दोनशे दहा रुपये किलोचे मी कपडे दिले. डस्टर नाही आहेत. फळे पुसायला कपडे नाही आहेत. फॅन पुसायला कपडे नाहीत.

**संन्याशिवः-**

आम्ही चार टक्क्यातून त्यांना डस्टर वगैरे घेण्याची परमिशन दिलेली आहे.

**मिलन म्हात्रेः-**

आपण आपले काम पण आपल्या आदेशाखाली इम्पलीड होते का नाही. त्या बेसीनमध्ये हात धुवायला साबण नाही आहे. प्लास्टिकचे कॉक लावायला त्यांच्याकडे पैसे नाही. प्रत्येक वेळेला आम्ही जायचे का?

**संन्याशिवः-**

प्रत्येक महिन्याला मुख्याध्यापकांची सभा असते. त्या सभेमध्ये आम्ही त्यांना सुचना दिल्या जातात.

**मिलन म्हात्रेः-**

शाळा क्रमांक १६, १७, व १८ या शाळांमध्ये किती सभा झाल्या आहेत.

**संन्याशिवः-**

प्रत्येक महिन्यामध्ये मुख्याध्यापकांची सभा होते.

**मिलन म्हात्रेः-**

पिण्याच्या पाण्याचे कॉक वगैरे सर्व तुटले होते. आपण त्यांच्यावर लक्ष ठेवले का?

**संन्याशिवः-**

मी त्यांना मागे सांगितले होते.

**मिलन म्हात्रेः-**

आपण त्यांना लेखी वगैरे काय दिले का? मी जेव्हा शाळेला भेट दिली. तेव्हा त्यांना सांगितले होते आणि मागचे मा. शिक्षण सभापती तेंडुलकर त्यांनी मला पत्र दिली होते. त्यानुसार मी शाळेला भेट दिली होती.

**याकुब कुरेशीः-**

सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आपण हया विषय सभेत विषय घ्या.

**मा.सभापती:-**

आता सध्या काय चालले आहे?

**मिलन म्हात्रे:-**

आता सध्या जो विषय आहे. त्या विषयाचे संपूर्णतः विषयांतर होत आहे.

**रिटा शाह:-**

आता जो विषय आला आहेत. त्याला मंजूरी दया. कारण शिक्षणाबद्दल बोलायला लागले तर भरपूर चर्चा होईल.

**नितीन ठाकूर:-**

त्या शाळेच्या शिक्षकांवर कार्यवाही करा आणि त्यांना तशी नोटीस दया. नगरसेवकांनी स्वतःहून उभे राहून सफाई करुन घेतली आहे. तिथे जे कामाला आहेत. ते काय करतात? तुम्ही त्यांच्यावर कारवाई करा.

**मिलन म्हात्रे:-**

सभापती साहेब, आपण अगोदर दोन तास फुकट घालवले आहे. मी या ठरावावर बोलतोय.

**आसिफ शेख:-**

चर्चा झाली. फुकट गेले असे कसे बोलता.

**मा.सभापती:-**

आता काय करायचे आपण निर्णय घ्या.

**मिलन म्हात्रे:-**

या येथे बसलेल्या बहुतेक सदस्यांच्या वार्डमध्ये शिक्षण एवढे महागलेले आहे. आपल्या शाळेवर सर्वांची शिस्त आहे. माझ्या वार्डातून जनता नगर वॉर्डमधून लोक चालत आपल्या शाळेपर्यंत येतात. हे आपले एक चांगले रेप्युटेशन असू शकेल. लोकांना परवडत नाही म्हणून लोक येतात आणि फ्लॅटमध्ये राहणा-या मुलेदेखील आपल्या शाळेत येतात. मग आपण आपले स्टँडर्ड का सुधारु नये. मी दोन वेळा हयांची भेट घेतली. पण हयांना काही वाटले नाही की, आपण शाळेत जाउन लिस्ट काढू या. मी नुसते माझ्या शाळांचे बोलत नाही तर बाकीच्या शाळांची तर हयाहीपेक्षा वाईट परिस्थिती आहे. म्हणून मी माझी कळकळ व्यक्त करतोय. प्रशासनाचे केळकरसाहेब हयांनीदेखील त्यावेळेला सांगितले हे झाले पाहिजे ते झाले पाहिजे. पण बाकी काही नाही.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपण ज्या भावना व्यक्त केल्या. त्या भावनांशी मी पूर्णपणे सहमत आहे. जिल्हापरिषदेकडून शाळा ताब्यात घेतल्या आणि त्याचा साक्षीदार मी आहे. शाळा ताब्यात घेतल्या तेव्हा शाळेत पाणी गळत होते. मुले कशी बसत होती. हे सर्व सदस्यांना माहिती आहे. एवढी सुधारणा केल्यानंतर प्रतिवर्षी आपण दोन-दोन शाळा बांधण्याचा विक्रम त्यावेळेस केला आणि चांगल्या शाळा आपण बांधल्या. त्या शाळेचे मेन्टेनन्स करणे हे शिक्षण विभागाचे काम आहे आणि हे जर काम शिक्षण विभागाकडून होत नसेल तर त्यांनी मला दोष देण्याचे कारण नाही. हयाकरिता शासनाकडून प्रत्येक शिक्षकाला पाच हजार रुपये मिळतात. त्या शिक्षकांनी पाच हजाराचे काय मेन्टेनन्स केले, काय खर्च केला किंवा त्यांना औषधे, फिनेल जे काही पाहिजे. त्याची डिमान्ड आमच्यापर्यंत येणार नाही. तोपर्यंत आम्ही त्यांना ते कसे उपलब्ध करुन देणार.

**आसिफ शेख:-**

त्यांनी आठ-दहा दिवस स्वतः जाउन तिथे साफसफाई करुन घेतली तर तिथे जो आपला कर्मचारी आहे. त्याचा पगार तुम्ही कापून टाका.

**मिलन म्हात्रे:-**

केळकर साहेब, सगळयात वाईट मला हयाचे वाटते.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

संन्याशिव साहेब, आपण त्यावेळेला नगरपालिकेत होता. आम्ही नगरपालिकेच्या वेळी शाळा बांधल्या आणि आम्ही येथे सभागृहात पोटतिडकीने बोलत आहोत. मला ही तेवढीच पोटतिडकी आहे. ज्यासाठी मी स्वतः मेहनत केलेली आहे. मी स्वतः पाणीपुरवठा योजना असो किंवा शाळा असो पूर्णपणे प्रयत्न केले. पूर्ण प्रयासाने हे निर्माण झालेले आहे.

**मिलन म्हात्रे:-**

केळकर साहेब, पाच तारखेला ही कार्यवाही केली आणि त्याच्या एक आठवडा अगोदर सर्व शिक्षकांना आणि हेड मास्तरांना आम्ही सांगितले. कारण काही रुमच्या चाव्या त्यांच्याकडे होत्या आणि त्याची पण साफसफाई करायची होती. सांगून सुध्दा कोणीही शिक्षक सात-आठ तासात हजर झाला नाही. परिणामी त्या रुम बंद राहिल्या आणि साफसफाई करता आल्या नाही. पुर्नविनियोजनाचा जो विषय येथे आला आहे. तो फक्त शिक्षकांसाठी करायचा आहे का? सर्वांसाठी करायचा आहे. सगळे विषय एकत्रितपणे यायला पाहिजे होते. पुर्नविनियोजनाचे जे काही विषय आहेत. ते एकत्रितपणे आणा आणि बाकीचे जे रखडलेली कामे आहेत. ती पूर्ण होतील. तुम्ही शालेय क्रिडा सांस्कृतिक कार्यक्रम आणि मा. महापौर चषक हयाच्यामध्ये आपण पाच लाख रुपये घेणार. सभापती साहेब, आपल्याला महापौर चषक भरवायचे आहेत की नाही. जे क्रिडा स्पर्धा आहेत ते भरवायचे आहे की नाही आणि त्याच्यामधून तुम्ही पैसे देणार आहात का? त्याच्यामधून पैसे कशाला घेता.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

स्पर्धा भरवायचे आहेत.

**आसिफ शेखः-**

त्याच्यामधून तुम्ही पाच लाख रुपये घेतले आणि मागच्या वर्षी किती तरतुद होती. हयावर्षी तुमचा मनोदय असा दिसतो की, हया वर्षी महापौर चषक स्पर्धा भरवायच्या नाही.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

आपण शैक्षणिक अनुदानामधून पैसे घेतोय.

**आसिफ शेखः-**

हयाच्यात लिहिले आहे. दहा नंबर बघा. शालेय क्रिडा स्पर्धा महापौर चषक स्पर्धा हयामधून तुम्ही पाच लाख घेणार आहे. बांधकाम विभागातून सहा कोटी पॅचवर्क एक कोटी पुर्नवर्क त्यामधून का घेत नाही? बांधकामाचे काही पडले नाही. जे आवश्यक आहेत. कला-क्रिडा सांस्कृतिक क्षेत्रात आणि गटारे, लाईट भरपूर झाले. पण आपल्याला शहराचा विकास करायचा आहे. त्याच्यात सांस्कृतिक दर्जा प्राप्त करुन घ्यायचा आहे आणि आपण तोच भाग वगळत आहात. माझे असे म्हणणे आहे, हयाच्यामधून तुम्ही कमी करु नका.

**चंद्रकांत वैतीः-**

शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न आहे, वेतनाचा प्रश्न आहे.

**आसिफ शेखः-**

शिक्षकांना पगार मिळायला पाहिजे. शिक्षणाचा दर्जा वाढला पाहिजे. त्या मताशी आम्ही सहमत आहोत.

**याकुब कुरेशीः-**

अध्यक्ष महोदय, एक गोष्ट विचारु इच्छितो, पूर्वी नगरपालिका असताना वीस टक्के दयावे लागत आणि आता महानगरपालिका झाल्यामुळे पन्नास टक्के दयावे लागत आहे. आपण शासनाला निवेदन करु शकतो का, की एकदम तीस टक्के भार वाढवू नये. कारण नव्यानेच महानगरपालिका झालेली आहे.

**संन्याशिवः-**

हा शासन निर्णय आहे.

**याकुब कुरेशीः-**

मी मान्य करतो. पण शासनाला आपण कसे निवेदन किंवा विनंती करु शकतो का नाही.

**संन्याशिवः-**

ठाणे महानगरपालिकेत देखील असेच आहे.

**याकुब कुरेशीः-**

मान्य आहे. पण आपण शासनाला विनंती करु शकतो की नाही.

**आसिफ शेखः-**

आपण शासनाला पत्र पाठवा की, तुम्ही आम्हाला आता जी. आर. दिले आहे आणि आमची अगोदरच प्रोव्हीजन झालेली आहे. शासनाने आम्हाला यंदा तीस टक्के दयावे आणि पुढच्या वर्षी २००४-०५ च्या अर्थसंकल्पात आम्ही बजेटमध्ये तशी तरतुद करुन घेउ. आपण हयामधून काहीतरी मार्ग काढा.

**धनराज अग्रवालः-**

मिरा भाईंदर आणि शासन एकाच पार्टीचे राज्य आहे. आपण तिथे रिक्वेस्ट करुन आणू शकता.

**याकुब कुरेशीः-**

अग्रवाल साहेब, आम्ही त्यांना तिच विनंती करतोय.

**रिटा शाहः-**

सभापती महोदय, विषय क्रमांक १७७ महानगरपालिका शिक्षण मंडळास शिक्षकांचे वेतनासाठी पुर्नविनियोजनाद्वारे अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत हा जो विषय आहे त्यात शिक्षकांना अनुदान उपलब्ध करुन दयायचा असा मी ठराव मांडत आहे. परंतु, त्यांच्यात जे पन्नास टक्के आहे आणि शासनाबरोबर पत्रव्यवहार करुन ते तीस टक्के करता आले तर बघावे असा मी ठराव मांडत आहे आणि शासनाकडे देउन मंजूर झाले तर नाहीतर पन्नास टक्के करायचे आहे.

**दिनेश नलावडेः-**

सभापती सदरचा जो विषय आलेला आहे. त्या विषयाला अनुमोदन देत आहे.

**आसिफ शेखः-**

सभापती साहेब, आपल्या या ठिकाणी नेताजी सुभाषचंद्र बोस क्रिडांगण आहे. त्यावर आपण सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी अन्य लोकांना परमिशन देतो. परंतु, आपल्या गावातील, शहरातील जी मुले आहेत आणि आता हिवाळयाची सुट्टी तर सकाळी पहाटे तिथे खेळण्यासाठी आपण त्या मुलांना परवानगी देत नाही आणि त्यांच्याकडे आपण पैशाची मागणी करत आहोत. तर मुलांना सकाळी दोन तासासाठी मैदान उपलब्ध करुन का देत नाही. अनंत पाटील साहेबांची देखील तिच व्यथा आहे की, आपल्या गावातील मुलांना का जाउ देत नाही, अडवतात. खेळायला देत नाही, असे बंधन घालून चालेल का? सभापती साहेब, आपण परवानगीचे आदेश दया. गावातील मुले जाणार कुठे? कारण क्रिडांगण नाही. शाळेचे, कॉलेजची जी मुले आहेत. त्यांच्याकडून पैसे घेतले नाही पाहिजे.

**मा.सभापतीः-**

मी सांगितले होते त्यांच्याकडून पैसे घेण्यात येउ नये.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य, आपण आता सभागृहात आपण आपले मत व्यक्त केले की, नेताजी सुभाषचंद्र बोस हे क्रिडांगण आहे. ते सगळयांना मोकळे करावे. ते नागरिकांसाठी आहे आणि नागरिकांच्याच सुविधांसाठी आपण ते उभारले. तर यावेळेस क्रिडा स्पर्धा कोणी स्पॉन्सर केलेले नसेल अशावेळी नागरिकांसाठी, मुलांसाठी खेळण्याकरिता उपलब्ध राहिल आणि ज्या संस्थाना बुकिंग करण्यासाठी जे अगोदर पत्र आपल्याला येतात. बुकिंगची वेळ सोडेन त्यांना विनामुल्य देण्यात येईल.

**प्रकरण क्र. १७७:-**

महानगरपालिका शिक्षण मंडळास शिक्षकांचे वेतनासाठी पुर्नविनियोजनाद्वारे अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षकांचे वेतन, निवृत्तीवेतनासाठी सन २००३-०४ चा अंदाजीत एकूण खर्च (५०% शासन + ५०% महानगरपालिका) रु. ३,१३,९६,०००/- इतका आवश्यक होता. त्यानुसार महापालिका अर्थसंकल्पात शासन निर्णय क्र. सीपीटी २००१/(१५९७-भाग-२)/प्राशि-२, दि. २० एप्रिल २००२ नुसार ५०% रक्कम रु. १,५३,४७,०००/- इतकी तरतुद करणे आवश्यक होते. परंतु नगरपालिकेच्या काळातील नगरपालिकेच्या हिश्श्याप्रमाणे २०% रक्कमेची तरतुद केलेली आहे. त्यामुळे ३०% निधी कमी पडत आहे.

शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. सीपीटी २००१/(१५९७-भाग-२)/प्राशि-२, दिनांक २० एप्रिल २००२ नुसार शिक्षकांचे पगार वेळेत करणे ही जबाबदारी महापालिकेची आहे. त्यामुळे उर्वरीत ३०% रक्कम ही पुर्नविनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

महानगरपालिका अंदाजपत्रक सन २००३-०४ नुसार (फ) संकीर्ण (२५) प्राप्त महागाई भत्ता अनुदानापैकी २०% रक्कम शिक्षण मंडळास प्रदान (पान क्र. २७) नुसार रु. ५० लाख तरतुद करणेंत आली होती. सदर तरतुदीमधून रु. ४८,२५,०००/- अनुदान शिक्षण मंडळास अदा करणेंत आलेले आहे.

उर्वरीत ३०% अनुदानांस तरतुद अपुरी असल्याने (ड) शिक्षण प्राथमिक व माध्यमिक शिक्षण या मुख्य लेखाशिर्षाखालील (५) बालवाडी शाळा इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षामधून रु. १० लाख (९) शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके, गणवेश, बॅच मोफत वाटप या लेखाशिर्षाखालील रु. २२ लाख (१०) शालेय क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रम, मा. महापौर चषक मधून रु. ५ लाख व (इ)(२) अ लेखा शिर्षाखालील शाळा कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणे या लेखा शिर्षाखालील रु. २३ लाख पुर्नविनियोजन करुन (फ) संकिर्ण (२५) प्राप्त महागाई भत्ता अनुदानापैकी २०% रक्कम शिक्षण मंडळास प्रदान करणे या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा शिक्षकांचे वेतन विहीत वेळेत करणे शक्य होणार नाही. त्यामुळे ३०% रक्कम वरीलप्रमाणे पुर्नविनियोजनाद्वारे उपलबध करुन देण्यांस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. दिनेश द. नलावडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र.सचिवांनी प्रकरण क्र. १७८ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती:-**

सन्मा. सभापती साहेब, मागच्या सभेत आपण या विषयावर चर्चा केली होती आणि ज्यावेळेला हे लिलाव झाले होते. त्यावेळेला आपण संपूर्ण शहरातील शंभर फुटी जे रस्ते आहेत. त्याच्यावर फेरीवाले बसवायचे नाही आणि मिरा रोडचा जो शंभर फुटी रस्ता आहे. जो शांतीनगरमधून सरळ सृष्टीमध्ये जातो. जो आपण ब्रीज बांधला आहे व डांबरीकरण केलेला आहे. त्या रस्त्यावर फेरीवाले बसवू नयेत. म्हणून आपण त्यावेळेला नोंदी घेतली होती. ती नोंद आपल्या यादीत दिसत नाही तर ती नोंद घालावी. शहरात जेवढे शंभर फुटी रोड आहेत. त्या रोडवर कुठल्याही प्रकारचा फेरिवाला बसू नये. कारण हयाबाबतीत वाहनांना अडथळा होतो आणि जे फेरीवाले आहेत. ते दोन लाईन करतात. राजधानी अपार्टमेन्ट पोस्ट ऑफिस मिरा रोडमध्ये ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित केलेला आहे. तिथे दोन्ही बाजूला फेरीवाले बसतात. तिथे सामान्यपणे माणूस चालू शकत नाही. त्याकरिता रिक्षा स्टँडदेखील येथे आणावा लागला. आपल्याला रिक्षा स्टँडची संख्या फिक्स करायची होती. याबाबत अहवाल आणलेला आहे. तो पुढे करावा. परंतु, शहरात जेवढे शंभर फुटी रोड आहेत. त्याच्यावर कुठेच करु नये.

**धनराज अग्रवाल:-**

सुरुवातीपासून घ्यावे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

सन्मा. सभापती साहेब, हे जे लागू करायचे आहे. त्याचा गोषवारा सविस्तर दिलेला आहे. त्यामध्ये पार्किंग, नो पार्किंग.

**याकुब कुरेशी:-**

साहेब, मला विचारायचे आहे. हे जे क्षेत्र आपण ठरवलेले आहे. माझ्या माहितीनुसार पूर्वी ठरलेले आहेत व त्यानुसार लिलावदेखील झाले आणि त्या पध्दतीने आपण लिलाव केलेले आहेत. नवीन काही रस्ते यामध्ये समावेश केलेला आहे का?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

मागच्या वर्षी आपण रस्ते घेउन लिलाव केलेले आहेत. त्यामुळे सध्या १ एप्रिल पासून हे लागू करायचे आहे. त्यामुळे ३१ मार्चपर्यंत स्थायी समितीने जो ठराव करुन दिलेला आहे की, फेरीवाले कुठे बसावे आणि कुठे बसू नये. ते ३१ मार्चपर्यंत चालू राहिल आणि हे १ एप्रिलपासून अस्तित्वात येईल. त्याच्या अगोदर आपली मंजूरी मिळाल्यानंतर आम्ही पब्लिकेशन करु पेपरला. कुणाच्या काही हरकती

सुचना असतील तर ते मागवू आणि त्यावर विचार करुन परत स्थायी समितीसमोर ठेवून मग मा. महासभेसमोर पाठवू. परंतु, प्रत्यक्षात तुम्हाला काय बदल करायचा आहे. यासाठी आम्ही फक्त नो पार्किंगचेच म्हणजे फेरिवाले कुठे असू नये याचीच लिस्ट केली आहे. सोबत हयाची लिस्ट करायला नको आहे आणि ते केले तर परत अडचणीचे होईल. म्हणून आपण पार्किंग कुठल्या रस्त्यावर करु नये. म्हणजे फेरिवाले कुठल्या रस्त्यावर असू नये. एवढेच रस्ते तुम्हाला आवश्यक वाटतील ते ॲड करा. नंतर पार्कींग नो-पार्कींग आणि एकेरी वाहतुक जे आहे. ते पोलिस कमिशनरकडे मंजुरीसाठी पाठवावे लागते. त्याचे नोटीफिकेशन व्हायला लागते आणि आपली मंजुरी मिळाल्यानंतर आम्ही पोलीस कमिशनरकडे पाठवणार. पोलीस कमिशारने मंजुरी दिल्यानंतर ती लागू होणार आहे. म्हणजे मा. महासभेच्या मंजुरीनंतर पार्कींग, नो-पार्कींग आणि एकेरी मार्ग हा जो विभाग आहे. हा मा. महासभेच्या मंजुरीनंतर पोलीस कमिशनरकडे पाठवणार. पोलिस कमिशनरने मंजूरी दिल्यानंतर त्याचे नोटीफिकेशन होणार आणि मग ते लागू होणार आणि फेरीवाले व ना-फेरिवाले आपण मुद्‌दाम फेरीवाले कुठल्या रस्त्यावर फिरावे हे नमुद केलेले नाही. कुठल्या रस्त्यावर फिरु नये. हे जे रस्ते दिले आहेत. त्या व्यतिरिक्त कुठले रस्ते ॲड करायचे असतील ते करावे. ते सोडून बाकीचे सर्व रस्ते फेरिवाल्यांसाठी राहतील.

**रिटा शाहः-**

साहेब, आपण जो जैन मंदिर असा उल्लेख केलेला आहे. त्याचा देवचंद संघवी मार्ग असे नमुद करावे आणि आपण जैन मंदिरजवळ नो-फेरिवाला झोन असे आहे तसे नो-पार्कींग पण त्याच्यामध्ये घेण्यात यावे.

**धनराज अग्रवालः-**

भाईंदर पश्चिममध्ये जो आठवडी बाजार लागतो. त्याचा उल्लेख नाही आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

ते सोडून आहे. सुरुवातीला आम्ही उल्लेख केलेला आहे. जोपर्यंत आम्ही मार्केट बांधणार नाही. तोपर्यंत जिथे मार्केट भरतात. तिथेच मार्केट भरण्याची व्यवस्था चालू राहिल. जर मार्केट शिफ्ट करायचे असेल तर जागा सुचवा.

**धनराज अग्रवालः-**

मी आपल्याला रिक्वेस्ट करतो. मिरा रोडमध्ये स्टेशनच्या बाजूला शाळेच्या नजीक जे मार्केट आहेत. ते दर सोमवारी लागते. त्या गर्दीतून माणूस निघू शकत नाही. ते मार्केट थोडे पुढे सरकावयला पाहिजे अशी माझी हयाच्यात सुचना आहे. कारण तेथून रेल्वेच्या माणसाचे येणे-जाणे जास्त असते व त्या ठिकाणाहून माणूस चालू शकत नाही. आपण फेरीवाल्यांची संख्या काढली आहे. ती केव्हापासूनची आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

आम्ही सारखे दोन-तीन दिवस सर्वे केलेला आहे.

**धनराज अग्रवालः-**

गोषवा-यामध्ये दोन-तीन ठिकाणी असे आलेले आहे की, येथे फेरीवाले बसू शकतात. बाकीच्या फेरीवाल्यांची व्यवस्था करायला लागेल अशी आपल्यावर काही जिम्मेदारी आहे का?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

आम्ही शेवटी जे म्हटले आहे, लायसन्सची पध्दत सुरु करायची. त्यावेळेला जेवढे लायसन्स आपण देउ शकतो. तेवढे दिल्यानंतर मग बाकीचे उचलायला मोकळे आहे. कारण त्यांना आयडेन्टी दयायचे आहे. नंबर दयायचे आहे आणि आयडेन्टी कार्ड त्या हातगाडीवर ठेवायचा आहे.

**शरद पाटीलः-**

त्याच्या अटी शर्ती आपल्याला करायला लागतील.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

अटीशर्ती करणार आहेत.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

१/१/९५ रोजी शहराच्या मतदार यादीत ज्याचे नाव आहे त्यांना देणार आहोत.

**धनराज अग्रवालः-**

ना-फेरीवाला क्षेत्रामध्ये बावन्न जिनालय, जे.एच.पोद्दार हायस्कूल, राम मंदिर मार्ग त्याच्यात माझी एक रिक्वेस्ट आहे. मोदी पटेलमध्ये सर्व होलसेल मार्केट आहे. तिथे रिक्षा आणि टॅम्पो उभे असते. होलसेल व्यापा-यांचे सात-आठ होलसेल व्यापारी असल्यामुळे बसण्याची जागा कमी असते. त्या क्षेत्राचा आपण विचार करा आणि जे तुम्ही पार्किंग क्षेत्रामध्ये जसे त्यांचे रिक्षा आहेत. तर हे तीनच रोड लिहिलेले आहेत. छत्रपती शिवाजी मार्ग, नाझरेथ चर्च रोड आणि नव्वद फुटी रोड सुदामा नगर गल्लीतील. दुसरे रिक्षा आणि टेम्पो तुम्ही कुठे उभे करणार किंवा कुणाची गाडी वगैरे असेल तर दुस-या ठिकाणी उभी करु शकत नाही का?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

रिक्षा स्टँड आम्ही स्वतंत्र केले आहे.

**धनराज अग्रवालः-**

रिक्षा स्टँड स्वतंत्र झाले. पण पार्कींग क्षेत्र तुम्ही तीन आणि चार लिहिलेले आहे. मग गाडीवाली आणि ट्रकवाल्यांनी कुठे पार्किंग करावे. एवढे चार रोडवर पूर्ण होणार नाही. भाईंदरमध्ये संख्या पुष्कळ आहे. आतल्या गल्लीमध्ये कुठेतरी उभे करु शकतो. याचा असा अर्थ होतो. जिथे फेरीवाले बसत नाही. तिथे पार्किंग होउ शकते.

**याकुब कुरेशीः-**

रस्ते अरुंद होतात म्हणून आपण फेरीवाल्यांना बसू देत नाही. मग तिथे पार्किंग कशी करणार.

**धनराज अग्रवालः-**

गाडया, टेम्पो, ट्रक ते तीन रोडवर सगळे उभे राहू शकत नाही. आता जो
वर गोषवारा दिला आहे. तुमची गाडी असेल तर दुस-या ठिकाणी उभी करणार काय? तीनच क्षेत्र दिले आहेत.

**रिटा शाहः-**

हे क्लिअर करा की, पार्किंग झोन आपण बनवत आहे. त्याचा अर्थ असा झाली की, पार्कीग झोनमध्येच आपण पार्कीग करु शकतो आणि इतर जागेवर आपण कुठेही करु शकतो. परंतु, पार्कीग झोनमध्ये आपण हक्काने करु शकतो असा त्याचा अर्थ होतो काय? साहेब, मोदी पटेल रोड रेसीडेन्शिअल झोन आहे.

**धनराज अग्रवालः-**

वाहतुकीची होणार कोंडी, वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता फक्त पार्कीगची स्थळ व रस्ते घोषित करण्यात योग्य ठरेल तर परत चारच रस्ते झाले.

**रिटा शाहः-**

साहेब, मोदी पटेल रेसीडेन्शिअल झोन आहे. तिथे सर्व बिल्डींगमध्ये लोक राहतात. तिथे चार-पाच होलसेलर आहेत. चोवीस तासात त्याचे दिवस रात्र ट्रक येतात-जातात आणि सर्व बिल्डिंगच्या गेटवर पार्किंग करतात. लोकांची तक्रार आली तर त्या ट्रकला तुम्ही पार्किंग झोन झाल्यानंतर दिवसभर ते ट्रक जातात-येतात. रात्रीचे तिथे थांबतात आणि जेवण बनवतात व झोपतात. त्या ट्रकवर मग तुम्ही एकदा पार्किंग झोन डिक्लर केल्यानंतर आम्हाला उठवा असे बोलण्याचा अधिकार आहे का?

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण जो मुद्दा उपस्थित केला. आपण अशी तरतुद केलेली आहे की, अमुक ठिकाणी पार्किंग क्षेत्र असावे. त्या व्यतिरिक्त जिथे पार्किंग केले जाईल. त्यांना आपण फाईन करणार व त्या गाडया उचलून आणणार.

**धनराज अग्रवालः-**

त्यांना पार्किंग जागा पाहिजे की नको. आपण त्यांना जागा सुचवुन दया.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

जागा सुचविण्याची जबाबदारी नगरपालिकेची नाही आहे.

**नितीन ठाकुरः-**

सभापती साहेब, मिरा भाईंदरमध्ये लहान लहान रस्ते आहेत. गल्ली आहेत. त्या गल्ल्यांमध्ये हेव्ही ड्रायव्हिंगवाल्यांना देउन टाका.

**धनराज अग्रवालः-**

साहेब, जर वाहनांची संख्या चार हजार तर पाचशे वाहने उभी करायचे का? त्याला तुम्ही काय करणार.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

भाजी घ्यायला मोटर सायकल किंवा गाडी घेउन आले आणि भाजी घेउन गेले तर ते पार्कींग केले असे होत नाही किंवा मोदी पटेल रोडला माल उतरायला आणि सामान खाली केले व गाडी तिथेच उभी राहिली तर पार्किंगचा चार्ज लागतो. समजा माल भरुन दुसरीकडे न्यायचा आहे आणि माल भरण्याचे काम चालू आहे व माल भरल्यानंतर तीन तास गाडी तेथेच उभी राहिली तर पार्किंग चार्ज लागू होईल. माल भरल्यानंतर गाडी निघून गेली तर पार्किंग चार्ज लागणार नाही आणि ज्यांच्या स्वतःच्या गाडया आहेत. त्यांनी रस्त्यावर थांबवायच्या नाहीत.

**धनराज अग्रवालः-**

रात्री गाडया कुठे ठेवायचे?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

रात्री गाडी ठेवण्याची त्यांची त्यांनी व्यवस्था करावी.

**धनराज अग्रवालः-**

साहेब, जागा पाहिजे ना.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

काम चालू आहे. माल भरणे चालू आहे व माल खाली करणे चालू आहे व तिथे त्यांना पार्किंग झोन नाही.

**धनराज अग्रवालः-**

रोड टॅक्स आम्ही भरतोय.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त साो.):-**

रोड टॅक्स जो आहे. ते भारत शासन घेतो व त्याचा महापालिकेशी काही एक संबंध नाही.

**धनराज अग्रवालः-**

मग आपण होलसेल मार्केट बनवून का देत नाही. जर तुम्ही मार्केट बनवून देउ शकत नाही. तर ते गाडी कुठे उभे करणार. सभापती साहेब, जर अन्नधान्य होलसेल मार्केटमध्ये आले नाही तर लोक खाणार तरी काय? तुमचा विषय हो आहे तो मर्यादित स्वरुपाचा आहे आणि माल खाली किंवा माल भरत असताना पार्किंग चार्ज लागणार नाही. तो चार्ज केव्हा लागेल जेव्हा वर्किंग चालू नाही. गाडी खरेदी केली. रस्त्यावर ठेवले आणि घरी झोपले व सकाळी उठून घेउन गेले. म्हणजे पार्किंगचा रेट चालू झाला.

**रिटा शाहः-**

साहेब, पार्किंग रेटचा प्रश्न नाही. मोदी पटेल रोडवर दोन-तीन होलसेलर आहेत व त्यांचे सारखे ट्रक येतात. तर मेन मुद्दा मी तुम्हाला विचारले. त्यांचे सारखे ट्रक येतात. तर तुम्ही बोललात की, माल उतरवायला ट्रक आले म्हणजे कामासाठी आहे. मुद्दा असा आहे की, तो एक होलसेलवाला व बाकी सर्व रेसीडेनशियल आहे. त्यांच्याकडे चार ट्रक एकत्र आले व चारही ट्रक त्यागल्लीमध्ये एकत्र शिरते आणि कोणाच्याही बिल्डिंगच्या गेटसमोर ते उभे राहतात. म्हणजे दोन-तीन तास पहिला ट्रक खाली करण्याकरिता वेळ गेला व दुस-या ट्रकला दुसरे तीन तास गेले. तिस-याला तीन तास म्हणजे बारा तास ते तीन ट्रक खाली करायला गेले.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

खाली करायचे ठिकाण एकच आहे.

**रिटा शाहः-**

दुस-याच्या गेटसमोर उभे करायचे नाही.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

खाली करण्याचे दुकान एकच आहे. मात्र चार ट्रक माल आला. एक ट्रक खाली व्हायला व तीन ट्रक उभे राहिले. तर त्यांना नो-पार्किंगच्या कायदयाची अंमलबजावणी होणार नाही. कारण एकाच दुकानात माल उतरावयाचा आहे आणि तीन ट्रक खाली होईपर्यंत त्यांच्यावर चार्ज लागणार

नाही. नो-पार्किंगचा चार्ज लागणार नाही. कारण एकाच दुकानात खाली व्हायला चार ट्रक एकत्र आले आहे.

**नितीन ठाकूरः-**

साहेब, ही गंभीर गोष्ट आहे.

**रिटा शाहः-**

तुम्ही पार्किंच चार्ज लावा किंवा नाही. मी असे बोलत नाही. ते चार ट्रक एकत्र उभे राहतात व तिथे रेसीडेनशियल लोक राहतात. त्यांना जर त्या चार ट्रकने त्रास होतात. कारण बिल्डिंगच्या बाहेर निघायला त्रास होतो आणि तुम्ही तो रस्ता बघा कसा आहे.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्या रिटा शाह यांच्या प्रश्नाचे उत्तर मी देउ इच्छितो. रेसीडेनशियल झोनमध्ये गोडाउन अलाउड ॲप्लीकेबल नाही आहे.

**नितीन ठाकूरः-**

मग त्या एरियामध्ये ट्रकची एन्ट्री बंद करा.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

मोदी पटेल रोडवर माझ्या माहितीप्रमाणे अनेक वर्षापासून गोडाउन आहे.

**रिटा शाहः-**

साहेब, हयाच्यावर आमच्या भरपूर तक्रारी झाल्या आहेत व मारामा-यादेखील झाल्या आहेत.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

रेसीडेनशियल एरियामध्ये गोडाउन ॲप्लीकेबल नाही असे मी तुम्हाला स्पष्ट उत्तर दिले आहे. त्यानंतरही ते गोडाउन बंद करायचे किंवा काय करायचे.

**रिटा शाहः-**

गोडाउन बंद करा अशी आम्ही मागणी केलेली नाही. फक्त जिथे हेव्ही ट्रक यायला नाही पाहिजे. कारण तिथे दोन-तीन शाळा आहेत. कित्येक वेळा आमचे भांडण झाले आहे. लोकांच्या गेटसमोर गाडी उभे करतात आणि ते क्लिनर आणि ड्रायव्हर काय सांगतात. तुम्हाला कुठे जायचे आहे तिथे जा.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

गोडाउन बंद करायचे नाही अशी भूमिका असेल तर आपण संबंधितांना बोलावे व त्यांची बैठक घेउ.

**रिटा शाहः-**

साहेब, आता मुद्दा चालला आहे पार्किंग आणि नो-पार्किंगचा.

**धनराज अग्रवालः-**

साहेब, आपण पार्किंग क्षेत्र आले. त्याच्यात जागा वाढवा असा माझा सांगण्याचा हेतू आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.):-**

आपण रस्ता वाढवायचे आहे तू सुचवा.

**रिटा शाहः-**

साहेब, आपण जागा सुचवा असे बोलता. पण मोदी पटेल रोड रेसीडेनशियल झोन आहे. तिथे हेव्ही ट्रॅफिक आम्ही पार्किंग करायला देणार नाही. त्याला माझा विरोध आहे.

**मा.सभापतीः-**

पार्किंगला आपण विरोध करु शकत नाही. गर्व्हनमेन्ट टॅक्स घेतो व ते कुठल्याही रोडवर फिरु शकतात.

**रिटा शाहः-**

गाडी घेउन फिरण्याचा प्रश्न नाही आहे.

**नितीन ठाकूरः-**

साहेब, मुंबईला काही ठिकाणी ट्रॅफिकला टाईम लिमीट दिलेला आहे असा टाईम लिमीट आपणही देउ शकतो.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

टाईम लिमीट फक्त एकेरी वाहतुकीसाठी असेल आणि वर्किंग, ट्रकवर चालू असेल माल खाली होणे आणि भरणे. त्या कालावधीला पार्किंग, नो-पार्किंगचे नियम लागू होत नाही. भरलेला जो माल तो ट्रक माल भरून उभा राहिला तर पार्कींगचे नियम सुरु होते.

**नितीन ठाकूरः-**

साहेब, आपण त्यांना वेळ दया की, दोन तासासाठी आपण गाडी उभे करु शकता.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

असे देता येणार नाही.

**नितीन ठाकूरः-**

तिथे शाळा आहेत व तिथे लहान मुले आहेत व तिथे जर ॲक्सीडेंट झाले तर त्याची जिम्मेदारी कोण घेणार?

**रिटा शाहः-**

साहेब, आपण असे तरी ठरवा की, तिथे रेसिडेनशियल झोनमध्ये परवानगी दिली आहे का? ठिक आहे. तुम्हाला रेसिडेनशियल झोनमध्ये हेव्ही ट्रक ठेवायचे असेल तर ठेवा. पण त्या गोडाउनला तुम्ही परमिशन दिलेली आहे का?

**नितीन ठाकूरः-**

सभापती साहेब, उपआयुक्त साहेब आता बोलले की, रेसिडेनशियल झोनमध्ये गोडाउनला परमिशन नाही.

**मा.सभापतीः-**

प्रत्येक ठिकाणी दुकाने आहेत व तिथे माल पोहोचवायचा असतो. त्यामुळे तिथे टॅम्पो येणार व भाईंदरमध्ये एकाही रस्त्यावर दुकान नाही असे कुठले ठिकाण आहे का?

**रिटा शाहः-**

दुकानाचा प्रश्न नाही. गोडाउनचा प्रश्न आहे.

**नितीन ठाकूरः-**

आता उपआयुक्त साहेब बोलले की, रेसिडेनशियल झोनमध्ये गोडाउनला परमिशन नाही. याचा अर्थ काय ते गोडाउन बेकायदेशीर आहे.

**जोजफ घोन्सालवीसः-**

मा. शिवमूती नाईक साहेबांनी सांगितले की, जे आठवडयाचे बाजार सध्या रस्त्यावर भरत आहेत आणि जसजसे मार्केट उपलब्ध होतील तसतसे आम्ही बाजार शिफ्ट करु. तर पोलीस स्टेशनच्यासमोर जे मासळी मार्केट भरते. आठवडयाचा बाजार म्हणून तर तुम्ही त्यांना मार्केट बांधून देणार काय? आणि देणार असाल तर कुठे?

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

पान क्र. ९ वर ७ वा परिच्छेद बघा. मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेचा विविध ठिकाणी आठवडी बाजार, मच्छी मार्केट, भाजी मंडई मार्केटसाठी आरक्षित केले आहे. आरक्षित केलेल्या जागेवर मार्केट बांधल्यास त्या ठिकाणी नियमित रस्त्यावर बसणा-या भाजी विक्रेता, मच्छी विक्रेता व फेरीवाल्यांची सोय होउ शकेल. त्यामुळे रस्त्यावर फेरीवाले न बसण्याची महापालिकेची कृती काही अंशी अंमलात येउ शकेल. यासाठी प्राधान्याने काम हाती घ्यावे लागणार आहे. सध्या शहरामध्ये विविध ठिकाणी रस्त्यावर फेरीवाले बसत आहेत. फेरीवाले रस्त्यावर बसत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. ही वस्तुस्थिती आहे. महापालिकेची स्वतंत्र अशी मार्केट नाहीत. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावर बसणा-या फेरीवाल्यांकडून भाजी वगैरे खरेदी करावी लागते. फळ, भाजी विक्रेते हे नागरिकांचे दैनंदिन गरज भागवित असल्याने रस्त्यावर फेरीवाल्यांची पर्यायी व्यवस्था व जोपर्यंत महापालिका मार्केटची सोय उपलब्ध करुन देत नाही. तोपर्यंत अन्य ठिकाणी सदर रस्त्यावरील फेरिवाल्यांना अन्य ठिकाणी सामावून घेणे आवश्यक वाटते. म्हणजे भाईंदर पश्चिम, पूर्व, मिरा रोड हया ज्या ज्या भागातले आहेत. ते प्रायरिटीने ताब्यात घेउन मार्केटची योजना घ्यावे असे आम्ही सुचविले आहे.

**जोजफ घोन्सालवीसः-**

त्याच्यासाठी जागा कुठे आरक्षित केले आहे का? सुक्या मासळीसाठी आरक्षित अशी जागा कुठे आहे? ते आपण सांगावे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

ज्या ज्या ठिकाणी मार्केटचे रिझर्व्हेशन आहे. त्या ठिकाणी भाजी मंडई, फळ मार्केट, मच्छी मार्केट, मटण मार्केट ते सर्व तिथेच येते.

**याकुब पाटील:-**

अध्यक्ष महोदय, हे जे नो-पार्किंग झोन आहे. आपण अगदी अतिशय त्याच्यावर प्रेशर आणतोय असे मला वाटत आहे. कारण आपण मुंबई महानगरपालिकेप्रमाणे काहीतरी करु इच्छितो. पण मुंबई महानगरपालिकेप्रमाणे कामकाज करायला आपल्याकडे तेवढया सुविधा नाहीत आणि एवढे प्रेशरायिझ करुन एवढे दाब आणून पार्किंग झोन आणि नो-पार्किंग झोन लगेच करु नये अशी माझी विनंती आहे.

**मा.सभापती:-**

आपल्याला काय करायचे आहे ते आपण येथे सुचवायचे आहे.

**याकुब कुरेशी:-**

मी माझी सुचना येथे मांडली आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

कार्पोरेशन झाल्यानंतर वळण निर्माण व्हायला पाहिजे. कारण कधी ना कधी लागू करायचे तर आतापासून थोडे वळण लागू केले तर बरे पडेल.

**याकुब कुरेशी:-**

परंतु, साहेब आपल्याकडे जागाच नाही आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

जागा नाही असे म्हणून चालणार नाही कारण ज्यांनी खरेदी केलेल्या गाडया आहेत. ते त्यांची त्यांनीच व्यवस्था करायची आहे. जागा दयायचे आणि बिझनेस त्यांनी करायचा असे नाही आहे.

**याकुब कुरेशी:-**

तरीदेखील ते टॅक्स भरतात.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

टॅक्स भरला तो आर.टी.ओ. चा रस्त्यावरचा टॅक्स त्यांनी कुठे भरला आहे. बेस्टवाले, टी.एम.टी. वाले येता-जाताना आपली जागा अडवून बसले आहेत.

**नितीन ठाकूर:-**

साहेब, आपण आता बोललात की, तुम्ही जो टॅक्स दिला आहे. तो गव्हर्नमेन्टला दिला आहे. मग टोल आम्ही कुणाला दिला.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

टोल म्हणजे येण्या-जाण्यासाठी रोडवर म्हणजे तुम्हाला उदाहरण देतो. रेल्वे गेटजवळ गाडया उभ्या राहतात आणि एस.टी.सुध्दा जायला रस्ता राहत नाही. म्हणजे त्यांनी चोवीस तास तिथे रहावे.

**याकुब कुरेशी:-**

अमुक ठिकाणी जे आहेत ते आम्हाला मान्य आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

आपल्याला रस्ता वाढवायचा आहे. तो वाढवा व त्याकरिताच तुमच्या मंजुरीसाठी आम्ही आणले आहे.

**याकुब कुरेशी:-**

आपण हे पुढच्या सभेत घ्या असे माझे मत आहे.

**जोजफ घोन्सालवीस:-**

सभापती साहेब, आपण मला त्या जागेचे आरक्षण क्रमांक सांगावे.

**याकुब कुरेशी:-**

मासळी मार्केट व्हायला पन्नास वर्ष जातील.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

हया स्थायी समितीने पूर्वी जे बजेट केलेले आहे. त्यात टॉप प्रॉयरेटी मार्केटला दिलेला आहे.

**याकुब कुरेशी:-**

साहेब, मला मान्य आहे. मार्केटला दिलेली आहे. पण जागा आपल्याजवळ उपलब्ध नाही.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

ज्यावेळेला टाउन प्लॅनिंगचे डिपार्टमेन्टकडून विषय येतात. त्यावेळेला भू-संपादनासाठी एखादया जागेचा जरी विषय आला आणि भू-संपादन करायचा ठराव झाला तर आरक्षणवाले घाबरून निगोशिएशन करायला येतील. निगोशिएशन केले तर मग ते टी.डी.आर घेतील किंवा जागा ताब्यात मिळण्यासाठी निदान भू-संपादन करायला महानगरपालिका सुरु झाली. हे जरी गावामध्ये पसरले. तर स्वतःहून जागा दयायला तयार होतील. मग ते पैसे घेउन दयायला तयार होतील किंवा टी.डी.आर घेउन दयायला तयार होतील. डेव्हलपमेन्ट प्लॅन मंजूर झाल्यापासून एकही विषय भू-संपादन करा किंवा टी.डी.आर करा किंवा निगोशिएशन करा. हे तिन्ही पर्याय ठरावात तुम्ही ठेवा किंवा एखादया वेळेस असे आहे. समजा तो रिझर्व्हेशन लॅन्ड आहे. ते त्यांनी डेव्हलपमेन्ट केले तरी चालते. असे जर तुमचे मत असेल तर ते ही फेक्झीबल ठेवा.

**याकुब कुरेशी:-**

जे मासळी मार्केटचे आरक्षण दाखवले आहे. ते माझ्या मते हा मॅटर सुप्रीम कोर्टामध्ये चालू आहे.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

त्याचे जागेबाबत चालले आहे. तुम्ही उदया भू-संपादनासाठी ठराव करा. कोण मालक आहे हे बघण्याचे आम्हाला कारण नाही. मालकी हक्काबाबत सॉल्ट आणि त्यांचे चालले आहे. महापालिकेचे आणि त्यांचे कुठे चालले आहे. आम्हाला फक्त एवढेच पाहिजे. भू-संपादनाचा तुम्ही ठराव करा. आम्ही नोटिफिकेशन प्रसिध्द करतो.

**धनराज अग्रवाल:-**

आम्ही पाच ठराव भू-संपादनाबाबत पास केले. त्यांचे काय झाले. त्यातील एकतरी काम झाले आहे का?

**याकुब कुरेशी:-**

साहेब, एखादी अनधिकृत बिल्डिंग जर कोर्टामार्फत स्टे ऑर्डर असेल तर
आपण तोडू शकत नाही.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

कुठले ठराव झाले.

**रिटा शाह:-**

भू-संपादनावर अधिकारी नेमायचे असे झाले होते.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

जागेचे आरक्षण नंबर म्हणून ठराव करायचे असे झाले नाही.

**धनराज अग्रवाल:-**

भू-संपादनाचे झालेले आहे. शिवार गार्डन बाबत.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त सो.):-**

मा. महासभेने विषय चर्चेला आणला नाही आणि बजेटमध्ये प्रोव्हिजन केलेली आहे. शिवार गार्डनचे टॉप प्रॉयरेटीवर टाउन पार्क आणि त्यामध्ये नगरपालिकेचे, महापालिकेचे विभाग कार्यालय, टाउन पार्क आणि अजून काहीतरी त्या आरक्षणामध्ये आहे. आम्ही मुद्दाम बजेट प्रोव्हिजन बघून रिपोर्ट दिला होता. त्याबाबत तो विषय चर्चेला घेतला नाही. चर्चा झाली नाही. ठरावही झाला नाही. जोपर्यंत डेव्हलपमेन्ट प्लानमधले दोन-चार आरक्षणाबाबत स्थायी समिती किंवा मा. महासभा हे जोपर्यंत निर्णय घेणार नाहीत. तो पर्यंत जमीन ताब्यात मिळणार नाही. मग तुम्ही आज निर्णय घ्या अन्यथा दहा वर्षानी घ्या. तुम्ही ठराव भू-संपादनाचा करा, टी.डी.आरचा करा किंवा निगोशिएशनचा करा किंवा जे आरक्षण आहेत. समजा, एखादया खाजगी मालकाच्या जमीनीवर शाळेचे आरक्षण आहे. पण तिथे महापालिकेला शाळेच्या जागेची आवश्यकता नाही आहे असे गृहित धरा. पाच मिनिटासाठी पण तसा अर्थ तुम्ही काढू नका. तर तुम्ही त्या ठरावामध्ये की, ही शाळा तुम्ही त्या मालकाला शाळेसाठी डेव्हलप करा.

**धनराज अग्रवाल:-**

साहेब, ठराव कोणी आणायचे. ठराव प्रशासन का आणत नाही.

**रिटा शाह:-**

ठराव प्रशासन आणत नाही. सभापती साहेब आणतात.

**शिवमूर्ती नाईक(मा.उपआयुक्त साो.):-**

ट्रावेलबेस म्हणून आम्ही एक ठराव आणला होता. तो विषय चर्चेला आला नाही व निर्णय काही झाला नाही आणि यावेळेला हा एकच विषय का आला, दुसरे का आले नाहीत. पण कुठेतरी हात गाठल्याशिवाय दुसरे सुरुवातच होणार नाही आणि बजेटमध्ये तुम्ही टॉप प्रॉयरेटीवर प्रोव्हिजन केले आहे. रक्कम दाखवली आहे. त्यावेळी आम्ही पहिला विषय पाठवला. नंतर मार्केटचा विषय आमच्याकडे तयार आहे. पण तुम्ही ठराव काही ना काही तरी करा. भू-संपादन करा, निगोशिएशन करा किंवा टी.डी.आर दया. काहीतरी ठराव झाल्याशिवाय हयावर निर्णय होणार नाही आणि निव्वळ जर मार्केट होणार नसेल तर हे सभागृहाने निर्णय न घेतल्यामुळे मार्केट झाले नाही असे चित्र निर्माण होईल. कारण जागा ताब्यात मिळाल्याशिवाय आपण डेव्हलप करु शकणार नाही.

**रिटा शाह :-**

आता नाईक साहेबांनी सांगितले की त्यांनी ट्रायल बेसीसवर आणले तर शहराला पहिल्या प्रॉयरेटीवर कुठल्या गोष्टीची गरज आहे. ते पहिले प्रशासनाने बघायला पाहिजे. प्रशासनाला पहिले नाटयगृह महत्वाचे वाटले म्हणून नाटयगृह पहिले आणले. मासळी मार्केट, भाजी मार्केट, हॉस्पीटल, शाळा, कॉलेज हयाची त्यांना प्रॉयरेटी वाटली नाही म्हणून त्यांनी भलताच मुददा आणून ट्रायल घेतली.

**मा. नाईक साो. :-**

यावेळेला तो विषय आणला म्हणून हयांचा विरोध झाला. आणि उदया मार्केटचा विषय आणला तर हे म्हणणार का आणला ?

**रिटा शाह :-**

मार्केटचा विरोध कोणी करणार नाही.

**मा. नाईक साो. :-**

मी एक उदाहरण दिले. तुमचा हा शब्दप्रयोग मी व्यक्तीगत करत नाही.

**रिटा शाह :-**

हा विरोध मी केला नाही. रोहित सुवर्णाजींनी केला होता.

**मा. नाईक साो.:-**

ज्यावेळेला बजेट प्रोव्हीजनमध्ये बजेटप्रोव्हीजन ज्या ज्या कामासाठी केलेले आहे. त्या त्या कामासाठी पुढे होई ना किंवा पाठीमागे होईना. विषय येणारच जेव्हा आम्ही टाउन हॉलची केस पाठवली नंतर आम्ही मार्केटचे पाठवणार होतो. परंतु तुम्ही हेच का पाठवले व तुम्हाला तेच का चांगले दिसले. ज्यांच्या त्यांच्या मनावर नाही आहे. बजेटमध्ये प्रोव्हीजन रक्कम तरतुद केलेली आहे. त्याप्रमाणे विषय पाठविणार. तुम्ही भू संपादनाचे करा टी.डी.आर. चे करा. किंवा निगोशिएशन तुम्ही प्रायव्हेट व्यक्तीला डेव्हलप करायला दया पण निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहाचा आहे. आम्ही त्याप्रमाणे विषय पाठवू.

**रिटा शाह :-**

साहेब मी मान्य करते. आपण जे काही केले ते मला समजते. तुम्ही तो विषय ट्रायल बेसीसवर आणला. पण प्रशासनाला समजायला पाहिजे की शहराला पहिल्यांदा कुठल्या गोष्टीची गरज आहे.

**मा. नाईक सो :-**

ट्रायल बेसीसवर स्थायी समिती महिनाभर चालली आणि त्या महिनाभरामध्ये तीन दिवस विषय शिवार गार्डनच्या डेव्हलपमेंटवर चालले. त्यामध्ये बजेट प्रोव्हीजन करताना रक्कम कमी करायचे का जास्त करायचे असे होते व शेवटी रक्कम वाढवून दिली. आपण मागच्या स्थायी सभेत नव्हता बजेट मंजूरी करताना आपण जर पाहिलात तर रक्कम वाढवून दिली . त्याच्यात काय काय धरले आहे. समजा आज आम्ही टाउन हॉलचे पाठवले व उदया मार्केटचे पाठवू.

**रिटा शाह :-**

साहेब, आम्ही टाउन हॉलचा विरोध करत नाही. टाउन हॉल पाहिजे, नाटयगृह पाहिजे, पण आपल्या शहराला पहिले कुठल्या गोष्टीची गरज आहे. ते प्रशासनाला ही माहिती आहे आणि आम्हाला

ही माहिती आहे. भाजी मार्केट आणि मासळी मार्केट हे तुम्ही ट्रायल बेसीसवर आणायला पाहिजे होते. आणि तुम्ही जे टी.डी.आर. व भू-संपादनाचचे सांगत आहात तो मुददा तेव्हाच सुटला असता.

**मा. नाईक सो. :-**

आता आम्ही विचार करुन निर्णय हे घेतले आहे. बजेट प्रोव्हिजन मध्ये ज्या ज्यासाठी तरतुद आहे. ते सगळे विषय एकाच वेळेला स्थायी समिती समोर आणायचे. तीनशे बावन्न आम्ही आणणार नाही. आम्ही आता जे टॉप प्रॉयरेटीचे विषय आहेत. बजेट प्रोव्हिजनमध्ये मार्केट, टाउन पार्क आणि जे स्मशान भूमी हे जे महत्वाचे विषय आहेत. ते आरक्षण अगोदर आणू व प्रॉयरेटी तुम्ही ठरवा. पहिल्या तुमच्याकडे तीनशे बावन्नचा रिपोर्ट येईल. बजेट प्रोव्हिजनमध्ये दाखविल्याप्रमाणे पहिले मार्केट येईल नंतर तुम्हाला जसेजसे प्रॉयरेटी वाटते. तसेतसे प्रॉयरेटीवर विषय आणा. आमच्या मते बजेट प्रोव्हिजनमध्ये जी रक्कम दाखविलेल्या आहेत. त्यामध्ये टाउन पार्क मार्केट आणि स्मशान भूमी हे बजेट प्रोव्हिजनमध्ये दिलेले आहे. त्यानंतर बाकीच्या विषयाचा आम्ही नंबर लावू. तुम्ही नंबर लावून द्या त्याप्रमाणे करु.

**रिटा शाह :-**

नंबर आम्ही लावणार नाही. साहेब तुम्ही चुकीचे बोलता. शहराला कुठल्या गोष्टीची गरज आहे. ते प्रशासनाला ही जाणीव आहे आणि येथे बसलेल्या सदस्यांना ही माहिती आहे की कुठेल्या गोष्टीची आपल्याला फार गरज आहे. ते प्रशासनाला ही जाण्ीव आहे आणि येथे बसलेल्या सदस्यांना ही माहिती आहे की कुठल्या गोष्टीची आपल्याला फार गरज आहे जसे हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, मासळी मार्केट व फेरीवाल्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या व्हेजीटेबल मार्केट पाहिजे. ही शहराची प्रॉयरेटी आहे. कुठेकुठे आरक्षण आहे आणि मला वाटते आपण हा विषय लगेच पुढच्या स्थायी समिती समोर आणायला पाहिजे आणि पास करुन घ्यायला पाहिजे.

**मा. नाईक सो. :-**

मॅडम, आपल्या म्हणण्याला माझे ऑब्जेकशन नाही आहे. फक्त आमचे म्हणणे असे आहे की, केव्हा ना केव्हा हा आरक्षणाचा विषय येणार परंतु प्रश्न असा निर्माण झाला की, बजेट प्रोव्हीजनमध्ये टाउन पार्कचे टॉप प्रॉयरेटीवर घेतले असल्यामुळे तो विषय पाठवावा. आमच्या मनाने घेतला नाही.

**रिटा शाह :-**

करायलाच पाहिजे टाउन पार्कच नव्हे तर सर्वच विषय आणायला पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सहाय्यक संचालक नगररचना कृपया पुढील सभेमध्ये मार्केट.

**आसिफ शेख :-**

आपल्याला प्रॉयरेटी ठरवायला पाहिजे की कोणकोणते विषय घ्यायला पाहिजे व आपण हयाला एक समिती नियुक्त करा व जे कत्तल खाने तर ते कत्तलखान कधीपासून व्हायला पाहिजे पण ते झाले नाही. ज्यामध्ये समाजाच्या भावना दुखावल्या जातात. जैन समाजाचे प्रदुषण असतात तेव्हा तुम्ही पत्र पाठवून कम्प्लसरी बंद करा असे सांगता त्यामध्ये नुकसान होते. तुम्ही जर कत्तल खाने बनवले तर ते अधिकृत होउन जाईल.

**मा. नाईक सो. :-**

त्यामध्ये प्रोव्हीजन केलेले आहे. व महाराष्ट्र शासनाने त्यासाठी जागा दिलेली आहे. आणि कत्तल खाने होणार

**आसिफ शेख :-**

प्राधान्याने हे काम झाले पाहिजे.

**मा. नाईक सो.:-**

मार्केट, स्मशान भूमी आणि त्यानंतर प्रॉयरेटी लावण्यासाठी स्थायी समितीसमोर हा विषय आणावा.

**नितीन ठाकूर :-**

साहेब सुचना मांडायची आहे. मिरा भाईंदरमध्ये जी कोंबडी गल्ली आहे. त्याचे नविन नामकरण झालेले आहे. कै रघुनाथ म्हात्रे मार्ग असे हा जो रस्ता आहे तो अरुंद आहे तर कृपया हा रस्ता एकच मार्ग येण्याकरिता ठेवावा.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयावरती मागच्या सभेत मी एक सविस्तर पत्र दिलेले आहे, त्याच्यामध्ये फुटपाथ दुकानदारांचे जे प्रस्तावीत राष्ट्रीय सरकारने जी निती अवलंबली आहे ती सगळयांना लागू आहे. म्हणजे केंद्रसरकारची सगळया शहरांकरिता सगळया महानगरपालिकाकरिता जी निती आखून दिलेली आहे. ती मी प्रयत्न करुन मिळविली आहे. मी या महापालिकेच्या स्थायी समितीच्या सदर विषयाच्या विषयावर चर्चा करीत असताना मी रेकॉर्डवर आणतोय. तसेच हॉकर्स झोन निश्चित करण्यासाठी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय त्याचे वाचन करावे, लॉ ॲन्ड ज्युडिशियनकडे आणि त्याच्यामध्ये जे नियम आणि निकर्ष दिले आहेत त्याचे आपण पालन करावे अशी मी स्थायी समितीच्या सदस्याच्या वतीने आपणाला विनंती करत आहे. आपल्या माहितीकरता सदर कॉपी सादर करीत आहे शहरामध्ये नो फेरीवाला झोन डिक्लर करताना आपल्या प्रशासनातर्फे नेमकी फेरीवाल्याकरिता आपण फेरीवाला झोन आणि ना फेरीवाला झोन हयाची जी आपण प्रोव्हिजन करतोय ती करत असताना शेवटला या ठिकाणी विकास योजना अंतर्गत मार्केटसाठी आरक्षित असलेले भूखंड, या सदराखाली बघायला गेले तर प्रशासनाने आतापर्यंत बघायला गेले तर महापालिका प्रशासनाने किती रिझर्व्हेशन ठेवण्यात आली होती. व सेटिंग लावून किती रिझरव्हेशन कमी केली. तिथे आर झोन किती लावले हे विशद करायला पाहिजे होते ते केले नाही. कारण ही लिस्ट पूर्ण मी माझ्या हातामध्ये ठेवलेली आहे . शहरामध्ये गेल्या बारा तेरा वर्षापासून आपल्या टाऊन प्लॅनिंगचे काय बट्याबोळ झालेला आहे तो हयाच्यामध्ये रिफलेक्ट होतोय. रिक्षा स्टँड साठी जिथे रिझर्व्हेशन ठेवले होते तिथे बिल्डिंग झालेले आहेत. जे वास्तव्य आहे ते बदलू शकत नाही. परंतु सन्मा सदस्यांना या ठिकाणी या रिझरर्व्हेशनचे सर्वे नंबर तलाठी सजा कोणती आहे ती आणि कुठल्या प्रयोजनाकरिता रिझरर्व्हेशन ठेवला आहे त्याची लिस्ट प्रशासनातर्फे दयायला पाहिजे होती. परंतु प्रशासनाकडून अशी डिटेल लिस्ट आली गेली नाही. त्यामुळे अर्धा तास हया सभागृहाचा गेला. सभापती साहेब ही लिस्ट मी हयाकरिता देतोय कारण वाहतुक वगैरे आपण डिक्लर करतोय आणि या शहरामध्ये कोणी पुर्वी चुकीच्या पध्दतीने कुठल्या एका व्यक्तीच्या नावाने एकतर्फी वाहतूक डिक्लेर केले आणि तिकडे नाव देखील लागले असे नाही आहे एकतर मोटर अधिनियमन १९१८ च्या सेक्शन १५ क्लीअर सांगतोय की एकतर्फी वाहतुक जर आपल्याला करायची असेल तर राज्यसरकार राज्यपत्रात जाहिर नोटीस आणि ती सुप्रीडेंट दर्जाच्या अधिका-याने केली पाहिजे. आपण हयांच्यामध्ये पोलीसांचे अहवाल आम्हाला कळविलेले आहेत. त्या अहवालामध्ये जवळ जवळ काही महिन्यापुर्वी तयारी झाली असे आम्हाला समजते. परंतु जिल्हा पोलीस अधिक्षकांकडे आपण हे प्रस्ताव पाठविले होते का? की त्यानी हयाला मंजूरी हया हया तारखेला दिलेली आहे असे कुठेही दिले गेलेले नाही आहे. प्रस्तावीत असतील तर हे अंमलात यायला हवे तिथे वाक्यरचना देखील तशी नाही आहे. सदर प्रस्तावित प्रस्ताव हे मा. पोलिस अधिक्षक ठाणे यांच्याकडे पाठविण्यात येतील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब सुरुवातीला जेंव्हा मी विश्लेषण केले . त्यावेळी तुमच्या मंजूरी नंतर हरकती सूचना मागविणार व हरकती सूचना नंतर मा. महासभेच्या मंजूरी नंतर पोलीस कमीशनर कडे पाठवणार असे सुरुवातीला बोललो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब भाईंदर पोलीस स्टेशनने सुचविल्याप्रमाणे पोलीस स्टेशन तुम्हाला हे मार्ग सुचविते. पण त्याच्या अगोदर काय दिलेले आहे. एकेरी वाहतुक तीन मार्ग सुचविलेले आहे. व त्याच्यासाठी कमिटी बनवली व त्याच्यात आर.टी.ओ. देखील आले . त्या कमिटीचा अहवाल हयाच्यामध्ये सविस्तरपणे देण्यात आलेला नाही. तो अधिकारी कोण आहे? पोलीस अधिकारी कोण आहे?

**मा. नाईक सो. :-**

ट्रॅफिक पोलिसांनी मिळूनच हे दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात ना फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेबाबत हा विषय आपल्याकडे आलेला आहे. त्याच्यामध्ये सदस्यांनी ज्या सूचना सूचविल्या आहेत ते घेउन हा ठराव मी पारित करीत आहे. आणि ठराव मांडीत आहे.

**आसिफ शेख :-**

उपआयुक्त साहेबांनी या ठिकाणी सविस्तर खुलासा केलेला आहे. आपल्याला हा विषय मा. महासभेसमोर घेउन जायचा आहे व त्याला अंतिम मंजूरी दयायची आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आपली हया विषयावर एक तासापासून चर्चा चालू आहे आणि आपण तहकूब करण्याचे बोलतोय. रिटा शाहने जी सुचना केली आहे त्याला मी अनुमोदन देत आहे.

**रिटा शाह :-**

साहेब ठराव झालेला आहे व त्यावर अनुमोदन झालेले आहे व ज्या कोणी सदस्यांच्या सुचना आपल्याला घ्यायचे आहेत ते आपण घ्यावेत

**मिलन म्हात्रे :-**

पहिले याच्यावरती सुचविले आहे राममंदिर रोड हे एक वाहतूक व ना फेरीवाला झोन म्हणून डिक्लेअर करत आहात. परंतु नो फेरीवाला झोनच्या खाली पोलीस स्टेशन ते भाईंदर रेल्वे स्टेशन, फाटक पर्यंतचा रस्ता तसेच आपण खाली दिलेले नाही. तीन फक्त टाकले आहे. राममंदिर ते पोलीस स्टेशनचा रस्ता

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

पान नंबर काय आहे

**मिलन म्हात्रे :-**

पान नं १० आहे. तिथे राम मंदिरचे नाव टाकायचे आहे ते टाकून का घेतले नाही कोणी टायपिंग मिस्टेक केली पहिल्या पानावर बोलता आणि हयाच्या चार सभेअगोदर तुम्ही आम्हाला आश्वासन दिले आहे मी नगर पालिकेचे ऑफीस आणि चर्चचा रस्ता मी सुचविला होता अजून पर्यत त्याच्यावर कार्यवाही केली नाहीआणि येथे तुम्ही डिलीट केले आहे ते कोणी केले भाईंदर वेस्टमध्ये ते का टाकले नाही ही चुक का झाली ते आपण पहिल्यांदा सांगा पहिल्या पानावर तुम्ही सांगता आणि खाली लिस्ट मध्ये नाही आहे मागे पण असेच केले तुम्ही आश्वासन दिले की दुस-या दिवशी बाजार उचलला जाईल अजूनही आमच्याकडे मयत निघाल्यावर लोकांना फेरीवाल्यांना बाजूला करावे लागते तुमच्या तोडचे आश्वासन आहे लोकाना फेरीवाल्यांना बाजूला करावे लागते तुमच्या तोंडचे आश्वासन आहे. माझ्याकडे गेल्यावर्षी ची प्रोसिडींग आहे तुमचे आश्वासन देखील पाळण्यात गेलेले नाही. ह्या राम मंदिर रोडच्या येथील रहिवाशांच्या व्यथा आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

उचलून आणले नाही

**मिलन म्हात्रे :-**

कोणी आणले नाही. आजही तिथे बाजार लागतो तुम्ही सांगितले बाजार हलविला जाईल. तुम्ही ठिकाण सुचवा म्हणून सांगितले. मी सांगितले नगरपालिका आणि चर्चच्या मधली गल्ली तिथे ट्रॅफिक नाही. अजूनपर्यंत तिथे कार्यवाही झालेली नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हे असे बोलल्यानंतर मी पुरावा कसा देणार ?

**मिलन म्हात्रे :-**

एखादा विशिष्ट नगरसेवक बोलल्यावर दुस-या दिवशी लगेच कार्यवाही होते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आतापर्यंत राममंदिर रोडवर दहा ते बारा वेळा ॲक्शन झाली.

**मिलन म्हात्रे :-**

सकाळी बाजार भरला होता. तुमच्या माणसाने पावत्या फाडल्या हा पुरावा आहे तुम्ही तो बाजार उचललात का? केळकर साहेब तुम्ही आता येथे नविन बसलेले आहात.

**याकुब कुरेशी :-**

साहेब तिथे लाइन मार्कींग करुन देण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

एक वर्ष झाला हा विषय येतोय. आमच्या येथून सर्व धर्माच्या लोकांच्या अंतिम यात्रा निघतात, रामाची पालखी निघते, हनुमानाची पालखी निघते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

म्हात्रे साहेब मी या गावाला नविन नाही आहे. या गावाची वस्तुस्थिती प्रत्येक गल्लीबोळयाची प्रत्येक दगडाची मला माहिती आहे.  मला राममंदिर या रस्त्याची माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

फेरीवाल्याचे जे निर्णय घेता त्यावेळेला तूमचा स्टाफ आजच्या तारखेला आजची जी परिस्थिती आहे ती तुम्हाला सांगतो.  कुठुन पाहिजे तेथून गाडया उचलून आणतात.  तुम्ही जे बाजार लिलाव करतात ते रोड विकता तर मग ज्या रोडवर बसायचे आहे त्यानां तुम्ही का अलाउड करत नाही तुम्ही त्या लिस्टमध्ये ते रोड का घेत नाही भले पंचवीस शंभर रोड होतील पैसे घेता तुम्ही त्यांच्याकडून.  त्या रस्त्याच्या तुम्ही सर्वे केला पाहिजे. प्रत्येक सर्वेमध्ये त्या रस्त्याचे ठिक व्यवस्थित नाव आले पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

या पार्किंगवर फेरीवाल्यानी बसायचे नाही हे ठरविल्यानंतर राहिलेल्या रस्त्यावर राहणार.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला काशीमीरा रोड तुम्ही लिलावात विकला होता.आणि पंचवीस फेरीवाले मिरा रोड पोलीस स्टेशनला नेउन तुम्ही टाकले त्यानी मारले ट्रॅफीकवाल्यांनी नेले तुमचा काही संबंध नाही आणि त्यांनी सांगितले की हा नगरपालिकेचा मेन रोड आहे इकडे लावायचा नाही तुमचे जे निर्णय आहेत ते तुम्ही पोलिसांना कळवत नाही भूदंड तो फेरीवाला तुम्हाला बाजार फी देखील देतो आणि पोलीसांचा मार देखील खातो व हफ्ते ही देतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कृपा करुन स्थायी समितीच्या ठरावामध्ये हा जो बाजार लिलावाचा ठराव आहे तो मार्च महिन्यापर्यंत राहणार आहे मार्च महिन्यापर्यंत राहणा-या रस्त्यावर फेरीवाले बसू नयेत असे त्या रोडमध्ये तो रोड टाकलेला आहे आणि आता जो प्रस्ताव आहे तो एक एप्रिलपासून लागू होणारा प्रस्ताव आहे आणि तुम्ही स्थायी समितीचा ठराव करुन जो लिलाव केला त्या रस्त्यावर आम्ही उचलायला जात नाही.  ज्या रस्त्यांवर बसू नयेत असे केले आहे त्या रस्त्यावर उचलायला जातो.

**मिलन म्हात्रे :-**

माझा सांगण्याचा दृष्टीकोन एवढाच आहे तुमची जी गाडी जाते ती धरसोड सगळयांना उचलून आणते.  आपला ऑक्ट्रॉय नाका मिरा रोडला आहे का?  नया नगरला?  आपण ऑक्ट्रॉय २९ कोटी ९० लाखाला विकला. त्याने नया नगर चौकीच्या येथे पॉइंट टाकला आहे का?  तर तिथे चौकी टाकलेली नाही.  तुमचा पैशाशी संबंध आहे पण त्याने का चौकी टाकली नाही तिथे दादागिरी होते. चौकीला तिथे माणसे बसून देत नाही आणि तोचप्रकार त्या एरियामध्ये होतो तिकडचा हातगाडया तुम्ही उचलून आणता का नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आपल्याला नेमके काय सूचवायचे आहे ते आपण सुचवावे.

**मिलन म्हात्रे :-**

मुददा क्र. १ ज्या ठिकाणी तुम्ही फेरीवाला झोन बनवणार आहात. त्या रस्त्याची व्यवस्थित विस्तृत नावे दिली पाहिजे. तिथे तुम्ही त्या लाइन मार्क करून दिले पाहिजे व त्या लाइनच्या बाहेर लोक बसली नाही पाहिजेत. केळकर साहेब हे जे मी बोलतोय ते आपण नोंदवून घ्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

नोंद घेण्यात आली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कारण काय होते त्या रोडची नावे नाही आहेत. ती नावे टाकली पाहिजेत आणि जी मी तुम्हाला पुस्तके दिली आहेत ती त्याच्यानंतर हया सर्वे नंबरची लिस्ट मी तुम्हाला देइन जी प्रशासनाने तुम्हाला दिलेली नाही आहे सभापती महोदय एक वर्ष अगोदर आम्ही पत्र व्यवहार केला.  रिझर्व्हेशनमध्ये आजच्या तारखेला चांगली जागा व्हेजीटेबल मार्केटसाठी आता तुम्हाला उपलब्ध आहे. त्यावेळेला

बजेटमध्ये प्रोव्हीजन करताना सांगितले की, लॅन्ड फिलींग करा. त्याला तारेचे कुंपण घाला आणि भाजी मार्केट तिथे बसवा पण अजूनपर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. आता भाईंदर वेस्ट ला बी.एस.टी. येणार आहे. ही बी.एस.टी. फिरत असताना असे हया अगोदर इस्ट रोडला त्रास होता त्याच्यामुळे ६० फिट रोडचे मार्केट बाधीत होणार आहे. त्याची प्रोव्हीजन भाजी मार्केटमध्ये करावी असा मी भरपूर प्रयास केला पण अजूनपर्यंत काही नाही. व्हेजीटेबल मार्केटची जी लिस्ट आहे ती मी तुम्हाला दयायला तयार आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, या प्रस्तावामध्ये मुर्धा ते उत्तनचा प्रस्ताव नाही आहे. परंतु आंबेडकर नगरपर्यंत जिथे जो मेन रस्ता काश्ी मिरा उत्तन रोड जो आहे आणि आता फ्लाय ओव्हर उतरल्यानंतर तो रस्ता तेथूनच त्या मैदानाकडून वळणार आहे. तिथे अनधिकृतपणे फेरीवाले बसतात आणि तो रहदारीचा प्रमुख रस्ता आहे. त्या रस्त्याने वी. आय. पी. व्यक्ती येतात त्या रस्त्याने पंतप्रधान सारखे व्यक्ती देखील येतात.तर असे वी.आय.पी. रस्त्याला उत्तन रोडला, आंबेडकर नगरचा नाका आणि तिथे जे फेरीवाले बसतात. त्यामुळे संध्याकाळच्या वेळेला भयंकर ट्रॅफिक होतो व अपघात होण्याची शक्यता असते व अपघात होतात देखील. तो तिकडचा जो नाका आहे तेवढा बंद करा.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब माझे एक सजेशन आहे. सदस्यांनी मांडलेला राम मंदिरचा जो प्रश्न आहे त्याच्यावर माझे मते तुम्ही निरीक्षण करावे आणि त्यांनां लाइन मारुन दयावी की हया लाइनच्या बाहेर कुठल्याही फेरीवाल्यांनी बसू नये.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ठिकाणी फेरीवाले बसू नये म्हणून नागरिकांनी लेखी तक्रारी केलेल्या आहेत. नगरसेवकांनी लेखी तक्रारी केलेल्या आहेत.

**याकुब कुरेशी :-**

तिथला नगरसेवक मी आहे आणि माझ्याकडे अजून कोणाची लेखी तक्रार आलेली नाही आहे मी तिथे राहतो व बघितले आहे की कुठलेही मयत जायला अडथळा होत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मागच्या वेळेला स्थायी समितीमध्ये आसिफ शेख साहेबांनी पंधरा मिनिटे राम मंदिर रस्त्यावर भाषण केले आहे. सभागृहाने एकमत करुन निर्णय घ्यावा.

**याकुब कुरेशी :-**

माझे म्हणणे् काय आहे एखादया नगरसेवकानी पंधरा मिनीटे बोलले म्हणून दुस-या नगरसेवकाने बोलू नये का? मी माझे मत मांडतोय पंधरा मिनीटे त्यांनी बोलले हे मला साहेब सांगू नका. मला ते कारण नको आहे. माझे सजेशन असे आहे की त्यांना तुम्ही लाइन मार्कींग करुन दया. त्यामुळे ट्रॅफिकला अडथळा होणार नाही आणि भाजीवाले बसतील व लोकांची व्यवस्था होइल.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब माझी एक सूचना घ्या खारी गाव तलाव जिथे मराठी शाळा आपली स्थलांतर होणार आहे तिथे फेरीवाले बसू नये. दुसरे हनुमान मंदिर ते एस. एन. कॉलेजपर्यंत फेरीवाले बसू नये आणि फेरीवाला झोन मध्ये रेल्वे समांतर जो रोड आहे जो जेसल पार्कला जातो तो रोड तिथे फेरीवाले बसवावे आणि नवघर शाळेच्या पाठीमागे बाजूला फेरीवाले बसायला हरकत नाही तसेच पार्कीगसाठी कस्तुरी पार्क येथे पार्कींग करायला हरकत नाही. साहेब आर. एन. पी. पार्क मध्ये काशी विश्वनाथ मंदिर समोर रिक्षा स्टँड असावे.

**दिनेश नलावडे :-**

हा प्रभाग माझा आहे. तेथे पार्कींग झोन ठिक आहे. ना फेरीवाला झोन करा तिकडे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जिथे रिक्षा स्टॅंड, टेम्पो स्टँड असेल तिथे मंदिर व बसायला शेड बांधायचे हे आम्ही मंजुर करणार नाही.

**शरद पाटील :-**

एस. व्ही. रोड, आर.एन.पी. पार्क ते नवघर रोड हा एक दिशा मार्ग असावा . साहेब भाईंदर पुर्वेसाठी आठवडी बाजार असावा हयाच्याकरिता प्रोव्हिजन आहे का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

भाईंदर पुर्वेला आठवडी बाजार असावा हयाच्याकरिता प्रोव्हीजन आहे.

**शरद पाटील :-**

रेल्वे समांतर मार्ग हा आपण एकतर्फी मार्ग केला तर तो जड वाहनांकरिता का छोटया वाहनांकरिता एकतर्फी करणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

एकेरी मार्ग जाण्याचा.

**मिलन म्हात्रे :-**

पान नंबर दहा भाईंदर पश्चिमेचे लिलाव दिलेले आहेत आणि निरंक कसे लिहीता? जर हे निरंक दिलेले आहेत त्याच्यात तुम्ही कुठे कुठे बसणार मच्छी मार्केट आहे त्यांच्यापासून एवढे मोठे उत्पन्न घेता मोठा होलसेलचा बाजार लागतो. व्हेजीटेबल मार्केट आहे त्याचे रिझव्हेर्शन आहे आणि नो पार्कींग देखील निरंक लिहीता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपण स्थानिक परिस्थिती विचारात घेउन निर्णय घ्यावा .

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

बंदी घालण्याचे रस्ते डिक्लर करा. म्हणजे बंदी न घातलेल्या रस्त्यावर चालू होईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुमचा कॉलमच म्हणतोय फेरीवाला क्षेत्र तर आपण कॉलमच ठेवायचा नव्हता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

ना फेरीवाला क्षेत्रामध्ये ते रस्ते टाकले म्हणजे उरलेले रस्ते फेरीवाले झाले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही दंड घेतात त्यावेळेला वांदे होतात असे तुम्ही बोलता पण जिथे फेरीवाला क्षेत्र आहे ते देखील आपण हयाच्यात डिक्लर करा आणि आपण हा ठराव मा. महासभेपुढे पाठविणार आहात का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

ऑब्जेक्शन आणि सजेशन मागविणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ऑब्जेक्शन आणि सजेशनमध्ये आमच्या सभासदांची ऑब्जेक्शन असजेशन जी काय आहेत ती आम्हाला रेजअप करायची आहेत हा अर्धा तास सफीशीएन्ट नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे त्याला अधिन राहून हया ठरावाला मंजूरी दया.

**रिटा शाह :-**

साहेब माझी शंका आहे आपण सांगितले नो पार्किंग झोनमध्ये तीन तास गाडी उभी राहिली त्याचे सामान खाली करायला. तर ते तीन तास झाले हे कोण बघणार ? आणि आपण जी पॅनल्टी लावणार आहोत ती किती लावणार आहोत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

ते खाली होण्यासाठी ट्रकमालकाला स्वतःचे भाडे मिळविण्याचे जास्त असते. कारण ट्रक मालकाचे इनवेस्टमेंट फार असते. तो ट्रक लवकरात लवकर खाली तो ट्रक लवकरात लवकर खाली करायचे ते पाहतो आणि ट्रक खाली होउन गाडी तशीच उभी राहिली की महानगरपालिकेचा पार्कींग रेट लागू होतो. आणि ते खाजगी ठेकेदार वसूल करतील.

**रिटा शाह :-**

साहेब चोवीस तास जर का कोणी गाडी उभी ठेवली तर त्याच्यावर काय कार्यवाही करणार?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

दंड ठेवणार.

**रिटा शाह :-**

दंड नाही तुम्ही तो ट्रक उचलून नेणार काय ?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तो ट्रक उचलून आणण्यासाठी देखील कॉन्ट्रक्ट देणार.

**दिनेश नलावडे :-**

सदरचा विषय मंजूर झालेला आहे. रिटा शाह मॅडमनी सूचना केल्या आहेत. आणि त्याला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १७८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात नो फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेबाबत. (दि. २१/११/२००३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.१७३)

**ठराव क्र.**

मा. उपआयुक्त (अतिक्रमण / अनधिकृत बांधकामे) ह्यांचा ह्या संदर्भातील गोषवारा तसेच अभ्यास गटांनी ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करण्याबाबत तयार केलेल्या अहवालाचे वाचन करण्यांत आले.

मिरा भाईंदर महापालिकेने शहरातील विविध रस्ते रुंद व प्रशस्त केले असून या रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत रहावी व पदपथ पादचाऱ्यांना वापरासाठी मोकळे राहणे आवश्यक आहेत. म.न.पा. हद्दीत रस्त्याच्या दुतर्फा हातगाड्या भाजीवाले व इतर विक्रते आपला माल विकण्यांस बसलेले असतांत. त्यामुळे बसेस खाजगी वाहनांना व नागरिकांना वाहतुकीस अडचण होत असते. ह्या सर्व अडचणी दूर करण्यासाठी शहरामध्ये ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करण्यासाठी महापालिकेने 'अभ्यास गट' नियुक्त केला आहे. त्या अभ्यास गटांनी सादर केलेल्या अहवालाचे वाचन करण्यांत आले असून त्या अहवालास मंजुरी देण्यांत येत आहे.

अहवाला संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या सुचना देखील विचारांत घेणे आवश्यक आहे. मा. स्थायी समिती सदस्यांच्या दि. १५/१२/२००३ पर्यंत येणाऱ्या सुचनांचा ह्या अहवालामध्ये समावेश करुन मा. महासभेस सादर करावा. सध्या अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळ्या रस्त्यांवर ३०६२ फेरीवाले बसत आहेत. अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित केलेल्या रस्त्यांवर बसत असलेल्या फेरीवाल्यांना अन्य ठिकाणी हलवावे लागणार आहे. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय मुंबई ह्यांनी विविध महापालिकेला त्यांच्या हद्दीमध्ये फेरीवाल्यांना जागा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारने फेरीवाल्यांसाठी तयार केलेल्या राष्ट्रीय निती प्रमाणे कार्यवाही करावी.

ज्या ठिकाणी / रस्त्यावर ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणे प्रस्तावित केले आहे. त्या व्यतिरिक्त अन्य रस्त्यावर फेरीवाल्यांना जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सर्वेक्षण करुन माहिती उपलब्ध झालेल्या फेरीवाल्यांना परवाने देणेंत यावे. जेणेकरुन फेरीवाल्यांवर नियंत्रण येवू शकेल.

मिरा भाईंदर शहराच्या विकास आराखड्यामध्ये भाजी मार्केट (मच्छी मार्केट/आठवडा बाजार) ह्यासाठी ठिक ठिकाणी जागा आरक्षित ठेवण्यांत आल्या आहेत. सध्या रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांना सामावून घेणेसाठी ''मार्केट'' विविध ठिकठिकाणी बांधणे आवश्यक आहे. मार्केटसाठी आरक्षित असलेल्या जागा ताब्यात घेण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करण्यांत यावी.

वर नमुद केलयाप्रमाणे तातडीने कार्यवाही करणेंस ही सभा मा. महासभेंस शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य अधिकारी वर्ग कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे स्वागत करुन आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ठिक ०३.०५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**